२ एप्रिल १९७७
७५ पैसे

# माणूस

मुंबई दिल्ली प्रवासात मोरारजी बरोबर होते.
त्यांच्याशी बोलायला मिळाले....

१ सफदरजंग रोडवरील बाईंच्या निवासस्थानाशी
मी आलो आहे....

राजघाटावर गांधीजींच्या समाधीसमोर !....

माणूस प्रतिनिधी
दिल्ली

## तृप्त

पुन्हा आज सर्वांस स्वातंत्र्य प्राप्त
पुन्हा जागले सर्व जे काल सुप्त
पुन्हा भेटले मित्र तसेच आप्त
म्हणूनी मनी मी असे आज तृप्त ।।
पुन्हा लोकशाहीस आकार आला
उभ्या भारताचा कणा ताठ झाला
कुठे कारवाई न चालेल गुप्त
म्हणूनी मनी मी असे आज तृप्त ।।

स्वातंत्र्याची सप्तशृंगी पुन्हा पूजिली जनतेने
लोकशाहिचा ऐरावत हा पुढे निघाला झोकाने ।।
सामान्यांना आज मिळाला अभिमानाचा नवा वसा
पुसावयाचा प्रयत्न झाला तरी न पुसला पूर्वठसा
अनुभूती ही अनुभवतो मी जिकडे तिकडे फिरफिरुनी
आज असावे कां न तृप्त मग हृदयीं, नेत्रीं, श्रवणांनी ।।

—माधवाग्रज

---

## प्रारंभ

डोळियात आमच्या उगवलेला सूर्य
कुणीच !
नाकारू शकत नाही आता.
स्वतःची मुठभर आहुती
गुलाल उधळल्याप्रमाणे आम्हीपण उधळली;
अन् शिवशिवणाऱ्या हाता-बोटांची
चारदोन हाडं
भक्तिभावानं यज्ञकुंडाच्या दिशेने भिरकावली . . . .
हा युगाचा प्रारंभ किंवा
एका नव्या पर्वाची सुरुवात आता कुठे होते आहे.
घनदाट काळोख संपून . . . . पहाट उलगडते आहे.
— आणि आम्हीही आता ऊंचावलीत
स्वतःच्या कातडीची छत्रचामरं . . . .
राजरस्त्यांवरल्या अनेक पावलांत
दोन पावलं आमचीपण;
पुढल्या वाटचालीकरता आहेत उत्सुक-थरथरत.
धरावी आमच्यावरही
आमच्या देशाची निशाणाने
आईच्या पदराची सावली . . . .
नाही तरी कंगालांनी क्रांती घडवल्याचा इतिहास
आम्ही मनीमानसी जागवला आहेच !
अर्थात कुणालाच विसर वगैरे पडू नये—
भाळी धूळ ल्यायलेल्या समस्तांची हीच सदिच्छा.

—मोहन मुळे

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक चव्वेचाळीसावा

२ एप्रिल १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

□



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तिथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□


# स्थित्यंतरातली दिल्ली

रत्नाकर महाजन

पुन्हा एकदा दिल्ली. तीच ओळखीची ठिकाणे, तेच ओळखीचे चेहरे. पण एकूण वातावरण अधिक उत्साही, भारलेले. सर्वसामान्य माणसांचा उत्साह नुसता ओसंडून वाहणारा. विजेचा संचार झाल्याप्रमाणे माणसे इकडून तिकडे हलताहेत. दिल्लीतल्या आजच्या उत्साहाच्या वातावरणाचे वर्णन केवळ अपूर्व या एकाच शब्दाने करता येईल. ही आहे ऐतिहासिक निवडणुकांनंतरची दिल्ली. आधीची दिल्लीही पाहिली होती. त्यावरून आजचे वातावरण अनपेक्षित नव्हते. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी येथे नव्हतो. निवडणुकीपूर्वीची दिल्ली पाहून नंतर सुमारे दोन आठवडे बारामती मतदारसंघात फिरलो होतो. तेथे जनता लाटेचे विराट दर्शन घडले होते. इथल्याप्रमाणेच तिथेही गैरकाँग्रेसी कार्यकर्त्यांच्या सभांना होणारी गर्दी व त्यांना मिळणारी वागणूक केवळ थक्क करणारी होती. तर बारामतीत बॅरिस्टरसाहेबांचे भवितव्य पाहून जनतालाटेचा मतपेटीतून बाहेर पडणारा अवतार पाहण्यासाठी म्हणून पुन्हा दिल्लीत आलो आहे.

मुंबई-दिल्ली प्रवासात श्री मोरारजी देसाई बरोबर होते. निवडणुकांच्या निकालाविषयीचे त्यांचे अंदाज व इतर बाबींविषयी त्यांच्याशी बोलायला मिळाले. आज जे घडले आहे, ते त्यांनाही तेव्हा अनपेक्षित होते. कारण ते जरतारी भाषेत बोलत होते. आम्ही अमुक इतक्या जागा जिंकणार, सरकार बनविणार अशी आत्मविश्वासाची भाषा नव्हती. 'सर्व ठिकाणी हवा तर अशी आहे की, केंद्र सरकार आम्ही बनवू असे वाटते. पण तरी पाहू या काय होते ते.'

'गुजराथमध्ये किती जागा मिळतील ?'

'तिथले लोक म्हणताहेत २० जागा मिळतील म्हणून. प्रत्यक्षात पाहू किती मिळतात ते. साधारणत: १५ जागा मिळायला अडचण नसावी.'

मग महाराष्ट्राविषयी त्यांनीच मला विचारले. स्वतःचे मतही सांगितले. निवडणुकांचा निकाल अप्रिय लागतोय असे दिसताच इंदिरा गांधी काही तरी वेडेवाकडे करतील असे अनेकांना वाटत होते. मोरारजीभाईंना हा प्रश्न विचारला तेव्हा ते म्हणाले, एवढा सगळा इतिहास घडल्यानंतर त्या आणखी काही चुकीचे काम करतील असे मला वाटत नाही. आणि समजा जर तसे काही केले तर त्यांना कठीण प्रसंगास तोंड द्यावे लागेल. हे मोरारजी आहेत, असे समजताच अन्य लोकही हळूहळू येऊन त्यांच्याशी ओळखदेख दाखवू लागले. त्यामुळे आमचे संभाषण बंद झाले.

वीस तारखेस सकाळी दिल्लीत पोचलो. देशभर मतमोजणी चालू होती. दिल्लीतही एकूण तीन ठिकाणी चालू होती. तिन्ही ठिकाणी मतमोजणी केंद्राच्या बाहेर पंधरा-वीस हजार लोक ताणलेल्या उत्सुकतेने दिवसभर उभे होते. आतून वेळोवेळी 'लीड'चे इशारे

होत होते. लीड वाढे तसा लोकांचा आनंदही वाढे. युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या ऑफिसात अशीच एक मतमोजणी चालू होती. अटलबिहारी–शशिभूषण लढाईचा निकाल ती मोजणी लावणार होती. बाहेर उत्साही, उत्सुक कार्यकर्ते व लोक उभे होते. अनेक गाड्या आल्या व गेल्या. साधारणत: दोन्ही पक्षांचे लोक अशा वेळी असतात. पण इथे काँग्रेसवाल्यांचा मागमूसही नव्हता. काँग्रेसचा झेंडा लावलेली एकही गाडी दिसली नाहीच, साधा बिल्ला लावलेला एकही कार्यकर्तासुद्धा दिसला नाही. सारा एकतर्फी मामला! दर दोन-तीन मिनिटांनी 'जनता पार्टी झिंदाबाद, लोकनायक जयप्रकाश झिंदाबाद'च्या घोषणा. जमावात तरुण पोरांचा भरणा अधिक. देहभान विसरून पोरे अक्षरश: नाचत होती. तिन्ही मतमोजणी केंद्रांवर हेच चित्र. संध्याकाळी सात वाजेपर्यंत दिल्लीतील सर्व जागांवर 'जनता' उमेदवार आघाडीवर असल्याच्या बातम्या येत होत्या. शेवटी ९-९॥ वाजता शेवटचा निकाल आला–सर्व जागा जनता पक्षाने जिंकल्या. झाले. कोंडलेली वाफ बाहेर यावी त्याप्रमाणे लोकांचा उत्साह, आनंद उफाळून वर आला. जिकडे तिकडे जल्लोष, मिरवणुका. दिल्लीच्या कोपऱ्या-कोपऱ्यात मिरवणुका निघाल्या. एखाद्या मोठ्या मिरवणुकीची वाट न पाहता लोकांनी आपापल्या भागात उत्स्फूर्त मिरवणुका काढल्या. मध्यरात्रीपर्यंत जल्लोष चालूच होता. त्या दिवशी दिल्लीत किती मिरवणुका निघाल्या त्याची गणती करणे अशक्य. दिल्लीतले काँग्रेसचे सर्व उमेदवार पन्नास हजारांवर मतांनी हरले.

दिल्ली तर जिंकली. आता लक्ष होते इतरत्र. विशेषत: रायबरेली, अमेठी व भिवानी इथल्या निकालांवर. या तिन्ही ठिकाणी इंदिरा, संजय व बन्सीलाल जनता उमेदवाराच्या मागे असल्याच्या बातम्या वेळोवेळी येत होत्या. स्टेट्समन, इंडियन एक्स्प्रेस यांच्या कार्यालयांवर जसजशी या फरकांच्या बातम्यांची पोस्टर्स लागायची तसतसा जमावाचा उत्साह, जल्लोष वाढायचा. एकामागून एक मंत्री हरल्याच्या बातम्या येत होत्या. वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांबाहेर हजारो लोक उभे होते. प्रत्येक मंत्र्याच्या पराभवाचे टाळ्या वाजवून ते स्वागत करीत होते. पण खरी मजा त्यांना वाटायची या तीन जणांच्या मागे पडल्याच्या बातमीची. मध्यरात्रीपर्यंत त्यांतला एक निकाल लागला. बन्सीलाल १,१८००० मतांनी पराभूत झाले आणि रात्री १ वाजून १० मिनिटांनी जगाला हादरा देणारी ती बातमी आली. इंदिरा–संजय दोघेही पराभूत! 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या कार्यालयाबाहेर लावलेल्या बोर्डवर मध्यरात्री १ वाजून १० मिनिटांनी ही बातमी झळकली. बाहेर पंधरा हजार लोक याच बातमीची वाट पाहत जमले होते. ती बातमी आली. पंधरा हजारांच्या जमावाने कानठळ्या बसतील एवढ्या जोरात घोषणा व टाळ्यांचा कडकडाट केला. काहींनी तर ती बातमी बोर्डवर लिहिणाऱ्या माणसाच्या अंगावर नोटा फेकल्या. तीनशे रुपये त्या माणसाला तेवढ्यात मिळाले.

सतत दहा वर्षे अनिर्बंध सत्ता भोगणाऱ्या, आपल्या गुणांपेक्षा दुर्गुणांनीच जास्त प्रसिद्धी पावलेल्या इंदिरा गांधी पराभूत झाल्या. एका रात्रीत इथल्या सर्व लोकशाही संकेत, परंपरा पायदळी तुडवून स्वत: सर्वसत्ताधीश बनू पाहणाऱ्या बाईंना मतदारांनी धडा शिकविला. बाईंनी दहा वर्षांत एवढ्या अनिष्ट गोष्टी केल्या की, त्यापुढे चांगल्या गोष्टी अगदी विसरून जाव्यात. म्हणून त्या पराभूत झाल्याचा खेद खुद्द काँग्रेसजनांनाही वाटत नाही. पराभवाच्या क्षणी आवश्यक असलेली खरीखुरी सहानुभूती त्यांना आज दुर्मिळ झाली आहे. अगदी जयप्रकाशजीदेखील म्हणतात की, त्यांच्या पराभवाचे मला किंचितही दु:ख झालेले नाही. आपल्या उण्यापुऱ्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत बाईंनी देशभर मित्रांपेक्षा शत्रूच अधिक निर्माण करून ठेवले आहेत. युवराज संजय गांधी तर, या पहिल्यावहिल्या पराभवाने एवढे हबकले आहेत की, ते चक्क राजकारण–निवृत्तीची भाषा बोलू लागले आहेत. खरे तर राजकारणातली त्यांची कामगिरी ती काय, असे किती दिवस त्यांनी राजकारणात घालविले आहेत? बड्या आईच्या पोटी जन्म एवढ्या एकमेव भांडवलावर देशाच्या युवापिढीचे नेतृत्व करायला निघाले होते. राजाच्या दिवट्या पोराला जसे सरदार–सुभेदार घाबरत, तसेच इंदिराजींचे मंत्रीही. त्यांनी केवळ आईच्या खुर्चीकडे पाहून चिरंजीवांना डोक्यावर घेतले होते. पेंढा भरलेल्या वासराप्रमाणे त्यात मोठेपणा भरला होता. शेवटी मतदारांनीच ते पेंढा भरलेले वासरू आहे हे दाखवून दिले. पराभवानंतर काही या युवक नेत्याने आपल्या लाडक्या जनतेस अजून दर्शन दिलेले नाही. बरं, जनताही आता 'स्वत:हून' आपल्या लाडक्या युवा नेत्याचे दर्शन घ्यायला जात नाही.

या निवडणुकांनी अनेक चमत्कार करून दाखविले आहेत. सत्तेवर असताना लोकांची छळणूक व फसवणूक करणारी व्यक्ती आणि पक्ष दोघांनाही जनतेने झिडकारले आहे. आणीबाणीचा निर्णय बाईंचा स्वत:चा. आपला निर्णय देशावर लादून भावी असंतोष काबूत ठेवण्यासाठी म्हणून बन्सीलाल व संजय यांचा उपयोग त्यांनी केला. साम वगळून दाम–दंड यांचा वापर या दुकलीने केला. म्हणून या तिघांना तर धूळ चारलीच, पण जन–असंतोष ज्यांच्याविरुद्ध फारसा नव्हता व ज्यांच्याविषयी सर्व थरात चांगलेच मत होते, अशा के. सी. पंतांसारख्या तुलनेने सरळमार्गी मंत्र्यांनाही पराभव पत्करावा लागला. कारण या शासनाच्या धोरण– कार्यक्रमास तेही इतरांइतकेच जबाबदार होते. दीड वर्षाच्या दडपशाहीस जबाबदार असलेल्या व्यक्तींबरोबरच ती परिस्थिती निर्माण होत असताना स्वस्थपणे पाहत बसणाऱ्या, एवढेच नव्हे, त्याचे समर्थन करणाऱ्या पक्षासह जनतेने धूळ चारली आहे. सबंध उत्तर भारतात काँग्रेसचे पानपत झाले. दक्षिणेत मात्र काँग्रेस अजूनही प्रबळ राहिली आहे. तामिळनाडूत द्र. मु. क. काँग्रेसला चांगला धडा शिकवील असे वाटले होते. पण प्रत्यक्षात त्यांचा फक्त एक खासदार निवडून आला. द्र. मु. क. हा भ्रष्ट पक्ष असल्याची प्रतिमा अजून पुसली गेली नाही, असा याचा अर्थ येथे लावला जातो. भ्रष्ट पक्ष नाकारायचा म्हणून लोकांनी त्यांना मते दिली नाहीत. अण्णा द्रमुकही धुतल्या तांदळासारखा स्वच्छ आहे असे नाही. पण द्रमुकच्या भ्रष्टाचाराविषयी भावना अधिक तीव्र होत्या. म्हणून त्यांना लोकांनी नाकारले.

या निवडणुकीच्या निकालांचा अर्थ काय? प्रत्येकाचा वेगवेगळा आहे. पण एक निष्कर्ष मात्र सर्वांचा समान आहे–या देशातली सर्वसामान्य गरीब जनता आपण नेहमी समजतो तेवढी बेअक्कल,

निर्बुद्ध नाही. बरे–वाईट, खरे–खोटे यांचा विचार करून इष्ट ती निवड करण्याची क्षमता तिच्याजवळ आहे. आपला देश लोकशाहीस अनुकूल नाही असा निष्कर्ष दीड वर्षापूर्वी काढणारे तमाम बुद्धिजीवी, विचारवंत आता एकदम जनतेच्या लोकशाहीनिष्ठेचा जयजयकार करू लागले आहेत. एरवी स्टेटस्‌कोच्या बाजूचा असणारा एक पांढपेशा इंजिनिअर परवा म्हणाला, या निवडणुकांनी हे दाखवून दिले आहे की, बऱ्या–वाईटाचा विचार करण्यासाठी औपचारिक शिक्षणच हवे असे नाही, उलट त्याची आवश्यकता नाही. तसेच गरीब लोक लवकर भ्रष्ट होतात हेही खोटे आहे हे, या निकालांनी सिद्ध झाले आहे. परवा सुरेंद्र मोहन हे पत्रकार-परिषदेत म्हणाले, रायबरेली व अमेठी मतदारसंघात अनेक आमिषे समोर असूनही त्यांना बळी न पडता गरिबी ही भ्रष्ट करणारी गोष्ट नसते (Poverty is incorruptible) हे तेथल्या गोरगरीब जनतेने दाखवून दिले आहे. आणीबाणीच्या काळात या देशातील लोकशाहीनिष्ठेवर संशय व्यक्त करणाऱ्या नव्हे, ती नाहीच असे ठणकावून सांगणाऱ्यांचे असे अनेक लेख वाचल्याचे आठवले. आता तीच मंडळी या देशात लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत असे सांगतात. तेव्हा चांगलीच करमणूक होते. अक्षयकुमार जैन हे असेच एक साहित्यिक कम विचारवंत कम पत्रकार. आणीबाणीच्या काळात विरोधकांवर अनेक प्रकारची टीका आणि सरकारी पक्षाचे सर्वथा समर्थन ते आपल्या संपादकीयातून करीत असत. ज्या विरोधकांना 'अशांति फैलानेवाले तत्त्व' म्हणून ते वर्णीत असत त्यांच्यातच त्यागी, तपस्वी असे देशभक्त असल्याचा साक्षात्कार आता त्यांना झाला आहे. उगवत्या सूर्याला अर्घ्य देणारे असे किती विचारवंत या देशात असतील !

रायबरेली व अमेठीतील निवडणुकांविषयी अनेकांच्या मनात अजूनही उत्सुकता कायम आहे. राजनारायण व रवींद्र प्रतापसिंग दिसले की, लोक त्यांना घेरतात व गमती जमती विचारतात.

रायबरेलीतली प्रचारमोहीमच राजनारायण यांनी नाट्यपूर्ण रीतीने सुरू केली. प्रचारमोहिमेची पहिली सभा. २०।२५ हजार श्रोते बसले आहेत. राजनारायण स्टेजवर येतात. सर्व श्रोत्यांना उभे राहायला सांगतात. सारे उभे राहतात. नंतर सर्वांना आपल्या पायातल्या वहाणा काढायला सांगतात. लोक तसे करतात. 'नेताजी' म्हणतात. 'सब जूते मुझे फेंककर मारो' लोक अवाक्. यांना जोडे काय म्हणून मारायचे ? नेताजी म्हणतात, 'पिछले देढ़ सालमें जो कुछ हुआ, मेरे कारण हुआ. अगर मैं अलाहाबाद उच्च न्यायालयमें अपील नहीं करता तो आपके भाई–भतीजे–लडके–पोते–मामा–चाचा–बाप जेल नही जाते. इसलिए मुझे जूतेसे मारो." लोक स्तब्ध. 'नहीं मारोगे ? तो आपके हाथका यही जूता मतदानके दिन गायबछडेके चिन्हपर लगाना होगा, ताकि इंदिराको कुछ सीख मिले. आप अगर मुझे जूते नही देना चाहते तो वोट देना होगा.' टाळ्यांचा प्रचंड कडकडाट–सतत पाच मिनिटे राजनारायणना प्राप्त जनसमर्थनाची ही पहिली पावती. हा टेंपो असाच सतत वाढत गेला आणि सुप्रीम कोर्टात जिंकण्याची व्यवस्था केलेल्या बाईंना जनता कोर्टात धडा मिळाला ! शेवटी देशाच्या खऱ्याखुऱ्या सर्वोच्च कोर्टात–जनता कोर्टात न्याय झाला.

तर देशभरच्या या झंझावाताने दिल्लीच्या राजकीय रंगमंचावर एकदम ट्रान्स्फर सीन उभा केला आहे. या प्रलयंकारी निकालाचा राणीसरकार व त्यांच्या सरदारांवर काय परिणाम झाला आहे ते पाहण्यासाठी हम उनकी गलीकी खाक छानने लगे ! पराभवाच्या बातमीचा दुसरा दिवस २१ मार्च. सफदरजंग रोडवरील बाईंच्या निवासस्थानाशी मी आलो आहे, एरव्ही इथे कोणी गडबड असायची. रोज कुणी ना कुणी गट येऊन श्रीमतीजींच्या नेतृत्वावर अढळ श्रद्धा व विश्वास प्रगट करायचा. बाई रोज कोणत्या ना कोणत्या जमावासमोर भाषण करायच्या. तिथे जायचे म्हणजे अफाट जनसागराच्या दर्शनासाठीच जायचे असे वातावरण. पण हे झाले विजयोत्सवाच्या वेळचे. आज परिस्थिती वेगळी होती. शर्यतीत नेहमी पहिला येणारा घोडा आज हरला होता., आनंदाच्या प्रसंगी अभिनंदनार्थ येणारी 'सामान्य जनता' आज पराभवानंतरही सांत्वनार्थ आली असेल असे वाटले होते. पण इथे पाहतो तर सारं कसं शांत शांत ! दहा-बारा माणसे वगळता साऱ्या गाड्यांची धावपळ चालू होती. गाड्यांमधून दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष अमरनाथ चावला, ओम् मेहता, हीरासिंग, राधारमण, आदि छोटेमोठे पुढारी आपापल्या गाड्यांमधून येत आहेत. सर्वांचे चेहरे चिमणीएवढे झाले आहेत. पराभवाच्या दुःखाने काळवंडलेले चेहरे बाईंच्या सांत्वनासाठी सहकाऱ्यांबरोबरच प्रत्यक्ष राजकारणात नसलेले व्यक्तिगत संबंधीही येत आहेत. पण त्यांना आज प्रवेश नाही, पत्रकारांनाही नाही. आज फक्त पक्ष व मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनाच सांत्वन करण्याची परवानगी आहे. अरुणा असफअल्ली या जुन्या स्वातंत्र्यसैनिक. सध्या सक्रिय राजकारणातून बाहेर. पण इंदिरा गांधींशी व्यक्तिगत संबंध म्हणून त्या आल्या आहेत. पण त्यांची गाडी गेटवरच अडवली. आत रिसेप्शनमध्ये निरोप गेला. गाडी आत जाऊ देण्यात आली. पण पाच मिनिटांनी ती गाडी परत आली, अरुणाजींना बाईंची भेट मिळाली नव्हती. दुसरी टॅक्सी. बी. बी. सी.चे फोटोग्राफर व प्रतिनिधी उतरतात. आत जातात. पण त्यांनाही भेट न मिळाल्याने ते परत येतात. येणाऱ्याजाणाऱ्या या गाड्या पाहत आम्ही काही बघे ('पत्रकार') आणि १०।१५ इतर लोक उभे आहोत. शेजारच्या ग्रुपमध्ये एक गरीब बिचारा काँग्रेस कार्यकर्ता आहे. खादीचे कपडे. मध्यमवयीन. श्रीमतीजींवर असीम भक्ती. त्यांच्या पराभवाबद्दल तळमळीने तळतळाटाने पराभवाची कारणमीमांसाही सांगतोय. त्याच्या मते 'यह उनकी जीत नहीं, हमारी हार है', आमचे कार्यकर्तेच बेइमान निघाले. एक तर, प्रचारकार्यासाठी कार्यकर्तेच नव्हते. पैसे देऊन काही 'कार्यकर्ते' मिळविले पण त्यांनीही पैसे आमचे घेतले, पण काम विरोधी पक्षाचे केले. मतदारांनीसुद्धा पैसे आमचे घेतले, पण मते मात्र त्यांना दिली. इंदिराजींचे सारे घराणे देशासाठी झटते आहे. सबंध घराण्याने देशासाठी मोठा स्वार्थत्याग केला आहे. याची बरोबरी कोणाला येईल ?' बाईंच्या पराभवाने काँग्रेसच्या झालेल्या नुकसानीचे वर्णन करण्यासाठी त्याने अपघाताचे उदाहरण दिले. 'अपघात होतो, माणूस मरतो. त्याच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई मिळते. ड्रायव्हरला शिक्षाही होते. पण माणूस तर जातो. तसा आमचा माणूस तर गेला ना ! हे नुकसान आमच्याबरोबरच साऱ्या देशाचे आहे. त्या पराभूत झाल्या. त्यामुळे विरोधकांचा आत्मा आत

शांत झाला असेल. पण आमची जलन कुणाला कळेल ! ' असेच आणखी काहीबाही तळमळीने तो बोलत होता. बोटे मोडणेच काय ते बाकी होते. त्याच्या सभोवतालचे लोक त्याच्या सुरात सूर मिसळत होते. सर्वसामान्य कांग्रेसजनांची आज ही प्रतिक्रिया आहे. मात पराभवाचे शल्य व दुःख आहे, पण हे का झाले ते पाहण्याची व मान्य करण्याची मानसिक तयारी नाही.

१, रेसकोर्स रोड. यशवंतरावांचे घर. पक्षाचा दारुण पराभव झाला आहे, पण यशवंतरावांचे यश कायम आहे. म्हणून त्यांची प्रतिक्रिया पाहण्यासाठी गेलो. मंत्र्याचा प्रशस्त बंगला. पण एरवी दिसणारी गडबड नाही. एक विचित्र असे तणावाचे, संमिश्र वातावरण. भेटायला येणाऱ्या माणसांची गर्दी नसली तरी, उमाशंकर दीक्षित, शरद पवार, वसंतदादा पाटील, बेलवडी हे आहेत. महत्त्वाची खलबते चालली आहेत. त्यांचा पर्सनल स्टाफ भावी राजकीय परिस्थितीची चर्चा करीत बसला आहे. त्यांच्या दृष्टीने आपल्या साहेबांचे काय होईल हाच सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. तास-दीड तास वाट पाहिल्यानंतर माझा नंबर येतो. मी आत जातो. ओळख सांगतो. यशवंतराव हसत स्वागत करतात. पण त्या हसण्यात एक कृत्रिमपणा जाणवतो. हे मनापासून हसणे नाही हे ओळखू येते. चेहरा चिंताग्रस्त व ताणलेला. उपचारापुरते हसून पुन्हा गंभीर. मला विचारतात, " स्थित्यंतरातली दिल्ली पाहण्यासाठी आलात का ? " मी म्हणतो, होय पण हे स्थित्यंतर पूर्णपणे दृष्टिपथात आले आहे का ? अर्थातच यावर उत्तर नाही. तेवढ्यात त्यांच्या ओळखीचे कोणी रंगभूमीवरचे कलाकार येतात. त्यांच्याशी मग कलेच्या गप्पा. बोलता बोलता निवडणुकीचा विषय निघतो. एकजण यशवंतरावांना म्हणतो, तुम्ही चांगलेच मताधिक्य मिळविलेत. तेवढ्यात दुसरा जॉर्ज फर्नांडिस त्यापेक्षाही अधिक मतांनी आल्याचे सांगतो. स्तुतिप्रियतेला वस्तुनिष्ठ स्पष्टवक्तेपणाचे उत्तर ! अशीच इकडचीतिकडची चर्चा. एवढ्यात पूरबी मुखर्जी आल्याचा निरोप. साहजिकच आमची बोळवण. बाहेर येताच कुणकुण लागते, संसदीय कांग्रेस पक्षाच्या नेतेपदाचे घोंगडे यशवंतरावांच्या गळ्यात अडकविले जाणार. होकाराशिवाय अन्य पर्यायही त्यांना उपलब्ध नाही. दोन दिवसांनी त्यांची अधिकृत निवड जाहीर. बाहेर आनंद दिसत असला तरी आत कुठे तरी दुखावले आहेत. त्याचबरोबर ' स्थित्यंतरा 'ची नक्की जाणीवही झाली आहे; बऱ्याच लवकर, कारण मी भेटलो तेव्हा आणखी निम्म्या जागांचे निकाल जाहीर व्हायचे होते.

राजेंद्रप्रसाद रोडवरील कांग्रेसचे ऑफिस आणि जनपथावरील युवक कांग्रेसचे ऑफिस. दोन्ही ठिकाणी दीड महिन्यापूर्वी नुसती जत्रा असायची. बाहेर गाड्यांची रांग. आत माणसेच माणसे. पण तेही आता ओस पडले आहेत. ज्यांना तिथे जाण्याशिवाय गत्यंतरच नाही अशा अध्यक्ष, सेक्रेटरी या पदाधिकाऱ्यांशिवाय अन्य कोणी इथे आता फारसे दिसतच नाही. राजू – अंतुले – पूरबी हीच काय ती इथली धर्दळ. यूथ कांग्रेसचे तर काय बादशहाच पराभूत झाले आहेत. त्यामुळे त्यांची अलिशान चेंबर सध्या ओस पडली आहे. त्यांच्या क्रांतिकारी पाच कलमी कार्यक्रमाचे बोर्डही अदृश्य झाले आहेत. दोन – तीन महिन्यांपूर्वी ' देशका युवा नेता अब गली का नेता भी नही रहा ' ही तिथल्याच एका युवक कार्यकर्त्याची कॉमेंट.

जनता पक्षाच्या कार्यालयात, नेत्यांच्या घरी आणि सभांमध्ये मात्र अगदी उलट दृश्य. सात जंतर मंतर रोडवरील पत्रकार परिषदांना आता तुडुंब गर्दी असते. पत्रकारांबरोबरच कार्यकर्ते आणि जनताही त्यातच असते. त्यामुळे काही पत्रकारांनाही आत येता येत नाही. म्हणून त्यांनी आता ओळखपत्रे पाहून सोडण्यास सुरवात केली आहे.

जनता पक्षाच्या सर्व संसदसदस्यांनी काल राजघाटावर गांधींच्या समाधीसमोर प्रतिज्ञा घेतली. खासदार, निमंत्रित व पत्रकारांसाठी वेगळी व्यवस्था होती. इतर लोकांसाठी आत प्रवेश नव्हता. पण जनतेचा उत्साह एवढा अमाप की सर्व व्यवस्था कोलमडली. खासदारांसाठीच्या जागेत इतरजणही घुसले. याच कार्यक्रमासाठी देवानंद आणि शत्रुघ्न सिन्हा या सिनेनटांना आणण्यात आले होते. त्यामुळे जनता आपल्या राजकीय हीरोंना विसरून या खऱ्या हीरोंच्या मागे धावली, आणि प्रचंड गोंधळ निर्माण झाला. दोघांना खांद्यावर घेऊन लोक नाचू लागले. आणि जयप्रकाश झिंदाबादची जागा देवानंद झिंदाबादने घेतली ! अनेक खासदारांनी व कार्यकर्त्यांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली. समारंभाचे सारे गांभीर्य व शिस्त त्यामुळे नष्ट झाली असे त्यांचे म्हणणे. राजघाटावरचा हा कार्यक्रम संपवून सर्व खासदार गांधी पीस फाउंडेशन सभागृहात जमले. संसदीय जनता पक्षाच्या नेतेपदी म्हणजेच देशाच्या पंतप्रधानपदी कोणाची निवड करायची ते सर्वसंमतीने तिथे ठरणार. जनता पक्ष आणि लोकशाहीवादी कांग्रेस हे दोन्ही पक्ष मिळून देशाचा कारभार चालविणार असल्याने दोघांच्याही संमतीने नेता निवडायचा आहे. जनता पक्षाचे सर्व खासदार आणि जगजीवनराम, बहुगुणा हे बैठकीसाठी जमले आहेत. नेतेपदासाठी निवडणूक टाळण्याचे ठरले आहे. त्याऐवजी कन्सेन्ससने निर्णय घ्यावा असे ठरले आहे. त्यासाठी इथे सर्व जमले आहेत. पण पुन्हा इथेही तीच अव्यवस्था, गोंधळ, गडबड. चार-पाच खासदारच या बैठकीसाठी हॉलमध्ये जाऊ शकलेले नाहीत, एवढी गर्दी इथे झाली आहे. त्यांपैकी एक खासदार आणि त्या खासदारांच्या राज्याच्या जनता पक्षाचे सेक्रेटरी यांच्याशी बोलत मी उभा आहे. गर्दीमुळे ते खासदार वैतागलेत. या बैठकीनंतर संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये नेता निवडण्याची औपचारिक बैठक होणार आहे. तिला तरी जाणार का, असे खासदारांना विचारले. ते नाही म्हणाले. त्यावर पक्ष-सेक्रेटरींनी बजावले, असं कसं चालेल ? त्या बैठकीसाठी सेंट्रल हॉलमध्ये तुम्हाला जावेच लागेल. कन्सेन्सस काढण्याची नक्की पद्धत ठरली नसल्याने चर्चेअंती राजनारायण ठराव मांडतात, जयप्रकाश नारायण व आचार्य कृपलानी यांना आम्ही नेतानिवडीचे सर्वाधिकार देतो. ते सांगतील तो नेता आम्ही स्वीकारू. ठरावास बाजपेयी, मधू लिमये, प्रकाशसिंग बादल आदि पाठिंबा देतात आणि ठराव संमत होतो. बैठक संपवून सारे बाहेर येतात. बैठक होईपर्यंत जगजीवनराम हेच नेते होणार, असा साधार अंदाज होता. त्यांच्या बाजूनेच सर्वांचा कौल असल्याचे समजले होते. पण बैठकीत काय झाले कुणास ठाऊक. बैठक संपवून बाहेर येताच एक ज्येष्ठ नेते बरेच संतप्त दिसले. सहकाऱ्यांशी बोलताना त्यांनी आपली नाराजी

पृष्ठ ३२ वर

# जनता पक्ष

## विजय मोठा, आव्हानेही मोठी

वा. दा. रानडे

केंद्रातील कॉंग्रेसची तीस वर्षांची सत्तेची मक्तेदारी संपवून जनता पक्ष, लोकशाही-वादी कॉंग्रेस आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या विरोधी पक्षांनी निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळविले. विरोधी पक्षांनी आपसात समझोता करून निवडणुका लढविल्या तर, कॉंग्रेसचा पराभव करता येतो, हे राज्यपातळीवर १९६७ सालीच दिसून आले होते. त्या वेळी आठ राज्यांत कॉंग्रेसने सत्ता गमावली होती. लोकसभा निवडणुकांबाबत विरोधी पक्षांत असा समझोता झाला तर, कॉंग्रेसला केंद्रातील सत्तेवरून हटविणे अशक्य नाही, हे त्याच वेळी दिसून आले होते. असा समझोता यावेळी झाल्यानेच विरोधी पक्ष सत्तारूढ झाले व स्वातंत्र्यानंतर प्रथमच देशाच्या कारभाराची सूत्रे त्यांच्या हाती आली. विरोधकांच्या एकजुटीइतकेच आणीबाणीत लोकशाहीची आणि नागरी स्वातंत्र्याची झालेली गळचेपी हे कॉंग्रेसच्या पराभवाचे आणि विरोधी पक्षांच्या विजयाचे महत्त्वाचे कारण आहे.

निवडणुकीतील विजयापेक्षा विजयानंतरची आव्हानें फार मोठी आहेत. ती जनता पक्ष यशस्वीपणे पेलू शकतो की नाही याची आता कसोटी आहे. पहिले आव्हान कॉंग्रेसपेक्षा अधिक चांगला कारभार करून दाखविण्याचे. पहिल्या सहा महिन्यांतच कारभारात जाणवण्यासारखा फरक दिसून आला पाहिजे. सर्वच प्रश्नांना एकदम हात न घालता सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने निकडीचे व तातडीचे प्रश्न प्रथम हाती घेऊन त्यांची तड लावण्यासाठी ठाम निर्णय घेतले पाहिजेत. पहिला प्रश्न भाववाढीचा. आणीबाणीत अमर्याद अधिकार असूनसुद्धा इंदिरा राजवटीला गेल्या काही महिन्यांत वाढू लागलेले भाव रोखता आले नाहीत. जनता पक्षाने ते करून दाखविले पाहिजे. इंदिरा राजवटीनेही आणीबाणीत काही काळ भाववाढ रोखली होती, पण ती त्यांना टिकविता आली नाही. तसे आपल्याबाबतीत होऊ नये, याची दक्षता जनता पक्षाने घ्यायला हवी. जनता पक्षात विलीन झालेले पक्ष आपल्या जुन्या धोरणाप्रमाणे वागतात की, नव्या परिस्थितीत नवे उपाय योजतात, हे आता दिसून येणार आहे. नवे अर्थमंत्री एच. एम. पटेल माजी सनदी अधिकारी व विसर्जित स्वतंत्र पक्षाचे प्रमुख नेते आहेत. उद्योगपतींच्या हितसंबंधांचे पाठीराखे म्हणून ते ओळखले जातात. भाववाढ रोखण्यासाठी उद्योगपतींचे हितसंबंध दुखवावे लागले तरी, त्याची पर्वा न करता पटेल ठाम उपाय योजतील का? अशी काहींच्या मनात ठाम शंका आहे. याचे उत्तर येत्या काही दिवसांतच मिळेल.

जनतेची दुसरी साधी अपेक्षा स्वच्छ, साधा आणि कार्यक्षम कारभाराची आहे. भ्रष्टाचार आणि खर्चातील उधळपट्टी थांबली पाहिजे, कामे तुंबून न राहता त्वरित निर्णय होऊन ती मार्गी लागली पाहिजेत. आणीबाणीत काही महिने सरकारी कारभारात वक्तशीरपणा येऊन कार्यक्षमता थोडी वाढली होती. पण ही शिस्त व कार्यक्षमता स्वेच्छेने आली नव्हती, आणीबाणीच्या बडग्याचा तो परिणाम होता. काही महिन्यांतच या बडग्याची भीती नाहीशी होऊन पुनः दप्तरदिरंगाई सुरू झाली. शिस्त व कार्यक्षमता कोणी लादल्याने नव्हे, तर त्याची स्वाभाविक आवड निर्माण करण्यावर भर हवा. भ्रष्टाचाराविरुद्ध कडक कारवाई तर हवीच, पण स्वच्छ व साध्या कारभाराचा आदर्श मंत्र्यांनीच घालून द्यायला हवा. भ्रष्टाचाराचीच बहीण वशिलेबाजी. नोकरशाहीस दीर्घकाळ जडलेल्या सवयींचा तो परिणाम आहे. आपली कामे लौकर व्हावीत म्हणून नागरिकांनाही भ्रष्टाचाराचा अवलंब करणे भाग पडते. भ्रष्टाचार एकदा सरकारी पातळीवरचा थांबला की, नागरिकांच्या पातळीवरचाही थांबेल. केवळ मंत्र्यांनी नव्हे तर, सर्व लोकप्रतिनिधींनी आपल्या उत्पन्नाचा तपशील दर वर्षी सादर केला पाहिजे. आतापर्यंत फक्त मोहन धारियांनी तो सादर केल्याची बातमी आहे. इतर मंत्री व खासदार कोणाची वाट पाहत आहेत? चांगले वातावरण निर्माण होण्यास याचा उपयोग होतो. जयप्रकाश नारायण यांची दक्षता समित्यांची सूचना त्वरित अंमलात यायला हवी. निवडणुकीत साधारणपणे हजार–बाराशे मतदारांचे एक मतदान केंद्र होते. दक्षता समित्या कोणी वरून नेमण्याची वाट न पाहता प्रत्येक मतदान केंद्रातील मतदारांनीच सभा भरवून आपापल्या भागापुरती दक्षता समिती निवडावी. जाहीरनाम्यातील आश्वासने पाळली जातात की नाही, यावर या समित्यांचे लक्ष राहील.

विविध प्रश्नांवर आपले मत बनविणे लोकांना सोपे जावे यासाठी निरनिराळ्या प्रश्नांच्या सर्व बाजू त्यांच्यापुढे आल्या पाहिजेत. वृत्तपत्रे, रेडिओ व टेलिव्हिजन याबाबतीत महत्त्वाची कामगिरी बजावू शकतात. एका दृष्टीने रेडिओ व टेलिव्हिजन वृत्तपत्रांपेक्षाही प्रभावी माध्यम आहे. कारण वाचता न येणाऱ्या नागरिकांपर्यंतही ते पोचू शकते. आणीबाणीत ही माध्यमे म्हणजे केवळ सरकारी ध्वनिमुद्रिका झाल्या होत्या. रेडिओ व टेलिव्हिजन यापुढे सरकारी नियंत्रणाखाली न राहता त्यांचा कारभार पाहण्यासाठी स्वायत्त महामंडळ नेमण्यात यावे. काही महत्त्वाच्या विषयांवर लोकसभेत होणारी समग्र चर्चाच ध्वनिक्षेपित करण्यात यावी. वाचकांपुढे विविध दृष्टिकोनातून बातम्या येण्याचे दृष्टीने वृत्तसंकलन व वितरण ही एकाच वृत्तसंस्थेची मक्तेदारी असता कामा नये. 'समाचार' चे विकेंद्रीकरण करून पुनः पूर्वीच्या चार संस्था प्रस्थापित करण्यात याव्या. आणीबाणीत त्रास झालेल्या वृत्तपत्रांना आक्षेपार्ह मजकूर छापण्यास प्रतिबंध करण्यास बंदी करणाऱ्या बिलाची अंमलबजावणी स्थगित करावी.

किमान आणि कमाल उत्पन्नात १ : २० यापेक्षा अधिक तफावत असणार नाही हे तत्त्व निर्धारपूर्वक अंमलात आणले पाहिजे. राष्ट्रीय किमान वेतन ठरवून त्याच्या दसपट कमाल वेतन निश्चित करण्यात यावे. राहणीमान सुधारेल त्याप्रमाणे दोहोंतही वाढ होईल, पण त्याबरोबर तफावत न वाढता ती क्रमाक्रमाने कमी कशी होईल, अशी योजना आखण्यात यावी.

पृष्ठ २७ वर

नक्रुमाकडे सोन्याचा पलंग होता. हेले सिलासी आपल्या कुत्र्यांना कोंबडी खिलवायचा....

# श्रीमंत राष्ट्रे–गरीब राष्ट्रे

भानु काळे

मूठभर जमीनदार व राजेरजवाडे यांचा अपवाद वगळता बहुसंख्य मानवजात ही अनादीकाळापासून गरीबच राहिली आहे. 'श्रीमंती' शब्दात आपल्याला अभिप्रेत असलेली ऐहिक सुखसाधनं वेगवेगळ्या राष्ट्रांतील तथाकथित सुवर्णयुगातदेखील बहुसंख्य लोकांना अज्ञात होती. त्यानंतर गेल्या तीन–चारशे वर्षांत पश्चिम युरोपात घडून आलेल्या काही क्रांतिकारक बदलामुळे सबंध जगाच्या इतिहासाला कलाटणी मिळाली आणि प्रथमच 'श्रीमंत समाज' हा प्रकार अस्तित्वात आला. ह्या बदलांची कारणं आणि त्यांचा परिणाम ह्याचा परामर्श घ्यायचा ह्या लेखात प्रयत्न केला आहे.

## बौद्धिक जागृती

१६ व्या शतकात वैचारिक पातळीवरून मार्टीन ल्युथरने पोपच्या तोवर निरंकुश धर्मसत्तेला आव्हान दिले. लोकांच्या अंधश्रद्धा झुगारून पडायला, दांभिकता दूर व्हायला सुरुवात झाली. ह्या धर्मक्रांतीतूनच पुढे सर्वसाधारण बौद्धिक जागृती निर्माण झाली. बुद्धिप्रामाण्यवादाला धार चढली.

पूर्वजांनी सांगितलं आहे किंवा धर्मग्रंथांत लिहिलं आहे म्हणून एखादी गोष्ट न करता प्रत्येक गोष्ट वैचारिकतेच्या निकषावर जोखायची आणि बुद्धीला पटेल तेच करायचं असा लोकांचा दृष्टिकोन बनला. ब्रिटिश इतिहासकार एच. जी. वेलसच्या शब्दांत सांगायचं तर 'श्रद्धा आणि आज्ञाधारकपणा यांच्याऐवजी ज्ञान आणि स्वातंत्र्य यांना महत्त्व प्राप्त झालं.'

हा बुद्धिप्रामाण्यवाद सर्व भावी क्रांतिकारक बदलांचा पाया आहे, फ्रेंच राज्यक्रांतीच्या दरम्यान, जेव्हा जर्मन तत्त्वज्ञ हेगेलच्या शब्दात 'जगाने डोक्यावर चालायला सुरुवात केली.' तेव्हा, आपल्याला ह्या बुद्धिप्रामाण्यवादाचा कळस आढळतो.

ह्यापूर्वी 'आलीया भोगासी असावे सादर' किंवा 'ठेविले अनंते तैसेची रहावे' अशीच सर्वसामान्य लोकांची धारणा होती. निदान धर्मगुरूंकडून त्यांना तसंच शिक्षण दिलं जात होतं. साहजिकच आपलं जीवनमान उंचावण्याचा पद्धतशीर व आटोकाट प्रयत्न होत नव्हता.

पण आता अचानक ऐहिक समृद्धीचा शोध सुरू झाला. सुखी जीवनाची कास धरणं (persuit of happiness) हा मानवाचा मूलभूत अधिकार व धार्मिक कर्तव्य आहे असं मानलं जाऊ लागलं. स्वप्नांना पंख फुटले. अपेक्षा वाढू लागल्या. वाढत्या अपेक्षा → पूर्तीसाठी केलेले प्रयत्न → तद्जन्य प्रगती → अपेक्षा पूर्तीनंतरही असमाधान → आणखीन भव्य अपेक्षा → प्रयत्न → प्रगती असं चक्र सुरू झालं. ह्यालाच खूपदा 'वाढत्या अपेक्षांची क्रांती' (Revolution of Rising Expectations) म्हणतात.

## विज्ञानाचा उदय

वैज्ञानिक दृष्टिकोनाचं, पश्चिमी संस्कृतीच्या ठळक वैशिष्ट्याचं, मूळ दोन गोष्टींत आहे.

१ : जगाबाबतचा ख्रिश्चन धर्मातील ऐहिक दृष्टिकोन.

२ : ग्रीकांची कायद्याची कल्पना.

बहुसंख्य पौर्वात्य धर्मात व संप्रदायात हे जग मायाजाळ आहे, मिथ्या आहे अशीच कल्पना आढळते. साहजिकच विज्ञानाचा उदय ह्या संस्कृतीत होऊ शकला नाही. कारण 'मिथ्या' गोष्टींचा अभ्यास करण्यात, 'मायाजाळ' उलगडण्यात, कोणी आयुष्य दवडत नाही! ह्याउलट जग हे ईश्वरनिर्मित आणि म्हणून अत्यंत मौल्यवान आहे असं ख्रिश्चन धर्म सांगतो. call thou no thing unclean [कुठल्याही गोष्टीला घाणेरडी समजू नका.] अशी बायबलची शिकवण आहे. त्यासुळे जगातली रहस्यं उलगडणं, सृष्टीच्या नियमांचा अर्थ लावणं वगैरे प्रेरणा निर्माण झाल्या व त्यामुळे विज्ञानाला चालना मिळाली.

ग्रीकांच्या कायदेविषयक कल्पनेत हे विश्व सूत्रबद्ध, नियमबद्ध आहे; विशिष्ट कार्यकारणभावानुसार इथल्या घटना घडत असतात, हे गृहीत धरलेलं आहे. त्यामुळे घटनांचं निरीक्षण करून त्याच्या प्रक्रियांविषयी, परिणामांविषयी नियम आखणं शक्य आहे हा वैज्ञानिक मनोवृत्तीला पायाभूत असा आत्मविश्वास निर्माण झाला.

तरीदेखील विज्ञानाला खरी चालना खूप नंतर मिळाली. ज्युलिअस सीझर सत्तेवर आला (ख्रि. पू. ४५) तेव्हापासून पुढली १७०० वर्षं विज्ञानाचा फारसा विकास झाला नाही. नेपोलिअनच्या हॅनीबॉलच्या फौजाच्याच वेगाने मार्ग काटत होत्या, गॅलिलिओला रोमन लोकांइतकंच गणित येत होतं, सतराव्या शतकातले कारखाने पवनचक्क्यांसारख्या पुरातन साधनांवरच चालत होते. पण सतराव्या-अठराव्या शतकातील बौद्धिक जागृतीच्या काळात गॅलिलिओ, न्यूटन, जेम्स वॅट, बुशनेल वगैरे शास्त्रज्ञांनी विज्ञानाला जबरदस्त चालना दिली.

विज्ञान मानवाचा 'नवा प्रेषित' (New Messiah) बनलं.

लोकसंख्येच्या स्थैर्याचं दुष्टचक्र त्याने तोडलं. त्यापूर्वी स्वास्थ्य → लोकसंख्या वाढ → रोगराई → युद्ध → लोकसंख्येत घट → स्वास्थ्य ह्या दुष्टचक्रामुळे सुमारे २००० वर्षं जगाची लोकसंख्या स्थिर राहिली होती. १७ व्या शतकात सुधारित वैद्यक व आरोग्यशास्त्रामुळे प्रथमच लोकसंख्या वाढू लागली. [ त्याकाळी लोकसंख्येतील वाढ प्रगतीचं द्योतक होती ] वाढत्या, मनुष्यबळामुळे औद्योगिकरण सुकर झालं.

कुठल्याही गुलामाच्या असंख्य पट जास्त काम यंत्र करू लागलं. डॉ. बुकमिन्स्टर फुलर नावाच्या विख्यात शास्त्रज्ञाने १९४० साली एक पाहणी करून निष्कर्ष काढला की, सर्वसामान्य अमेरिकन; यंत्राद्वारे, १५३ गुलामांइतकी कार्यशक्ती वापरतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर, यंत्राअभावी त्याच्यासाठी इतकं काम करायला १५३ गुलामांची आवश्यकता होती. [ यंत्रयुगापूर्वी किती लोकांकडे प्रत्येकी १५३ गुलाम होते ? ] आणि आज त्याच्या गरजा भागायला यंत्राअभावी ६०० ते ७०० गुलामांइतकी कार्यशक्ती लागेल !

लँकेशायरमधल्या यांत्रिक मागावर बंगालमधल्या हातमागापेक्षा हजारपट जास्त कापड तयार होऊ लागलं. वाफेवर चालणाऱ्या जहाजाच्या शोधामुळे हे कापड जगभर विक्रीसाठी जाऊ लागलं. अशा प्रकारे विज्ञानाने मालाचं प्रचंड उत्पादन सुरू केलं व त्यासाठी विस्तृत बाजारपेठही निर्माण केली.

१६–१७ व्या शतकात युरोपिअन देशांमध्ये वसाहतींवरून जी युद्धं झाली त्यामुळेही विज्ञान पुढे रेटलं गेलं. उदा. सागरी युद्धं खेळण्यासाठी बोटींवर पेलतील अशा हलक्या वजनाच्या तोफा–व आवश्यक तो धातु–तयार झाल्या. मानवी इतिहासातील ओझरता दृष्टीक्षेपही युद्धामुळे वैज्ञानिक प्रगतीला कशी जबरदस्त चालना मिळते ह्याची साक्ष पटवेल. युद्धासारखं मानवी कर्तृत्वाला आव्हान कधीच मिळत नाही, पहिल्या महायुद्धाने रणगाड्याच्या रूपाने जगाला ट्रॅक्टर दिला, तर दुसऱ्या महायुद्धाने अणुशक्तीचं वरदान दिलं.

विज्ञानाने असंख्य अभूतपूर्व सुखसाधनं निर्माण केली. सूर्यास्तानंतरही दिव्यामुळे झालेली वाचायची सोय, स्टोव्हमुळे सहजप्राप्य झालेलं आंघोळीचं गरम पाणी, पोलादापासून बनणारी टिकाऊ घरगुती उपकरणं, यंत्रमागामुळे तयार होणारे मुबलक कपडे, रेडिओमुळे घरबसल्या घेता येणारा संगीताचा आस्वाद, छपाईमुळे कमी झालेला स्मरणशक्तीवरचा ताण, कॅनिंग इंडस्ट्रीमुळे सुलभ झालेला स्वयंपाकाचा व्याप, वाहनांमुळे वाढलेली प्रवासाची शक्यता व क्षमता– एक ना दोन; असंख्य सुखं जी पूर्वी केवळ मूठभर लोकांच्या स्वप्नात डोकावत ती विज्ञानाने सर्वसामान्यांच्या दैनंदिन आवाक्यात आणून ठेवली.

## आधुनिक अर्थव्यवस्थेचा विकास :

प्राचीन इतिहासात सत्ता नेहमी राजे व धर्मगुरू यांच्या ताब्यात होती. पण मध्ययुगात पोप व सम्राट यांच्यातील दुहीमुळे दोघांचही वर्चस्व क्षीण झालं व प्रथमच अनेकांच्या हाती सत्ता विभागली जाण्याची ( Plurality of power ) शक्यता निर्माण झाली. निसर्गाप्रमाणे समाजातही कुठलीच पोकळी फार वेळ टिकून राहत नाही. धर्मसत्तेच्या व राज्यसत्तेच्या कमकुवतपणानें निर्माण झालेल्या पोकळीत व्यापारी वर्गाचं महत्त्व वाढू लागलं.

१६ – १७ व्या शतकात युरोपिअन राष्ट्रांत झालेली बहुतेक युद्धं वसाहतींवरून व युरोपबाहेर झाली. आणि जी काही युद्धे युरोपात झाली त्यांमुळे देखील राज्यांतर्गत शांतता फारशी ढवळली गेली नाही. बहुसंख्य पश्चिम देशांत– खासकरून इंग्लंडमध्ये– लोकमताच्या वाढत्या दडपणामुळे राजाचा जुलूम कमी झाला व कायद्यावर अधिष्ठित सुराज्य स्थापन झालं. व्यापाऱ्यांना पैसा साठवायला व भांडवलाच्या रूपाने गुंतवायला प्रोत्साहन मिळालं. पर्यायाने समाजातलं त्यांचं महत्त्व वाढू लागलं. १८५८ पर्यंत बहुसंख्य भारतीय उपखंड इस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात होता. ही कंपनी राजाच्या मालकीची नसून मूठभर व्यापाऱ्यांच्या मालकीची होती. ह्यावरून तत्कालिन इंग्लंडमधील व्यापाऱ्यांच्या वर्चस्वाची कल्पना येईल. त्यांच्या भांडवलामुळेच आधुनिक अर्थव्यवस्थेचा पाया रचला गेला.

बहुसंख्य वसाहतींच्या शोधासाठीदेखील ह्याच व्यापाऱ्यांनी धाडशी दर्यावर्दींना भांडवल पुरवलं. नव्या वसाहतींमुळे त्यांना कच्च्या मालाचे साठे व पक्क्या मालाची बाजारपेठ लाभली. वसाहतीपायी अनेक युद्धं खेळली गेली. त्यायोगे युद्धसामग्रीच्या कारखान्यांच्या व पर्यायाने सर्वच उद्योगधंद्यांचा विकास झाला. वेगवेगळ्या वसाहती धुंडाळणं, पादाक्रांत करणं, तिथे आपलं राज्य स्थापन करणं वगैरे गोष्टी मोठेपणाचं प्रतीक ( status symbol ) बनल्या. लोकांच्या कर्तृत्वाला, हरहुन्नरी स्वभावाला, कार्यप्रवणतेला, विजिगिषु वृत्तीला आव्हान व वाव मिळाला. पर्यायाने आधुनिक अर्थव्यवस्थेला आवश्यक ( किंबहुना एकंदर विकासासाठी आवश्यक ) असे हे गुण पाश्चात्य देशातील तरुण पिढीच्या अंगी बाणले.

सुरुवातीला भांडवलशाहीच्या यशाचं गमक यंत्र हे नसून श्रमविभागणीचं तत्त्व हे होतं. श्रमविभागणीमुळे ३ गोष्टी घडतात.

(१) कारागीर जास्त कसबी बनतो. एकंदर कामाचा अगदी छोटासाच हिस्सा त्याला करावा लागत असल्यामुळे तो, तो हिस्सा जास्त कुशलतेने करू लागतो.

(२) वेळेची बचत. काम जलद होऊ लागतं.

(३) सुधारित यंत्रांची निर्मिती. कामाच्या विशिष्ट हिश्श्याची कारागिरीला जास्त चांगली माहिती झाल्याने तो हिस्सा जलद व जास्त कुशलतेने तयार करण्यासाठी कारागीर यंत्र शोधू लागले. ( आर्थिक मोबदला देऊन व्यापाऱ्यांनी त्याला खूप उत्तेजनही दिलं ) अनेक महत्त्वाचे शोध असेच लागले आहेत. उदा. एक कामगार तारेच्या तुकड्याशी चाळा करीत असताना तारेला विशिष्ट आकार प्राप्त होऊन कामगाराला सेफ्टी पीनची कल्पना सुचली. एडिसनसारखे अनेक विश्वविख्यात शास्त्रज्ञ सुरुवातीला सामान्य कामगार होते.

वेगवेगळ्या युरोपिअन राष्ट्रांतील, तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिआ, दक्षिण आफ्रिका वगैरे वसाहतींतील परस्पर व्यापारामुळे युरोपची संपत्ती कशी निर्माण झाली हृयाचं ॲडम स्मिथने लिहिलेल्या "The wealth of nations" ह्या पुस्तकात उत्कृष्ट वर्णन केलेलं आहे.

तसं पाहिलं तर, व्यापार हादेखील श्रमविभागणीचाच एक व्यापक प्रकार आहे. भिन्न गट भिन्न गोष्टींचं उत्पादन करतात.

पर्यायाने मालाचे उत्पादन व दर्जा वाढतो. संपत्ती निर्माण होते.

जसजसा विज्ञानाचा विकास होत गेला, तसतसा अर्थव्यवस्थेचा पाया व्यापारापासून उद्योगधंद्याकडे सरकू लागला. त्यातूनच आधुनिक market economy निर्माण झाली. एका बाजूला कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन करायचं व दुसऱ्या बाजूला मालासाठी मागणी निर्माण करायची अशी ही दुहेरी व्यवस्था होती.

भांडवलशाही ह्या शब्दाला आज एका शिवीचं स्वरूप प्राप्त झालं आहे ! हा देखील आधुनिक युगाचा एक विरोधाभास आहे. पैशासाठी आपण सगळं काही करतो आणि ज्या अर्थव्यवस्थेने जगात अभूतपूर्व संपत्ती निर्माण केली, तिलाच शिव्या देतो ! तिचा नाश करायची, सोन्याची अंडी घालणाऱ्या कोंबडीची मान पिरगळायची, कास धरतो ! असो.

हे तिन्ही बदल जवळजवळ एकाचवेळी घडून आले. इतकेच नव्हे तर, ते परस्परावलंबी व परस्परपूरकही होते. बौद्धिक जागृतीमुळे जीवनाकडे पाहण्याचा वैचारिक दृष्टिकोन निर्माण झाला व त्यामुळे विज्ञानाला प्रेरणा मिळाली. उलटपक्षी वैज्ञानिक पुराव्याने वैचारिक दृष्टिकोनाच्या इष्टतेचं समर्थन केलं. शास्त्रीय शोधांमुळे उद्योगधंद्यांच्या विकासाला व आधुनिक अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. आपल्या नफ्याचा काही हिस्सा संशोधनात गुंतवून उद्योगधंदानेही विज्ञानाला साहाय्य केलं.

ह्या बदलांचे थोडेफार दुष्परिणामही झाले असतील. उदा. आत्मिक मूल्यांचा ऱ्हास, Permissiveness, प्रदूषण, वर्गविग्रह इत्यादी. पण तरीही ह्या बदलामुळे युरोपच्या समृद्धीचा पाया रचला गेला ह्यात वाद नाही.

ह्या बदलांच्या त्रिमूर्तीवर आधारित पुढे पूर्व युरोप व जपान यांचीही संपत्ती निर्माण झाली. (अमेरिका, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिआ वगैरे ठिकाणचे लोक मूळचे पश्चिम युरोपिअन असल्याने सोयीसाठी ह्या लेखात त्यांचा समावेश पश्चिम युरोपातच केलेला आहे.) फरक एवढाच की, प. युरोपप्रमाणे ह्या देशात हे बदल सामाजिक–राजकीय प्रक्रियांतून उत्क्रांत न होता हेतुपुरस्सर मानवी हस्तक्षेपाने घडवले गेले... ह्याचं श्रेय अनुक्रमे साम्यवादी व मायजी (meiji) क्रांतींना द्यावं लागेल.

आपल्यासारख्या गरीब देशातील माणूस जेव्हा पश्चिमेकडे पाहतो तेव्हा डोळे दिपून जातात. सदैव अंधारात राहिलेल्या माणसाच्या डोळ्यांवर एकदम सर्चलाईट फेकला जावा तशी अवस्था होते. त्यांच्या नाइटक्लब्ज् व सुपरमार्केटस्मधून उतू जाणाऱ्या संपत्तीच्या पार्श्वभूमीवर आपल्या उपासमारीकडे पाहिलं की, पाश्चात्यांचा मत्सर, द्वेष वाटतो. 'आमचं सगळं वैभव ह्यांनीं लुटून नेलं' आमच्या रक्ताच्या पाण्यावर ह्यांचे संपत्तीचे मळे फुलले' वगैरे चुकीचे निष्कर्ष काढले जातात. पश्चिमेचे वैभव रातोरात निर्माण झाले नसून तीन-चारशे वर्षांत विशिष्ट सामाजिक प्रक्रियांतून उत्क्रांत झालेलं आहे ह्याचा सोयीस्करपणे विसर पडतो. ◻

# गरीब राष्ट्रे

संपत्ती निर्माण करणारी ही बदलांची त्रिमूर्ती इतर देशांत का कार्य करू शकली नाही, हे अभूतपूर्व वैभव अन्य देशांत का निर्माण झालं नाही ह्याची कारणं प्रत्येक देशात वेगवेगळी आहेत. पण काही सर्वसामान्य अनुमाने–खास करून भारताच्या संदर्भात लागू पडणारी–विचारात घेण्यासारखी आहेत.

## हवामान

श्रीमंत देश सामान्यतः समशीतोष्ण कटिबंधात व गरीब देश उष्ण कटिबंधात आढळतात हा केवळ योगायोग नसावा.

थंड हवेमुळे युरोपिअनांच्या मूलभूत गरजा वाढतात व गरज ही शोधांची जननी आहे.

उघड्यावर राहणं अशक्य म्हणून थंड वारे आत येणार नाहीत अशी भक्कम घरं आवश्यक होती. त्याद्वारे वास्तुशास्त्राचा विकास झाला. बर्फात अनवाणी चालता येणं शक्य नव्हतं. त्यामुळे बूट तयार झाले. गार जमिनीवर खाली कसं बसवणार? टेबलं-खुर्च्या तयार केल्या गेल्या. ऊबदार कपड्यांची गरज होती. लोकरीचे कपडे विणले जाऊ लागले. हिवाळ्यासाठी चारा-अन्न साठवायचं म्हणून गुदामं, तळघरं तयार झाली. हिवाळ्यात चार महिने बहुतेक वेळ घरातच काढावा लागे. बर्फामुळे बाहेर हिंडणं मुष्कील होतं. इतका काळ घरात कंठायचा मग ते घर सुखकर का असू नये ह्या भावनेतून फर्निचर व तत्सम घरगुती गोष्टी बनू लागल्या. त्यासाठी हत्यारांची गरज निर्माण झाली. पर्यायाने धातुशास्त्राचा विकास झाला. हिवाळ्यात मांस टिकविण्यासाठी आवश्यक म्हणून मसाल्यांच्या शोधार्थ युरोपियन्स बाहेर पडले व सगळं जग पादाक्रांत करून बसले असं लहानपणी आपल्याकडे इतिहासात 'गोरे आले' किंवा अशाच एखाद्या शीर्षकाखाली शिकवलं जाई! ह्या विधानातली बालीश अतिव्याप्ती वजा करता त्यात पुष्कळ तथ्यांश आहे.

थंड हवेमुळे युरोपिअनांच्या मूलभूत गरजा वाढून त्यांच्या कार्यप्रवणतेला व संशोधकवृत्तीला उत्तेजन मिळालं.

उष्ण व दमट हवामान काम करायला प्रोत्साहन देत नाही. एअर कंडिशन्ड ऑफिसात काम करताना जो उत्साह वाटतो तो घामाने पाठीला शर्ट चिकटलेला असताना वाटत नाही!

उष्ण हवेत लोक सामान्यतः आपल्या तातडीच्या गरजा भागतील इतकंच उत्पादन करतात. शिल्लक पडेल इतकं नाही. साहजिकच अर्थव्यवस्था Subsistence level पलीकडे जात नाही. लोकांची मनोवृत्ती अल्पसंतुष्ट बनते. निर्मितीपेक्षा आहे ते साठवण्याकडे त्यांचा कल असतो.

गरीबीचं विश्लेषण करणारे जे ग्रंथ १० वर्षांपूर्वी प्रसिद्ध होत त्यात हवामानाचा उल्लेख क्वचित केला जात नसे. हवामानासारखी निसर्गजन्य गोष्ट मानवी प्रगतीच्या आड येऊ शकते हे कबूल करणं कदाचित अपमानास्पद मानलं जात असावं! परंतु गेल्या १० वर्षांत अनेक समाजशास्त्रज्ञ ह्या कारणाला योग्य ते महत्त्व देऊ लागले आहेत.

उष्ण हवेमुळे प्रगती होऊच शकणार नाही, किंवा उष्ण कटिबंधातले सगळेच लोक आळशी असतात असं मला अभिप्रेत नाहीए. पण सामाजिक उत्क्रांतीवर लोकांच्या विशिष्ट मनोवृत्तीच्या निर्मितीद्वारे होणारे हवामानाचे दुष्परिणाम दुर्लक्षणं मूर्खपणाचं ठरेल.

## हिंदुधर्माला आलेलं विकृत स्वरूप

हा खरं म्हणजे एका स्वतंत्र, वादग्रस्त लेखाचा विषय आहे! इथे केवळ विषयाशी निगडित असे दोन मुद्दे मांडतो.

अ : **पारलौकिक दृष्टिकोन** : हे जग मायाजाळ आहे; ब्रह्म, सत्यम्, जगत् मिथ्या: वगैरे कल्पना सर्वसामान्य हिंदूंत दृढमूल होत्या. [ गेली २००० वर्षं हिंदुधर्माचं जे दैनंदिन स्वरूप बहुजन समाजाला ज्ञात आणि अभिप्रेत होतं तेच फक्त इथे विचारात घेतलेलं आहे. ] ह्या कल्पना विज्ञानाच्या विकासाला रोधक अशा आहेत.

हे विश्व जर आपण मिथ्या, त्याज्य मानलं तर, साहजिकच त्याचा शोध घ्यायचा, त्याच्या व्यवहारांबाबत नियम बांधायचा, अनुमाने सांधायचा, त्यात इष्ट तो बदल घडवून आणण्याचा आपण प्रयत्नच करणार नाही.

विज्ञान हा मुख्यत: विश्वाचा वस्तुनिष्ठ शोध आहे आणि वस्तुनिष्ठ शब्दातच जीवनविषयक ऐहिक दृष्टिकोन अभिप्रेत आहे.

भारतात विज्ञानाचा विकास झाला नाही, ह्याची जी कारणं आहेत त्यात हिंदूंचा हा पारलौकिक दृष्टिकोन हे एक प्रमुख कारण आहे.

ब : **समाजनिष्ठेचा अभाव** : हिंदुधर्माच्या असंघटित स्वरूपामुळे तो सदैव चार भिंतींआड मर्यादित राहिला. धारयती इती धर्म: ही व्याख्या केवळ शब्दकोशापुरती मर्यादित राहिली. ह्याउलट सुसंघटित स्वरूपामुळे ख्रिश्चन धर्म एक सामाजिक घटक (Social Function) बनला. एकंदरीत ख्रिश्चन धर्म हिंदुधर्माप्रमाणे व्यक्तिनिष्ठ नसून समाजनिष्ठ आहे. ह्यामुळे माणसाच्या निष्ठा चार भिंतींआडून समाजापर्यंत पोचायला, कुटुंबाप्रमाणे समाजाची जबाबदारीही आपल्यावर आहे, ही जाणीव निर्माण व्हायला मदत झाली.

व्यक्तिनिष्ठ स्वरूपामुळे हिंदुधर्म एकसंघ समाज कधीच निर्माण करू शकला नाही. अगदी अलेक्झांडरपासून औरंगजेबापर्यंत कुठल्याही परकीय आक्रमकाविरुद्ध हिंदूंनी एकत्र येऊन हिंदू म्हणून लढा दिल्याचं उदाहरण क्वचितच आढळेल.

समाजनिष्ठेचा अभाव भ्रष्टाचाराचं प्रमुख कारण आहे. कायदा, करव्यवस्था, केंद्रिय शासनयंत्रणा वगैरेंवर आधारित समाजसंस्कृतीचे प्रयोग पाश्चिमात्य राष्ट्रांत अन्य जगापेक्षा (गेल्या हजार-बाराशे वर्षांत तरी) जास्त यशस्वी होण्यात, माणसाच्या निष्ठा-वर्तुळात (Sphere of loyalty) झालेली ख्रिश्चन धर्मप्रेरित वाढ हे एक महत्त्वाचं कारण आहे. ज्या वेळी आपली निष्ठा समाजापाशी नसून केवळ कुटुंबापाशी असते, त्या वेळेला आपण कर बुडवणं, लाचलुचपत, वशिलेबाजी वगैरे गैरप्रकारांचा सहजगत्या जास्त अवलंब करतो. बहुसंख्य गरीब देशांत आढळणारा प्रचंड भ्रष्टाचार, हे समाजाचं अजून एकात्म घटकात रूपांतर झालेलं नाही, लोकांच्या निष्ठा अजून आपल्या कुटुंबापुरत्याच मर्यादित आहेत, ह्याचं प्रतीक आहे. [ ह्याचा अर्थ पाश्चात्य देशांत भ्रष्टाचार नाही असं नाही. पण तो समाजाच्या सर्व स्तरांत बोकाळला नसून काही विशिष्ट व तुलनात्मक दृष्टया अत्यल्प घटकांपुरताच मर्यादित आहे. ]

सामाजिक विकासासाठी अत्यावश्यक अशी समाजनिष्ठा दुर्दैवाने व्यक्तिनिष्ठ हिंदुधर्म कधीच निर्माण करू शकला नाही.

## आधुनिक अर्थव्यवस्थेचा अभाव

युरोपात वैश्याला जे महत्त्व प्राप्त झालं ते वर्णव्यवस्थेमुळे त्याला इथे प्राप्त होऊ शकले नाही. देशात सतत होणाऱ्या कलहांमुळे, युद्धांमुळे पैसे वाचवण्याकडे व साठवण्याकडे लोकांचा कल नसे. जेव्हा लोक पैसे वाचवत तेव्हा ते कुठल्याही उत्पादनासाठी गुंतवण्यापेक्षा सोन्याचांदीच्या रूपाने जमिनीखाली पुरून ठेवले जात! [ कोणी चोरू नये म्हणून! ] देशात अंतर्गत सुव्यवस्था, कायद्यावर अधिष्ठित राज्य नसल्यामुळे व्यापाऱ्यांतली असुरक्षिततेची भावना कायम राहिली. भांडवलउभारणी झाली नाही. कार्ल मार्क्सच्या primitive capital accumulation च्या अभावी आधुनिक अर्थव्यवस्था निर्माण होऊ शकली नाही.

व्यापाराला सामाजिक दर्जा (Social status) नसल्याने त्याचा हिरिरीने पाठपुरावा केला नाही. बुद्धिमान, कर्तबगार लोक व्यापाराकडे क्वचितच वळत. एकंदरीत आपल्या समाजात गरिबीचं स्तोम फार. अर्थार्जन करणं म्हणजे जणू गुन्हा मानला जाई, आणि ज्या गोष्टीला आपण महत्त्व देत नाही तिचा विकास व्हायची शक्यता कमी असते!

बचतीशिवाय विकास कधीच होत नाही. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते १% उत्पादनवाढीसाठी किंवा विकासवेगासाठी (growth rate) ३% बचत आवश्यक आहे. २% लोकसंख्यावाढीचा परिणाम निपटून टाकण्यासाठी ६% बचत हवी आणि त्यानंतर ३% ते ५% विकासवेगासाठी, आणखी ९% ते १५% [ एकंदर उत्पन्नाच्या १५% ते २१% ] बचत हवी. बहुसंख्य गरीब देशांत अस्तित्वात असलेल्या subsistence economy त ही बचत ५ टक्क्यांवर क्वचितच जाते.

## कमकुवत शासन (SOFT STATE)

कमकुवत शब्दात कायदे व विकासयोजना अंमलात आणण्याची अनिच्छा वा अक्षमता अभिप्रेत आहे.

गरिबी हटवण्याचे प्रयत्न अयशस्वी होण्याचं हे महत्त्वाचं कारण आहे.

गुणार म्युरडल (Gunnar Myrdal) ह्या विश्वविख्यात स्वीडिश समाजशास्त्रज्ञाने १९६८ साली (ASIAN DRAMA) 'एशिअन ड्रामा' नावाचा २००० पानी, त्रिखंडी ग्रंथ प्रसिद्ध केला. त्याबद्दल त्याला नोबेल पारितोषिकही मिळालं. त्यात त्याने दक्षिण आशियातील-व खास करून भारतातील-गरिबीचं विवरण व कारणमीमांसा केली आहे. त्याच्यामते सामाजिक एकात्मतेच्या अभावातून निर्माण झालेली कमकुवत शासनसंस्था हे सर्वच गरीब राष्ट्रांचं ठळक वैशिष्टच आहे.

कमकुवत शासनामुळे कुठलीच विकासयोजना नीटपणे कार्यवाहीत येत नाही. अगदी डॉक्टरांनी खेड्यात जाऊन दवाखाने काढावेत

पृष्ठ २५ वर

# चक्रमचक्री (७)

# विश्वरूपदर्शन

दिर्घस्मृति विश्वनाथ.

माझा मित्र जयंत परवाच येरवडयाच्या तुरुंगातून सुटून आला. संघाचा तो कार्यकर्ता. १९७५ च्या नोव्हेंबरपासून तो तुरुंगात होता. सालस, सरळ आणि सुस्वभावी माणूस. त्याच्याकडे पाहिल्यावर तो प्रस्थापित सरकार उलथणे तर सोडाच, पण एखादी मेणबत्ती तरी फुंकरीने विझवून टाकील की नाही अशी शंका यायची. पण कोणाला काय वाटेल ते सांगता येत नाही. भारत सरकारला संशय आला की, हा गृहस्थ आपल्याला उलथवून टाकण्यासाठी प्रयत्न करतो आहे. टाकला तुरुंगात. त्याच्या म्हाताऱ्या आई-वडिलांनी त्याची आशा सोडलीच होती. पण परवा २२ मार्चला सुटला अखेरीस. त्यानेच मला ही विलक्षण हकीकत सांगितली.

निवडणुका संपून निकालाची वेळ जवळ येत चालली तसतशी उत्सुकता वाढत चालली. पण आपणा तुरुंगाबाहेर असलेल्या मंडळींच्या उत्सुकतेची तुलना, सुटकेची सर्व आशा निवडणुकीच्या निकालावर केंद्रित झालेल्या बंदिवासातल्या मंडळींच्या उत्सुकतेशी करताच येणार नाही. भूक सगळयांनाच लागते आणि अन्न खाताच संपतेदेखील, पण कोजागरीच्या चांदण्यात फुललेल्या कमलाचे तंतू खाऊन जगणाऱ्या राजहंसाला लागलेली भूकेची आच निराळीच. पांच-सहा दिवस बंदींच्या सतत चर्चा चालल्या होत्या. जुन्या निवडणुकांची, त्या वेळच्या अनुभवांची, कॉंग्रेस पक्षाच्या कारवायांची उजळणी होत होती.

साऱ्या चर्चेचा निराशाजनक निष्कर्षही पुन:पुन: घोळवला जात होता. भारतासारखा विस्तीर्ण देश, मागासलेली अशिक्षित जनता राज्यकर्त्यांजवळ असलेली स्वतःची आणि शासकीय अशी अपार साधनसंपत्ती, राज्यकर्त्या पक्षाची खोलवर पोचलेली पाळेमुळे आणि ग्रामीण जनतेवर असलेली जबरदस्त पकड, एकूण समाजाची कोणत्याही बदलाविषयी दिसून येणारी नाखुशी, पंतप्रधानांची सामान्यजनांवर पडणारी मोहिनी आणि मुख्य म्हणजे विजय मिळवण्यासाठी कोणतेही वैध-अवैध साधन वापरण्याची विवेकशून्य तयारी या सर्व सुभांचा पीळ घालून तयार होणारा दोरखंड शेवटी आपल्या गळयाभोवती आवळला जाणार याविषयी फारसे दुमत आढळून येत नव्हते.

बंदिवासात असलेल्या सर्वांची स्वदेशनिष्ठा संशयातीत होती. आयुष्याची तीस-तीस वर्षे कोणतीही स्वार्थी अपेक्षा न बाळगता, एका संघटनेच्या पायावर त्यांनी वाहिली होती-अशी संघटना की जिने, देशासाठी चारित्र्यवान कार्यकर्ते तयार करणे यातच इतिकर्तव्यता मानली होती; अशा कार्यकर्त्यांनी लावलेल्या कर्तृत्वाच्या दीपमाळेवर जिने आपले नाव कोरून ठेवण्यासही नकार दिला होता. तथापी अशुभाच्या पाली सर्वत्र चुकचुकत असतानाही किल्मिषाचे सावट ज्यावर पडत नाही असे मत विरळाच. त्यामुळे देशनिष्ठेचा संस्कार आयुष्यभर ज्यांच्यावर झाला आहे अशा कार्यकर्त्यांच्या तोंडूनदेखील वैतागाचे उद्गार निघाल्यावाचून राहत नसत. कोणी म्हणत, 'आपल्याकडचे लोक म्हणजे कुत्री आहेत; आम्ही हजारो लोक बंदिवासात खितपत आहोत याची चीड त्यांना कोठून येणार ? आहार-निद्रा-भय आणि मैथुन याच पाशवी प्रवृत्तींत निमग्न असणाऱ्या जनतेकडून कोणतीही अपेक्षा बाळगणे मूर्खपणाचे आहे.' दुसरे काही म्हणत 'अहो, उन्मत्तांच्या टांचाखाली चिरडणे यापलीकडे या समाजाच्या इतिहासात झाले आहे काय ? महंमद कासिमापासून महंमदअली जीनांपर्यंतच्या सुलतानांच्या क्रौर्याला हे लोक बिनविरोध बळी गेले; महंमद गझनी, घोरी, वास्को-डी-गामा, अल्बुकर्क, क्लाईव्ह, डुप्ले अशा उपटसुंभांच्या दरोडेखोरीला यांना आळा घालता आला नाही; अल्लाउद्दीन खिलजी, मलिक काफूर, औरंगजेब, यांनी यांची मंदिरे भ्रष्ट केलेली या मुर्दाडांनी उघडया डोळयांनी पाहिली; वेलस्ली, डलहौसी, कर्झन अशा उन्मत्तांची मग्रुरी यांनी खाली मान घालून सहन केली; गुलामगिरीत शतकानुशतके, पिढयानुपिढया घालविलेल्या या षंढ समाजात पंतप्रधानांच्या त्यामानाने हजार-हिश्श्यांनी मऊ राजवटीला विरोध व्हावा कसा ?' अनर्थांच्या अपेक्षेने झाकोळून गेलेल्या बंदिजनांच्या मनात निराशा, चीड आणि वैताग यांची वादळे घुसमटत होती.

जयन्त याच भांबावलेल्या आणि व्याकूळ मन:स्थितीत रात्री उशीरा आपल्या पथारीवर तळमळत असता एकाएकी तो चमत्कार झाला. विजेचा लोळ टाळूपासून पायापर्यंत जावा अशी विलक्षण संवेदना त्याला झाली. सहस्र सूर्यांचे तेज घनीभूत होऊन त्या तेजाचा स्तंभ त्याच्यापुढे उभा राहिला. लसलसत्या तेजाचे ते थरथरते पीळ हळूहळू स्थिरावत गेले. त्या स्तंभाला लक्षावधी दीप्तिमान् हात, पाय आणि तोंडे फुटल्याचे त्याला दिसून आले. सहस्र बाहू, सहस्र पाद, सहस्र मस्तक आणि सहस्र नेत्र असा जनता-जनार्दन आपल्यापुढे उभा आहे अशी रोमांचकारी भावना जयन्ताला होऊ लागली, दिशा, काल, अस्तित्व यांची जाणीव नाहीशी झाली. 'हर्ष-खेद मावळले, अश्रू पळाले; कंटकशल्ये बोथटली, मखमालीची लव वठली' अशा झपूर्झा अवस्थेत तो धडपडून उभा राहिला आणि त्या विराट पुरुषाला कसेबसे हात जोडून म्हणाला.

'हे जनता-जनार्दना, समाज-पुरुषा, तुझे अद्वितीय तेज मला सहन होत नाही. दश-दिशा आणि सारा अवकाश तू व्यापून टाकला आहेस. तुझी सुरुवात कोठून होते आणि शेवट कोठे होतो ते कळेनासे झाले आहे. तू केव्हापासून अस्तित्वात आहेस आणि किती काळपर्यंत अस्तित्वात राहणार आहेस याची कल्पनाच करवत नाही. तू सनातन, शाश्वत आणि नित्य आहेस. तू अक्षय्य आणि अविनाशी आहेस. काळ, दिशा, भूत, भविष्य, प्रगती, परागती या आमच्या कल्पना तुझ्या विराट् अस्तित्वाचा आटोप करण्यास तोकडया पडतात.'

'हे पुरुषोत्तमा, तुझ्या विशाल देहांत साऱ्या संस्कृतींचे उदयास्त, विविध मानव कुलांच्या इतिहासाचे आलेख, अनेक समाजांच्या जीवनशैलीची चित्रे पहावयाला मिळत आहेत. सिंधु-घाटीत पडलेली मनुष्यप्राण्यांची पहिली पावले; आर्यांची आक्रमणे

आणि स्थिरावल्यावर त्यांनी केलेले यज्ञयाग; ऋषींनी तुझ्याच स्तुतींची म्हटलेली स्तोत्रे आणि व्यष्टी–समष्टीच्या अस्तित्वाच्या मूलाधाराविषयी केलेले गंभीर विचार; बौद्ध युग आणि संघशरण श्रमणांचे धर्मचक्रप्रवर्तनार्थ भ्रमण करणारे तांडे; कालिदास, बाण, भवभूती, दण्डि, भर्तृहरि यांच्या विश्रब्ध चर्चांनी भूषविलेले राजप्रासाद; परकीय आक्रमकांची गरजणारी वादळे आणि त्यांना आवर घालणारे चंद्रगुप्त, स्कंदगुप्त, हर्षवर्धन, पुलकेशी, पृथ्वीराज चव्हाण अशांसारखे वीर; देशभक्तांच्या देदिप्यमान पंक्ती आणि तुझ्याच चिंतनांत मग्न असलेल्या ऋषी, संत, महंत आणि महात्मे यांची तेजस्वी तारांगणे; हजारो वर्षांचा इतिहास आणि तितक्याच वर्षांचा अनागत काल वर्तमानाच्या एका क्षणात तुझ्या ठायी केंद्रित झालेला मी पाहत आहे.'

'हे अतुल तेजस्वी सनातन पुरुषा, सुखदुःखांचे क्षुद्र कण हाती घेऊन जीवन मार्गावर धापावणारे आम्ही नगण्य जीव. पण आम्हा सर्वांना तुझ्या देही स्थान आहे, हे मी स्पष्ट पाहत आहे. किंबहुना आम्हा सर्वांच्या अस्तित्वांच्या साखळीकडे तुला मुळी अस्तित्वच नाही. आमच्या चैतन्याच्या ठिणग्या–ठिणग्यांतूनच तुझे हे विस्तृत, अद्वितीय, अनादि–अनंत तेज बनलेले आहे. आमच्या सुटचा–सुटचा कणतुल्य जीवनांना एकाकार करण्याची किमया तू केलीस आणि त्या किमयेनेच प्रकटरूप होऊन तू राहिला आहेस.'

'हे अनन्ता, विनम्र भावाने तुझ्या पायी लीन होणे, तुझे सतत चिंतन करणे, तुझ्याविषयी श्रद्धा बाळगणे आणि तुझ्या रूपाचे होईल तितके आकलन करून घेणे हा आमच्या सान्त अस्तित्वाला अनंतत्त्व देण्याचा एकमेव मार्ग आहे. पण वेळोवेळी आमच्यात अशा महत्त्वाकांक्षी व्यक्ती आणि त्यांचे अनुयायी निर्माण होतात की, ज्या तुझ्या बरोबरी, करू लागतात; आपल्या क्षणिक जाणिवेत अनंत अशा तुला सामावू बघतात; आपल्या शिपलीएवढ्या कर्तृत्वात आकाशाचा आकार असणाऱ्या तुला पकडून हवे तसे रूप देण्याची दर्पोक्ती करू लागतात. आपले तोकडे आयुष्य कालातीत अशा तुझ्या रूपावर अविनाशी मुद्रा उमटविण्यास अपुरे पडेल याची जाणीव झाल्यावर पुत्र–पौत्रांच्या जीवनात स्वतःच्या आयुष्याचे दीर्घरूप पाहून वंशाच्या कर्तृत्वाचा ठसा तुझ्यावर उठविण्याचा अट्टाहास धरतात.'

'हे दयाघना, अशा वेळी तू धारण करीत असलेले उग्र रूपच मी आता पाहत आहे असे मला वाटते. ते पहा, ज्वालाकुल आणि विक्राळ दाढांनी भरलेल्या तुझ्या विवृत मुखांत अशा महत्त्वाकांक्षी, विवेकशून्य आणि उन्मत्त व्यक्तींच्या झुंडीच्या झुंडी शिरत आहेत आणि विकलांग अवस्थेत बाहेर फेकल्या जात आहेत. पुराने दुथडी भरून वाहणारी नदी समुद्रात गिळली जावी त्याप्रमाणे मनुष्यांच्या रांगांच्या रांगा तुझ्या मुखांत शिरून बेचिराख होत आहेत. वणव्यावर पतंगांनी झडप घालावी त्याप्रमाणे ही माणसे तुझ्या मस्तकावर झडप घालीत आणि वेगाने नाश पावत आहेत.'

'हे ईश्वरा, तू उग्ररूप आहेस, दुर्जनांच्या नाशासाठी निर्दय होणारा आहेस, हे मी आजवर ऐकले होते. पण, हे देववरा, आता तू शान्त हो. दया कर. तुझे रूप आणि तुझे अद्भूत कर्म याची पुरी ओळख मला आता झाली आहे.'

इतके बोलून थरथरल्या अंगाने जयन्त खाली बसला आणि पुनः भानावर आला. तोवर सर्वत्र जाग आली होती. निवडणुकीचे निकाल सगळ्यांना कळले होते. आणीबाणी रद्द झाल्याने दोन–चार दिवसांत आपण सुटणार याची खात्री वाटत होती. पण या सगळ्याकडे एका त्रयस्थ वृत्तीने जयन्त पाहत होता.

दोनच दिवसांनी जयन्ताची सुटका झाली. मी त्याला भेटण्यासाठी येरवडयाच्या बंदिशालेशी गेलोच होतो. मला जयंताने तेथेच ही हकीकत सांगितली आणि पुढील श्लोक म्हटला.

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः।
विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनःपुनः॥

□

# सोलकढी

## □ एककल्ली आणि लोककल्ली इंदिरा गांधी

इंदिरा गांधींनी आपल्या खास ढंगाप्रमाणे अकस्मात लोकसभेच्या निवडणुका जाहीर केल्या आणि अवघ्या दोन महिन्यांत निवडणुका रीतसर संपून नवा अंमलसुद्धा जारी झाला. या सहाव्या लोकसभा–निवडणुकीत काँग्रेसपक्षाचा पराभव झाला. खुद्द इंदिरा गांधींची फर्फटफजिती झाली. संजय गांधी, बन्सीलाल, ह. रा. गोखले, विठ्ठलराव गाडगीळ, विद्याचरण शुक्ल, ओम् मेहता इत्यादी बंदामपिस्त्यांचे पार डाळेमुरमुरे होऊन गेले.

मुळात ही आणि अशी निवडणूक कधी होईल असे कोणाला वाटले नव्हते. पण इंदिरा गांधींनी ती योजली. तिच्याविषयी त्यांचे आडाखेअंदाज काय होते, हे अनंतरावांनासुद्धा सांगता येणे कठीण आहे. एक गोष्ट मात्र नक्की, ही निवडणूक आपल्या प्रतिष्ठेची आहे आणि जवळपास आपल्या एकटीच्याच हिंमतीवर ती जिंकायची आहे, याची जाणीव त्यांना होती. १९७१ सालच्या निवडणुकीत आपल्या प्रभावाची जादू त्यांनी देखिली होती. म्हणून अवघ्या देशभर त्यांनी झंझावाती प्रचार–दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी २४८ भाषणे दिली आणि ३५ हजार मैलांचा प्रवास विमान व हेलिकॉप्टरने केला. काँग्रेसपक्षाजवळ अनुभवी प्रचारक नव्हते असे नाही; पण अंधारात आपलीच एक दिवटी जळताना दिसावी, असे काहीतरी त्यांना वाटत असावे. त्यामुळे त्यांच्या प्रचारात काहीसा बेभानपणा आला. भाषणे यांत्रिक, एकसुरी, शब्दशरण झाली. भाषणांची संख्या वाढत गेली; पण लोकांशी संवाद साधला गेलाच नाही. त्यासाठी लागणारी मनोवृत्ती गेल्या दोन वर्षांत त्या हरवून बसल्या होत्या.

आणि इंदिरा गांधी या चांगल्या वक्त्या कधीच नव्हत्या. समोरच्या ऐकूंशी सहभाव जोडत विचारभावनांचे मकाण वा महाल बांधणे त्यांना कधी जमले नाही. व्यावहारिक राजकारणातले हे अपयश त्यांना डाचत असले पाहिजे. अशी नेतेमंडळी एकीकडे एककल्ली होत जातात, आणि दुसरीकडे आपण लोककल्ली आहोत असे मनाला पट-

वत राहतात. एककल्ली होत जाणाऱ्या इंदिरा गांधींनी आणीबाणी पुकारली आणि राबवली; आणि आपण लोककल्ली आहोत याबद्दल आपली आणि जगाची खात्री पटवू पाहणाऱ्या इंदिरा गांधींनी खुल्या निवडणुका घेतल्या.

इंदिरा गांधींच्या वर्तनातल्या या अंतर्विरोधाची अनंतरावांनी केलेली मीमांसा अपूर्व आहे, याची दखल प्रिय वाचक घेतीलच. खरे म्हणजे या सूत्राच्या अनुरोधाने इंदिरा गांधींच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा वेध घेता येईल, असे वाटते. पण ते काम एखाद्या श्रमिक पत्रकारावर सोपवणे बरे. (अनंतरावांना दुसरे पुष्कळ धंदे आहेत.)

□

## □ साहित्य थिटे असेल; पण साहित्यिक थिटे नाहीत !

मराठी साहित्य थिटे असेल कदाचित, पण मराठी साहित्यिक आजिबातमुळीचबिलकुल थिटे नाहीत, हे पुन्हा एकदा निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. ते तसे सिद्ध व्हायची काही खास गरज होती असे नाही; (सर्वांना ते नीटनिखालस ठाऊक आहे); पण परिस्थितीवशात ते आपले पुन्हापुन्हा सिद्ध होतच असते.

जुन्या झालेल्या आणीबाणीचेच उदाहरण घ्या. या काळात स्वातंत्र्याला लागलेल्या खग्रास ग्रहणामुळे, पुरोगामी का कोण म्हणतात ते सोडून, तमाम मराठी साहित्यिक (यांना 'पुलोगामी' म्हणावे काय ?) खिन्नविषण्ण झाले होते. पण ते गारठूनगळाठून गेले होते असे मात्र समजू नका. त्यांनी आपल्या बेमिसाल साहित्यिक पद्धतीने आणीबाणीवर प्रहारामागून प्रहार केले आणि (आपल्यापुरती) आणीबाणी खिळखिळी करून टाकली. ज्यांना या गूढगुंजनी साहित्यिक प्रतिकारपद्धती उमगल्या नाहीत ते उथळबुच्चे कार्यकर्ते साहित्यिकांना खुशाल टीकाबोल लावत बसले. कार्यकर्त्यांच्या कार्यकोंड्या बुद्धीला वाटायचे, स्वातंत्र्याचा जाहीर उद्घोष करत राहणाऱ्या आणि 'अखेर तुरुंगात पोहोचणाऱ्या दुर्गा भागवत तेवढ्या खऱ्या आणि घरच्या घरी राहून स्वातंत्र्याचे रक्तचंदन उगाळणारे आणि ते उगाळताना 'स्वातंत्र्य-स्वातंत्र्य' असे मनातल्या मनात मोठ्याने आक्रोशणारे मराठी साहित्यिक फक्त नखऱ्याचे. कार्यकर्त्यांचे हे वाटणे बरोबर नव्हते. गोष्ट अशी होती--की, दुर्गाबाई सगळ्या मराठी साहित्यिकांच्या प्रतिनिधी होत्या. दुर्गाबाईंच्या मुखाने सगळे मराठी साहित्यिक स्वातंत्र्याची स्तोत्रे गात होते. त्यामुळे दुर्गाबाई तुरुंगात गेल्या तेव्हा सगळे मराठी साहित्यिकसुद्धा (मनाने–अंतर्मनाने) तुरुंगात गेले होते ! दुसरे असे की, खुद्द दुर्गाबाईंनीदेखील, विचारस्वातंत्र्याचा आग्रह, साहित्यिका म्हणून नव्हे तर एक नागरिक म्हणून, धरला असण्याची शक्यता होती. नागरिक असणे वेगळे आणि साहित्यिक असणे वेगळे. या प्रकारात, दुर्गाबाई आणि इतर साहित्यिक यांच्यातल्या तुलनेला समान संदर्भच उरत नाही.

मग बहुसंख्य साहित्यिकांनी आणीबाणीत काय आणि किती केले ?

पुष्कळ केले; पण ते असे उचलून वट्ट दाखवता येणार नाही.

कारण ते पुष्कळ करताना सर्वविषयी सावधगिरी घ्यावी लागली.

मी माझ्यावरूनच सांगतो: आणीबाणी जारी झाल्याबरोब्बर मी सरसकट मुत्सद्देगिरीने वागायला लागलो. विचार–उच्चार–आचारस्वातंत्र्याचा मी केवढा कट्टर पुरस्कर्ता; पण त्यांचा पुरस्कार मी अशा बेताने आणि बेताबेताने केला की, कोणाला तसा वहीम येऊ नये. त्यामुळे काहीजणांना तर उलट असे वाटून राहिले की, माझा आणीबाणीला पाठिंबाच आहे. (काय हा मूर्खपणा !) कधीकधी माझे मलाच तसे वाटायचे, इतका मुत्सद्दीपणा मी अंगी बाणवला होता. आणीबाणीला विरोध असणाऱ्या मित्रांशी–परिचितांशी खरा संपर्क राहणार नाही, याविषयी मी जागरूक होतो. वरवरचा संपर्क मी कौशल्याने ठेवला. बंदिवानांच्या कुटुंबियांसाठी म्हणून अधूनमधून पैसेही दिले. मात्र आपले नाव कोठे गुंतणार, फैलावणार नाही, याची काळजी घेतली. भूमिगत अनियतकालिकांसाठी मला चिक्कार लिहिता आले असते; पण मूडच नव्हता; आणि जातीच्या साहित्यिकाने मूडशिवाय लिहायचे नसते. नेमक्या या आणीबाणीच्याच काळात घरात इतक्या कौटुंबिक अडचणी उपटल्या की, भूमिगत कार्यकर्त्यांना आसरा द्यायला माझे घर अयोग्य होऊन बसले. कौटुंबिक अडचणींचे कारण पटेना तेव्हा एकदोन परिचित पोलीस–अधिकाऱ्यांना मी अगत्याने घरी आणले आणि आमच्या घरावर लक्ष आहे, ही गोष्ट सगळीकडे सांगून टाकली. आणीबाणीशी लढण्याचे माझे मार्गच निराळे होते: आकाशवाणी आणि दूरदर्शनावर माझे कार्यक्रम व्हायचे; त्या कार्यक्रमातून मी आणीबाणीवर छुपे तडाखे हाणत राहायचो. एकदोन 'तसल्या' पत्रकांवर तर मी सह्यासुद्धा केलेल्या आहेत. इतके कशाला, आणीबाणीला माझा कडवा विरोध असल्यामुळे मी कराडच्या साहित्यसंमेलनाला आवर्जून उपस्थित राहिलो. मात्र संमेलनाध्यक्षा दुर्गाबाईंचे सान्निध्य कसोशीने टाळले. मुत्सद्दीपणानें, स्वागताध्यक्ष यशवंतराव चव्हाणांनी रात्री भरवलेल्या खास मजलशीत सामील झालो आणि आपल्या उदार साहित्यिक भूमिकेशी इमान राखले. त्यामुळे भारतीय शासनयंत्रणा माझ्या बाबतीत गाफील राहिली आणि मला पुष्कळ काही करता आले.

पुढे आणीबाणी शिथिल होऊन खुल्या निवडणुका होऊ घातल्या तेव्हा या परिवर्तनाला आपलाही थोडाफार हातभार लागला आहे, याचे मनाला समाधान होते.

नंतर निवडणुकीच्या प्रचारकार्यात जनता पार्टीच्या बाजूने मराठी साहित्यिक कसे आणि किती उतरले; त्यांनें काँग्रेसच्या बलाढ्य नेत्यांना कसे बिथरवले; महाराष्ट्रात जनता पार्टीला घवघवीत यश कसे मिळाले; आणि यथाक्रम केंद्रात काँग्रेसचे हुकूमशाही शासन कोसळून तिथे जनता पार्टीचे लोकशाही शासन विराजमान करणारी अभूतपूर्व क्रांती कशी झाली, हा लखलखीत इतिहास प्रिय वाचकांना ठाऊकच आहे.

एका परीने ही मराठी साहित्यिकांची सत्त्वपरीक्षाच होती. या निमित्ताने त्यांनी जी कामगिरी बजावली, तिला जगाच्या इतिहासात तोड नाही. म्हणूनच आम्ही या स्फुटाच्या आरंभी म्हटले की, मराठी साहित्य थिटे असेल कदाचित, पण मराठी साहित्यिक अजिबातमुळीचबिलकुल थिटे नाहीत, हे पुन्हा एकदा निर्विवादपणे सिद्ध झाले आहे !

—अनंतराव

# समम–बोनम : ( ३ )

विविधतेने वेडावून विनाशाकडे झेपावणाऱ्या मानव–संस्कृतीला विवेकाचा आदिम उतारा !

## कमिंग ऑफ एज इन् सॅमोआ । मार्गारेट मीड

प्रा. गोपाळ दत्त कुलकर्णी

माणूस नावाच्या बेटाला सागरातल्या लाटांच्या ज्वारभाटाचे उत्सुक आश्चर्य वाटते, नद्यांचे एवढाले उगम आणि एवढे मोठे संगम पाहून स्तिमित व्हायला होते, तारकांकित नीलगगन पाहून उर आभाळासारखे भरून यायला होते; पण त्याला हे केव्हा आणि कसे कळणार की, जगातल्या सर्व आश्चर्याहून थोर आश्चर्य मनुष्यच आहे म्हणून ! What a piece of work is man ! वळवळणाऱ्या किडी–गांडुळांसारख्या अवस्थेपासून आज अवकाश-यात्रा करणाऱ्या पृथ्वीची 'अटक' न मानणाऱ्या माणसासारखी दुसरी अचंबित वस्तू जगात धुंडूनदेखील सापडेल असे वाटत नाही. माणसाचे 'माणूसत्व' त्याच्या चपल धावण्यात आहे ! बलदंड समर्थ बाहूत आहे ? शरीरसौंदर्यात आहे ? नाही ! ! ! माणसाचे सौंदर्य आहे त्याच्या निर्माणक्षमतेत–त्याच्या विचारक्षमतेत–नवनिर्माण हा फक्त मानवी गुण आहे. अशा माणसाचा अभ्यास करणारे जे प्रगत सामाजिक व 'फिजिकल' विज्ञान आहे, त्याला मानवशास्त्र म्हणतात. अनुभवाधिष्ठित व वैज्ञानिक अभ्यास करणारे हे मानवशास्त्र.

या अलीकडेच (म्हणजे भारतात अभ्यासाला भरपूर वाव असून फारसा प्रसार नसलेल्या) भरभराटलेल्या मानवशास्त्राच्या प्रांतात दिग्विजयी यश प्राप्त करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे मार्गारेट मीड–मा. मी. ! मार्गारेट मीड विद्वान वगैरे खूप आहेत–गेली ५३ वर्षे त्या मानवशास्त्राच्या मैदानात आपली वाणी व लेखणी दांडपट्ट्याप्रमाणे गाजवत आहेत. १६ डिसेंबर १९७६ रोजी त्या पंचाहत्तर वर्षांच्या झाल्या. (नशीब त्या मानवशास्त्राचे–अमेरिकेत 'सरप्लस'ची साथ नाही आणि 'जळाऊ' प्राध्यापकांचे पीक आमच्याएवढे उदंड नाही. कै. इरावती कर्वे यांना झालेला मनस्ताप आठवा.) गेल्या त्रेपन्न वर्षांत त्यांच्या विद्वत्तेचा बहुमान करणारी २९ उच्च पारितोषिके–बहुमान वगैरे व २३४ सन्माननीय पदव्या–डॉक्टरेट्स्–त्यांनी मिळविल्या. (त्यांना मुंबई विद्यापीठाने डॉक्टरेट दिली आहे.) लग्ने, मुले, संसार यांचा 'विचार' करण्याच्या वयात-२२-२३व्या वर्षी ही तरुण स्त्री 'सॅमोआ' बेटातल्या आदिवासींचा अभ्यास करण्यात रंगून गेली. वयाची ४५ वर्षे पुरी व्हायच्या आत त्यांची तीन लग्ने झाली व 'मोडली' किंवा 'सुटली.' त्यांनी लिहिलेली १८ जगन्मान्य पुस्तके–त्यांपैकी 'कमिंग ऑफ एज इन् सॅमोआ' पहिले–आजही गाजत आहे. हे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाल्याला आता ५० वर्षे पुरी होतील. मानवशास्त्रावरचे हे पहिलेच पुस्तक की जे कादंबरीप्रमाणे गाजले व आजही तेवढेच तज्ज्ञ व सामान्य वाचक यांच्यात 'मागणी' टिकवून आहे. मार्गारेट मीड व मानसशास्त्र हे आता जगभर रूढ समीकरण झाले आहे. ज्यांना मानसशास्त्र माहिती नाही अशा वाचकांना मात्र मार्गारेट मीड माहिती आहे. म्हणजे,' मार्गारेट मीड जे बोलते, सांगते, लिहिते ते मानवशास्त्र,' अशी व्याख्या होऊ पाहत आहे. (मराठी भाषेत तो मान आहे इरावतींचा ! ) गेल्या पन्नासभर वर्षांत मीडबाईंचे हजारो मैलांचे दौरे–जगाचे, आदिवासी क्षेत्रातले, अमेरिकेत रेडिओ व टी. व्ही. वर भाषणांसाठी केलेले–आजही चालू आहेत. नुकतेच त्यांनी आत्मचरित्र 'ब्लॅकबेरी–विंटर' (Blackberry–Winter) प्रसिद्ध केले. मार्गारेट मीड यांना मुलगी व नात आहे. तेव्हा या मार्गारेट मीड–आजीबाई–(पणजीबाई ? ) म्हणजे मानवशास्त्राचा प्रसार–अभ्यास करण्यासाठी वाहिलेले समर्पित जीवन आहे. मार्गारेट मीडला ज्या 'भुताने' पछाडले आहे त्याचे नाव आहे 'मानव !'

जनसाधारणाला रूढ अर्थाने अवयवांची देणगी असलेल्या व्यक्तींना देखणे मानायची खोटी सवय जडलेली असते. मार्गारेट मीड ही जबरदस्त व्यक्तिमत्त्व लाभलेली कमालीची आकर्षक (फक्त नेत्रांना नव्हे) स्त्री आहे. शरीरयष्टी, त्या हातात बाळगतात त्या जंगली दंडाप्रमाणेच, दणकट आहे. अमेरिकन स्त्रियांत उठून दिसण्यासारखी उंची नाही, मात्र परमेश्वराने एवढी उंची 'समजदारी' दिली आहे की, जगातल्या सर्व स्त्रियांत उठून दिसावी ! अंगात छापील चीटाचा पायघोळ फ्रॉक–म्हणजे एकूण अवतार शाळामास्तरीण छापाचा ! फार तर अगदीच 'बाई' वाटायला नको तर मार्गारेट मीडचीच सेक्रेटरी वाटावी अशा छापाचा. मध्यंतरी पडून घोट्याचे हाड 'कचकले' तेव्हापासून हातात सतत इंग्रजी 'वाय्' आकाराची, आदिवासी भागातून आणलेली काठी असते. सभा, संमेलन, परिसंवाद, विचारगोष्टी अशा मीडच्या हुकुमी क्षेत्रांत त्या : फाटक्या' काठीला राजदंडाचे स्वरूप 'सहज' प्राप्त होते. बोलणेसुद्धा 'मैदानी', 'मर्दानी' नाही ! सरळ, साधे शब्द, परंतु त्यातून मीडबाईंची प्रचंड अभ्यासू वृत्ती, नीरलस ज्ञानसेवा, सखोल ग्रहणशक्ती सदैव प्रतीत होते. आधुनिक अमेरिकेच्या गार्गीचे दर्शन बिदुषीला साजेल असेच साधे आहे.

मार्गारेट मीडनी मानवशास्त्राच्या क्षेत्रात असा आदरभरा दबदबा निर्माण केला आहे की, आज संपूर्ण एक पिढी मानवशास्त्राचे नाव काढले की, मार्गारेट मीडना स्मरते. एका संपूर्ण ज्ञानशाखेला स्वतःचे

जीवन अर्पण करणारे ज्ञानयोगीच आपले रूपही देऊ शकतात. संत ज्ञानेश्वर जसे श्रीविठ्ठलाच्या चरित्राचे सोनेरी पिंपळपान होऊन झुलते राहिलेत तशीच ही ऋषितुल्य विदुषी मानवशास्त्राची 'मूर्ति दुजी ती!' होऊन राहिली आहे. (ऋषी या शब्दाला स्त्रीलिंग नाही का?) ॲरिस्टॉटलला म्हणे, 'चालते बोलते विद्यापीठ' म्हणत, आज मार्गारेट मीडना 'चालते बोलते मानसशास्त्र' ही पदवी त्यांच्या तपःसामर्थ्यामुळे प्राप्त झाली आहे! गीतेला मराठी भाषेत आणून ज्ञानदेवांनी जी किमया केली, तीच माया मार्गारेट मीडनी मानवशास्त्र सुबोध, सोपपत्तिक करून केली आहे. मानव-शास्त्रांतर्गत वंशशास्त्र, आप्तसंबंध व्यवस्था आणि विधी, भाषा व चालीरीती या विषयांवर मार्गारेटबाईंनी विद्वत्तापूर्ण (जड नव्हे) लिखाण केलेले आहे; परंतु बरोबरीने आणि त्यापेक्षा 'जातिवंत कळवळचाने' हवा-प्रदूषण, लैंगिक-समस्या, लोकसंख्या नियंत्रण, नगर नियोजन, 'जनरेशन-गॅप', 'स्त्री-मुक्ती-चळवळ' अणु-शस्त्रांचे संहार-नाट्य, नागरी-स्वातंत्र्ये, स्तनपान, काळचा निग्रोंच्या समस्या, वैराण वाळवंट होत चाललेले शहरी कुटुंब, तथाकथित रोमँटिक (प्रीती) विवाह, पोषण, मानसिक आरोग्य आणि व्यक्ति-सुखाने झपाटलेली-वखवखलेली अमेरिका या सामाजिक संदर्भ व आशय असलेल्या विषयांवर पोटतिडिकेने शरसंधान चालू ठेवले आहे. आजूबाजूला 'सारेच दीप कसे विझू विझू झाले असतानांदेखील बाईंची अभंग, अथांग निष्ठा टिकून आहे. त्यांचा 'आशावाद', निराशावाद समजत नाही, म्हणून जडलेला भाबडा भक्तिभाव नाही. नाथांना जसा हेही दिवस जाऊन चांगले दिवस येतील, याचा भरवसा वाटत होता तसा धीरोदात्त भरवसा बाईंना माणसाच्या भविष्या-बद्दल वाटतो. 'सध्याच्या युगात सततची वादळे, संकटे असली तरी, याच युगात माणसाला परंपरेच्या पोलादी पकडीतून सुटण्याची पहिली संधी प्राप्त झाली आहे. माणूस आज आपले भविष्य हवे तसे घडविण्यास मोकळा आहे.'

आज जगभर सभ्य लोकमनांत मानव-शास्त्राविषयी जी रोमँटिक प्रतिमा निर्माण झालेली दिसते, तिची शिल्पकार ही 'अवघे पाऊणशे वयमान' उलटलेली 'तरुण' विदुषी आहे. विविध संस्कृतींची तुलनात्मक परीक्षणे, निरीक्षणे करणे हा मानवशास्त्रज्ञांचा धंदा आहे. कधीकधी इतरांप्रमाणे त्यांनाही माणसामाणसांची तुलना करावीशी वाटतेच. सभा-परिषदांचे व्यासपीठावर एकत्र आल्यावर मानव-शास्त्रीय विचारांचा ऊहापोह, काथ्याकूट जरूर केला जातो. (याला हिंदीत 'विचार गोष्ठी' म्हणतात)) परंतु सर्व मानव-शास्त्र्यांना जिव्हाळ्याचा-विषय असतो मार्गारेट मीड. संस्कृती या संकल्पनेभोवती मानवशास्त्र फिरत राहते (म्हणून त्याला कल्च. रॉलॉजी म्हणतात.) Culture is the patterned way of life of any people. हा 'आकृती बंधात्मक जीवन मार्ग' त्या समा-जाच्या इतिहासाचा परिपाक असतो. त्या मार्गावरूनच त्या समा-जाला आपल्या भवितव्याकडे वाटचाल करायची असते. अमुक संस्कृती मोठी व तमुक संस्कृती खोटी हा निव्वळ दंभ असतो. मातां-प्रमाणेच संस्कृतीही त्या त्या समाजापुरत्या थोरच असतात हे खरे.

मार्गारेट मीडची मते कधी कधी सनसनाटी उडवून देणारी ठर-तात. वादग्रस्त ठरतात. 'मारी हुवाना' (गांजा/भांग) किंवा दारू-संबंधींची त्यांची मते; 'पेरेंटल मॅरेज' आधी (म्हणजे अपत्यनिर्मिती करण्याआधी) तरुणांना 'स्टयुडंट मॅरेजची' सवलत असावी, त्यामुळे आर्थिक व 'आपत्यिक' ज़बाबदाऱ्या एकदम उरावर पडत नाहीत, हे मत; 'बॅचलर-मदर' (ब्रह्मचारी-माता) अशा काही 'संकल्पाच्या'-म्हणजे 'Ideas with a beard'-दाढी दीक्षित कल्पनांचा जातीच्या आहेत. बाईंचा स्तनपानाचा आग्रह कां तर आईचे दूध आपल्याला चांगले म्हणून नाही, तर आईची उब-माया चांगली म्हणून! Monogamy एकविवाह (जो आपण ख्रिस्ती संस्कृतीतून उचलला व कायदा केला.) टिकायला कठीण विवाह प्रकार आहे; परंतु बहुपत्नीला/बहुपतीत्वही त्याहून कठीण, कारण 'स्ट्रेस व स्ट्रेन' तेवढे वाढतात नां! मीडना स्त्रीपुरुषांत asexual संबंध हवेत कारण त्यांना स्त्रीपुरुषांत 'इंटीमसी' व 'अॅफेक्शन' हवे आहे-'सेक्स'ला फारसे महत्त्व न देता, नव्या अमेरिकन पिढीतल्या तरुणांकडे त्या Brave new worldniks म्हणून पाहतात. टेस्टटयूब बेबीचे प्रयोग माणूस सोडून इतर प्राण्यांचे बाबतीत करा असे त्यांचे सांगणे आहे. मुले ही स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधाचा बाय्-प्रॉडक्ट जरूर आहे; परंतु समाजाच्या दृष्टीने 'मेन-प्रॉडक्ट' आहे. ही मुले 'जबाबदार' नागरिक व्हायची असतील तर, ती आईबापांच्या निवाऱ्यात, कुटुंबाच्या कुटिरात वाढली तरच ठीक आहे. ज्यांचे जन्म संस्थांमध्ये होतात, ते संस्थातच वाढतात व त्यांचा शेवटही तिथेच होतो. हॉस्पिटल्स, प्रयोग शाळा, अनाथ अर्भकाश्रम व तुरुंग या माणसे 'जोपासायच्या' जागा खासच नाहीत! मीडचे सर्वात आनंदी दोन दिवस सांगायचे झाले तर एक ज्या दिवशी त्यांना मुलगी झाली तो, दुसरा ज्या दिवशी या त्यांच्या मुलीला मुलगी झाला तो! मातृत्व ही, अखेर आदिवासी काय, की अमेरिकन काय' स्त्रीची 'परिपूर्ति' ठरते. स्त्रीचा निसर्गसिद्ध 'रोल' 'भूमिका' निर्मातीची-मातेची आहे, म्हणून तर तिला पुरुषांप्रमाणे स्वतःचा 'रोल' गवसण्यासाठी धडपड करावी लागत नाही-कुठे धरणे बांध, कुठे बाँब फेक, कुठे कविता कर, एक का अनेक पुरुषी-धडपडी!

स्त्री-मुक्ती चळवळ म्हणजे छाती उघडे टाकणे नसून, हृदय उघडे ठेवणे, विचारासाठी डोके उघडे ठेवणे, डोळे, कान उघडे टाकणे आहे. जगातली सर्वात विमुक्त स्त्री कुणी असेल तर मार्गारेट मीड आहे. स्त्री-मुक्ती ही स्त्रीत्वापासून मुक्ती नाही. स्त्रीत्वात लज्जास्पद काय आहे? स्वतःच्या दुःखांना-काल्पनिक-स्वनिर्मित दुःखांना गोंजारत बसणाऱ्या स्त्रियांचा मीडना राग येतो. मुलांना जन्म देण्यात लज्जा-कमीपणा वाटून घेणाऱ्या बायांनी लेखक म्हणून उद्योगपती (की माता?) म्हणून, नाना प्रकारचे व्यवसाय करून स्वतःचे काय करून घ्यायचे ठेवले आहे? नोकरी-धरणे, अर्थार्जन करणे म्हणजे स्त्री-मुक्ती आहे कां? (बिचारा आमच्या भारतीय नोकरी करणाऱ्या भगिनींना!) मीड म्हणतात, ज्या पुरुषाला जगात काही भरीव कामगिरी करून दाखवायची असेल, तर त्याला आद्य-अट आहे 'एक पूर्ण वेळ-बायको!'. स्त्रीचा 'स्त्रीर्थ' कशात असेल तर तो दुःखे जिंकण्यात, काबूत ठेवण्यात वा त्यांच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आहे.' त्यांचे सांगणे केवळ परोपदेशे पांडित्य नाही, हे बोलणे आधी केले मग सांगितले या 'ज्ञानी' कुळीचे आहे. समाजसुखाची एवढी स्पष्ट चिकित्सा व सामाजिक समस्यांविषयी

सखोल ज्ञापकता या विदुषी एवढी क्वचितच कुणाला आली असेल ! फक्त 'मानवतेच्या' सुरावर मानव कल्याणाचे गीत गाणारे असे आहे हे मानव शास्त्रांतले मा. मी. घराणे !

मीडबाईंची जिद्द आहे प्रत्येक गोष्टीचे निरीक्षण करण्याची. To observe Everything ! व्यक्तिमत्त्व आणि संस्कृती यांच्या अभ्यासासाठी त्यांनी वैशिष्टयपूर्ण तंत्र आणि मंत्र विकसित केलेले आहे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कृतीचा जसा 'छाप' उमटलेला दिसतो, त्याप्रमाणे 'सांस्कृतिक नवलेवर' व्यक्तीचा "ठसा" गडद उमटलेला दिसतो. आपल्या अभ्यासासाठी 'फोटोग्राफीचे' तंत्रही त्यांनी मोठे छान वापरलेले दिसते. एखाद्या माणसाच्या 'सहज' घेतलेल्या फोटोत त्याच्या संस्कृती संबंधीच्या काही 'खुणा' वाचता येतात.

मार्गारेट मीड स्वतःच्या जीवनाचे वर्णन 'A series of serendipities' असे करतात. त्या स्वतः 'अपनी अदापर फिदा' अशा बेफिकीर तृप्तीच्या डोहात सदैव विहरताना आढळतात. 'I have a lucky star.' मी सुखी मुलगी होते, सुदृढ – हेल्दी मुलगी होते, खायला प्यायला भरपूर होते मला. अगदी डॉक्टरांच्या 'ऑर्डर' बरहुकुम बनविलेली बेबी होते. मला वैफल्य – विपत्ती कधी जाणवली नाही. My guilt is for things I have not done, rather than for things I have done. माझे वैशिष्टच म्हणजे असुखकारक गोष्टी मी चटकन विसरून जाते. माझ्यात इतरांना 'आई' आढळते. –( हे गौडबंगाल मा. मी. ला समजायला खूप वेळ लागला ) I tend to be bread to people. आधुनिक अमेरिकेची 'माता' मीड आजदेखील कार्यरत आहे. मातेच्या ममतेने मानवशास्त्र व त्यांचा अभ्यासविषय असलेला मानव यांच्याकडे 'कासवी दृष्टीने' पाहण्याचे त्यांचे कार्य आजही 'अमेरिकन' पहाटे पाच वाजल्यापासून सुरू होते. हेअर पिननी ठाकठिक बसविलेले पांढरे करडे केस त्यांच्या खाली असलेला मेंदू वा त्याच्याही खाली असलेले हृदय पूर्ण – परिपक्व झाल्याची ग्वाही देते. पूर्वीच्या काळी लौकर इतरांच्या आधी उठून, उंच टेकडीवरून सैन्याची पाहणी-करणाऱ्या सरसेनापतीच्या डोळ्यांनी, अजून खूप मजल मारायची आहे याची जाणीव असलेल्या जिम्मेदार डोळ्यांनी, मार्गारेट मीड हातात राजदंडासारखी वाय – काठी घेऊन आपणा सर्वांची काळजी घेते आहे हे आश्वासक समाधान आजच्या अमेरिकेला –( जगाला सुद्धा ) अगत्य हवे आहे. आपण जिवंत आहोत त्या जगात मार्गारेट मीड आहे, हे 'डिव्हाईन ब्लेसिंग' आहे, ते आणखी अनेक वर्षे तसेच राहो !

□

मार्गारेट मीडनी १९२३ साली मानवशास्त्राच्या प्रांतात प्रवेश केला फ्रँझ बोझसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मानवशास्त्रज्ञाचा हात धरून. गुरू लाभणे हे भाग्याचे असते, ज्ञानी गुरू लाभणे दुर्मिळ असते ! ही विशितली विद्यार्थिनी 'बोझ' (Boas) सरांची व्याख्याने ऐकून अस्वस्थ झाली. मानवशास्त्राची प्रयोग शाळा नळ्या बाटल्यांची निर्जीव नसते, ती असते सळसळणारी, जीवंत माणसाची प्रयोगशाळा. एखादी प्रयोगशाळा नळ्या बाटल्या, पांढरे उंदीर –ससे कागद – फाईल्स् यांच्यासह भस्मसात झाली तर आपण कोण हळहळतो! (मध्यंतरी डॉ. श्रीनिवास या भारतीय सामाजिक – मानवशास्त्रज्ञाच्या अमेरिकन निवासस्थानाला आग लागून त्यांच्या 'मॅग्नम – ओपस' च्या नोट्स. कार्डस् जळून गेली तेव्हा तोंड झाकून आक्रंदताना घेतलेला त्यांचा फोटो पाहण्यात आला होता. आयुष्य–भराची कमाई भारतीय खेड्यांवरचा नियोजित ग्रंथ राखरांगोळी झाला. ) काही वर्षांची कमाई –ज्ञानाच्या क्षेत्रातली – कामी आली म्हणून आपण कोण जीव जाळून घेतो ! परंतु आदिवासींच्या रूपाने – मानवी संस्कृतीच्या प्रयोगाचे – हजारो वर्षांचे 'रेकॉर्ड' आपण आदिवासींना 'Modern' करण्याच्या घाईत गमावून बसतो त्याचे काय ? अगदी याच हातांनी निसर्गाचा महान प्रयोग माती करून टाकतो त्याचे काय ? ते थांबविता येणार नाही कां ?

मार्गारेट मीडचा पहिलाच ग्रंथ Comming of Age in samoa सॅमोआ बेटावरचे ( मुलींचे ) वयात येणे' जगभर गाजला. आदिवासींच्या sex व Adolescence चा हा अभ्यास आहे. बेस्टसेलर–प्रमाणे, सहस्रावधी प्रतींच्या त्याच्या डझनभर आवृत्त्या निघाल्या. हा ग्रंथ लिहिण्यामागे कुठलाही अभिनिवेश नाही ( शास्त्रज्ञाला – ज्ञानी माणसाला 'आग्रही' असून चालते का ? ) बी. ए. झालेली ही 'बाई' नव्हे– मुलगी घरातून उठली ती थेट अॅडमिरॅलिटी बेटा–तल्या एका गावी – सॅमोआत जावून धडकली. कंदिल – दिवा बरोबर न्यायची त्यांना आठवण नव्हती. ज्ञानदीप अंतर्यामी प्रज्व–लित झाला की बाह्य उजेडाची फारशी गरज उरत नसावी ! ( गौतमबुद्ध राजगृहातून बाहेर पडताना एव्हरेडी – बॅटरी घेऊन निघाला होता का ? अशा संसारातून उठलेल्यांची एव्हरेडी – बॅटरी असते –आंतरिक ओढीच्या आभेची ! ) हे पहिलेच मानवशास्त्रीय पुस्तक पहिल्याच कसोटीसामन्यात ठोकलेल्या धुवांधार शतकाप्रमाणे गाजले ! त्याने जी सुरुवात केली –मीडचे बुद्धिकौशल्य, उद्योग–शीलता व तरतरीत ताजेपणा या गुणांचे दर्शनाची– ती आज ५० वर्षे झाली तरी अजून तशीच टवटवीत आहे.

'सॅमोआतला' समाज हा असा समाज आहे की जिथे वयात येणाऱ्या मुलींवर 'stress and strain' नसल्याचे दिसते. आप–ल्याकडे किशोरीचे 'वयात येणे' म्हणजे त्यांना व त्यांच्या आप्तांना कोण डोकेदुखी असते ! कळ्यांची फुले होताना वेदनांची गरज नसावी; पण आमच्याकडे ( अमेरिकेतही ) आहे. सॅमोआत हे लचांड नाही. कारण लैंगिक वर्तनविषयक 'नकार' Don'ts व इतर मूल्यात्मक' ( Values ) संघर्ष नाहीत. प्रगत संस्कृती परमेश्वरा–सारखी 'नेती' – नीती ने भारलेली दिसते. आमच्या शिवशंकराच्या पत्नीचे नाव आहे 'उ–मा' –म्हणजे मराठीत 'अग, नको '– Oh Dont ! त्या अर्थाने आमच्या सर्वच स्त्रिया 'उमा' आहेत ! वयात येणे ही गोष्ट काही कमी कष्टाची करण्याचा मार्ग म्हणजे नियमने – निर्बंध कमी करणे ! परंतु हा मार्ग आहे व त्यावरून चालू तर आमच्या 'उच्च' संस्कृतीचे काय ?

मार्गारेट मीडच्या ग्रंथांचे वाचन ही एक साहित्यिक मेजवानी असते. सुसंस्कृत इंग्रजी शैली, वर्ण्यविषयातील तन्मयता' क्लिष्ट परिभाषेचा (Jargon) तिटकारा ही मीडच्या लेखणीची वैशिष्टये आहेत. 'सॅमोआ 'मध्ये मार्गारेट मीडचा म्हणतात तो सिद्धांत (त्या स्वतः तसे म्हणणार नाहीत) पानोपानी साकार होतो. व्यक्तींची

व्यक्तिमत्त्व वैशिष्टये किंवा गुण ही त्यांच्या सामाजिक 'कंडिशनिंग 'ची फळे आहेत, म्हणजेच ते त्या व्यक्तीचे उपजत गुण (Innate human nature) नव्हेत. विसाव्या शतकात मानवावर संस्कृतीचा (सिविलिझेशन) प्रभाव वाढत आहे, ही वस्तुस्थिती आहे. मानसशास्त्रज्ञ 'ठाठासून' सांगतात की, बालकावर त्याच्या वाढत्या वयात (fomative years) पडणाऱ्या प्रभावांचा जन्मभर संस्कार होऊन टिकून राहतो. घडविणारे व बिघडविणारे घटक या वयात अंगवळणी पडून 'अंग नोहेची अवयवु' बनून राहतात. मार्गारेट मीडसारखे मानवशास्त्री विभिन्न पार्श्वभूमी (Setting) लाभलेल्या जनजातींचा अभ्यास करून या सिद्धान्ताला नवी दृष्टी देतात. मीडबाई सॅमोआत गेल्या, पॉलिनेशन जमातीची भाषा शिकल्या, 'अनवाणी' चालायला, जमिनीवर बूड टेकवून बसायला शिकल्या, त्यांच्यात त्यांच्यातल्या होऊन एक वर्षभर राहिल्या. 'सॅमोआ' हा ग्रंथ या संवत्सराच्या विजनवासाचा परिष्कृत परिपाक आहे. या ग्रंथाचा विशेष भर 'किशोरावस्था' या 'वेडया वयावर' आहे. 'मूलभूत मानवीगुणांचा' चिकित्सक दृष्टीने केलेला अभ्यास म्हणून या अभ्यासग्रंथाचे महत्त्व अनन्य आहे.

गेल्या शे-दीडशे वर्षांत पालक व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या गरज-जरूरीनुसार शिक्षण घडविण्याचा 'महंमदी-प्रयत्न' चालविला आहे. ही प्रक्रिया सुरू करण्याची गरज मानसशास्त्राच्या विकासामुळे तसेच युवकांच्या वाढत्या 'अडचणी' व मालअॅडजस्टमेंटस्‌मुळे निर्माण झाली. ज्याला वैज्ञानिक 'अॅडोलेसन्स्' म्हणतात. (किशोरावस्था) त्या वयासाठी काही तुरंत व टिकाऊ उपाययोजना आवश्यक होती. जुनी माणसे व त्यांचे आदर्श, मूल्यव्यवस्था, नियमने यापासून नवी माणसे फटकून बेफिकिर वागताना आढळू लागली. कुळाची वा कुटुंबाची आदर्शके (Ideals) यात नव्या पिढीला स्वारस्य नाहीसे दिसू लागले. किशोरावस्था म्हणजे आदर्शांची स्वप्नभूमी—भासांची भूमी तितकीच प्रस्थापित 'वडिलांच्या' सत्ते-विरुद्ध 'जिहाद' पुकारण्याचे स्थळ असे मानण्यात येऊ लागले. अडचणी आणि संघर्ष ही किशोरावस्थेची व्यवच्छेदक लक्षणे गणली जाऊ लागली.

मीडबाईंचा दृष्टिकोन मानवशास्त्रीय आहे. मानवशास्त्रज्ञ हा 'माणूस' या विश्वव्यापी विषयाचा विद्यार्थी असतो. मानवशास्त्र जाणते की, सामाजिक पर्यावरणाची भूमिका (Role) व्यक्ति-जीवनातील फार मोठा घटक अशी आहे. म्हणजे प्रश्न असा उद्‌भवतो की, किशोरावस्थेतल्या समस्या निव्वळ त्या 'वयामुळे' आहेत की, त्या 'वयात' अमेरिकेत (किंवा महाराष्ट्रात!) असल्यामुळे आहेत? आदिवासींचे एक बरे असते. जास्त गुंतागुंत—संमिश्रता नाही. सिंपल सोसायटी—सिंपल पीपल! प्रत्येक छोट्या-मोठ्या आदिम समाजाने मानवी जीवनाचा एक संच, पुंज आपल्या-पुरता निर्माण केला. (हिंदुपद्धतीने सप्तपदीयुक्त सप्तरंगी विवाह-विधीही आणि आईस्क्रीम खाऊन-खिलाऊन 'जंबो' रिसेप्शन हा प्रकारही) एकच सामाजिक संघटन (विवाहाचे वय वाढवायचा कायदा करायचा. मात्र ही वाढलेली घोड नवरा-नवरी 'शुचिर्भूत' ब्रह्मचारी असावेत ही अपेक्षाही बाळगायची.) एकच धर्म (निधर्मी-पणाच्या नावाखाली धर्मभेद जोपासण्याचा प्रकार नाही!) ह्या एकेक गोष्टी ही आदिम समाजांनी मानवी संस्कृतीला दिलेली अनन्यसाधारण देणगी आहे. म्हणून जर संस्कृतीच्या (तथाकथित) उच्च पातळीवर असलेल्या आपल्या दृष्टीसमोर अशी एखादी आदिवासी संस्कृती आली तर, तुलना व विभेद या तंत्राचा वापर करून आपला आपण 'शोध' घेण्याची सोय होईल. कदाचित आपल्याला आपली मुले मोठी होताना त्यांना काय हवे आहे, कोणते शिक्षण 'आरोग्यवर्धक' ठरेल याचा 'पत्ता' लागू शकेल.

चांगल्या मानवशास्त्रज्ञाला विशाल अनुभव आणि अवलोकन-वाचनातून आलेले विविध ज्ञानशाखासंबंधी सखोल ज्ञान असायला लागते. मार्गारेट मीडबाईंच्या 'सॅमोआ'मध्ये उपरोल्लेखित चांगल्या मानवशास्त्रज्ञाच्या कसोटीला बाई भरपूर गुणांनी उतरतात. ग्रंथाची चौदा प्रकरणे आहेत. पाच परिशिष्टे, दोन तालिका (Tables) आणि इतर सामग्रीही आहे.

## सॅमोआत जीवन असे चालू होते

सॅमोआत दिवस भल्या पहाटे सुरू होतो... या वाक्याने वाचन सुरू होते; ते न कंटाळता भली रात्र झाली तरी चालूच राहते. (आपल्याकडे अशी सुंदर लेखनाची भट्टी इरावतीबाई आणि दुर्गाबाई आणि गोदावरीबाई यांना साधली आहे ना? मला राहून राहून वाटते मानवशास्त्राच्या क्षेत्रात या बायका एवढ्या पुढे कशा? रूथ बेनिडीक्ट, मा. मी., इरावती, दुर्गाबाई एटअल etal) सॅमोआत पहिले बाळंतपण कुठल्याही स्थितीत माहेरी होते. प्रथेप्रमाणे बाळंत होणाऱ्या स्त्रीभोवती वीस-तीस स्त्रीपुरुषबालक हजर असतात. बाळंतीणीने कण्हणेकुंथणे, रडणेभेकणे करायचे नसते! बाळंतपण उरकल्यावर ही मंडळी हसत खेळत, मस्करी करीत घरी परतते. नवजात बालकाला दुसऱ्या आठवड्यापासून पपया, नारळाचे दूध उसाचा रस दिला जातो. किंवा आईने चावून मऊ केलेले पदार्थ बोटाने चाटवून भरविले जाते. मुलांना ती किंचाळली की, खायला घातले जाते. नियमितपणा वगैरे नसतो. (आहारशास्त्रज्ञ, मानस-शास्त्रज्ञ व बालसंगोपनशास्त्री हो बघा—) सॅमोआतली मुले बोला-यच्या आधी चालायला शिकतात. नवव्या महिन्यात चालू लागतात. मुलावर खेकसले तरी त्यांची 'बालमने' दुखावल्याचे दिसत नाही! रडणाऱ्या मुलाला वडिलधाऱ्या मंडळींना ऐकू येणार नाही अशा अंतरावर नेले जाते—रडण्यासाठी!

लहान मुली (६-७ वर्षांच्या) घरातले सर्वांत महत्त्वाचे काम करतात—म्हणजे तान्ही पोरे सांभाळण्याचे—कडेवर घेऊन किंवा पाठकुळी घेऊन फिरत राहतात. म्हणजे तिथल्या मुलींच्या जीवनातला खडतर काळ कुठला असेल तर हा—धाकटी भावंडे सांभाळण्याचा! विणणे, टिपणे घरात शिकविले जाते. मुलींच्या मानाने मुलांना पोटापाण्याचे बरेच धंदे—घरबांधणी, मच्छीमारी, भाषणबाजी, लाकूड कताई वगैरे—शिकावे लागतात. जितकी कौशल्ये अधिक शिकाल तेवढे कष्ट अधिक करावे लागतात, हे ओघानेच येते. सॅमोआत प्रतिष्ठा प्राप्त होते 'मताईना' (Matal). ते मुखिया असतात—त्यांना पदव्या असतात, आप्तसंबंध व्यवस्था व प्रामुख्याने वयाला मान असल्यामुळे गावातल्या प्रत्येकाचे दुसऱ्या 'प्रत्येकाशी' 'जवळजवळ' नाते असतेच. तेव्हा पोरे दिसली की, कामे सांगितलीच! मुलांवर आईबाप पिसाळले की, पोर कुठल्यातरी नातलगाच्या

घरांचा आश्रय घेते. अशा वेळी संरक्षण चांगले मिळते. मार चुकतो. रागावणे चुकते! स्त्री-पुरुष स्पर्श टळतात. मुलगी वयात आली की, स्वयंपाक, माशांची शिकार, शेतावर जाणे ही कामे करते. बायकांचे क्षेत्र घरापुरते मर्यादित आहे. बायकांत वाक्चातुर्य, सुपीक कल्पनाशक्ती, युक्तिबाजपणा व भरवशाची स्मरणशक्ती हे गुण सद्गुण म्हणून पाहिले जातात.

मुलांमुलींत पहिला स्थिरभाव ( attitude ) दृग्गोचर होतो तो परस्परांत मिसळणे, 'त्याची नवरी तू'; 'तिचा नवरा तू' अशी थट्टा दिल्लगी चालू असते. विवाहाव्यतिरिक्त लैंगिक संबंधाचे आणखी दोन प्रकार सॅमोआत आढळतात. अविवाहितांची प्रेमप्रकरणे आणि व्यभिचार–या दोन्ही प्रकारांना सॅमोआत 'औपचारिक' मान्यता आहे. असे प्रेम करण्यासाठी मध्यस्थ (Soa) नेमले जातात. हे 'दूत' प्रेममार्ग सुलभ करतात. गोऱ्या संस्कृतीशी संपर्क आल्यानंतर लैंगिक संबंधाचा बलात्कार नामक आविष्कार अधूनमधून सॅमोआत दिसू लागला. त्यांच्या दृष्टीने कुँवारपण ( virginity ) हे संशयास्पद व निरर्थक गोष्ट आहे. अर्थात् कुमारिकांना लग्नाच्या बाजारात मोठी मागणी असते. पूर्वी सर्वासमक्ष 'टीफ्लॉवरेशनचा' ( कौमार्यभंग ) सोहळा होत असे. चोरटे प्रेम चंद्रप्रकाशात माडाच्या झाडाखाली किंवा झुडुपाच्या आडोशाने चालते. घरातून विवाहाला विरोध झाला तर प्रेमी सरळ पळ काढतात, व लग्न करतात. आपल्या संस्कृतीत आढळणारे 'रोमँटिक–प्रेम' हा सॅमोआत थट्टेचा विषय आहे. नाहीतरी आपली प्रेमाची कल्पना एकविवाह, मत्सर, परस्पर, प्राणांतिक निष्ठा अशा 'अशक्य' गोष्टींनीच वेढलेली आहे! आपले प्रेम करणे म्हणजे परस्परांवरचे 'सर्व हक्क स्वाधीन' असला 'कॉपीराईटचा' प्रकार नाही कां? विवाहानंतर व्यभिचार घडला तर विवाह मोडतोच असे नाही. व्यभिचारादंड म्हणून मोठ्या समारंभाने चटया अपमानित पतीला सादर केल्या जातात. सॅमोआतले एकपत्नी / एकपतीव्रत तसे निसरडे आहे. किरकोळ किल्लीने खुलणाऱ्या कुलुपासारखे!

नाच ही सॅमोआतली सामुदायिक कृती आहे. या नृत्य समारंभांना हजर राहून छोटी पोरे, पाहून पाहून, नाचायला शिकतात. नृत्य चालू असताना मोठी माणसे, तरुण पोरेपोरी 'मेकूप–कॉस्च्युम्स' बदलून येत राहतात. सतत खेकसणे ऐकणाऱ्या मुलांना नाचाच्या निमित्ताने आवर्जून मोठ्या माणसात मिरवता येते. नृत्यामुळे अंगे लवचिक वगैरे होतात. ती होत असतील, परंतु नसती लाज गळून पडते. (आमची अजून स्वातंत्र्यानंतर ३० वर्षांनी राष्ट्रगीत गाताना लाजून कोण गाळण उडते?) अर्थात् नाचात प्रावीण्य नसलेल्यांना न्यूनगंड वाटतो ( इथे आपले शिक्षण व सॅमोअन् नृत्यात साम्य आढळते ) व्यक्तिमत्त्वाच्या गुणविशेषांना नृत्याच्या निमित्ताने हातभार लागतो.

कुणी आजारी पडले तर, प्रथम नातलगांचे 'सांत्वन' केले जाते. विशेषत: भगिनींचे! भगिनींचा कोप हा भावांच्या आजाराचे प्रमुख कारण मानला जातो! सॅमोअन भाषेत 'तर–तम'–भाववाचक शब्दप्रयोग नाहीत. चांगले ते सर्व चांगले, सुंदर ते सर्व सुंदर, वाईट व कुरूप ते सर्व वाईट व कुरूप! सॅमोआतल्या मुलांना 'बायॉलॉजी' व 'मृत्यू' गूढ नसतात. शरीरवृद्धीचे विधी, संभोग, मृत्यू व मृत्यूचे कारण शोधण्यासाठी केलेली मृतदेहाची चिरफाड या गोष्टी मुले सर्रास पहातात. त्या मुलांना मानसिक धक्का वगैरे काही बसत नाही. दहादहा वर्षांची पोरे रात्री बेरात्री झुडुपामागे चालणाऱ्या प्रेमाची 'साक्षी' असतात.

रस्त्यात परस्परांना भेटणारी वडिलधारी नाकावर नाक घासून सलाम करतात. बायका परस्परांना भेटल्यावर परस्परांच्या योनिप्रदेशाला मजेने चिमटे काढतात! परस्परांचा स्पर्श टाळणारे असले तरी, एकादा तरुण चक्क गावगर्जना करून प्रेयसीला सांगतो 'रात्रीं अंधरुणात वाट पहा बरे का! मी येतो आहे!' मुलांना निरागसपणाच्या नावाखाली नेभळट बनविण्याचा सुसंस्कृत प्रकार सॅमोआत नाही. ऋतुप्राप्तीच्या वेळी मुलींना फारशा वेदना होत नाहीत. ऋतु काळात कामधाम सोडून बसलेल्या 'सॉरीडॉन' तरुणी सॅमोआत दिसत नाहीत. आमच्या इकडे ऋतुकाळाला 'विटाळ' तर इंग्लीश मध्ये 'शाप' ( Curse ) म्हणतात. चक्कर येणे, जीवघेण्या कळा येणे वेणा येणे या गोष्टी सॅमोअन स्त्रियांना 'थापा' वाटतात. ऋतुप्राप्तीत लाज शरम यांचा घोळ नसतो. लहानमुले देखील मुलींच्या ऋतुप्राप्तीची चर्चा निःसंकोचपणे करतात. ऋतुप्राप्ती झाली म्हणजे लैंगिक संबंध सुरू असेही समीकरण आढळत नाही. अशा निवान्त वातावरणात वाढल्यामुळे सॅमोआत स्त्रियांना थंडपणा (Frigidity) व पुरुषांचे नपुंसकत्व ह्या समस्या नाहीत. रात्रीतून एक संभोग हे सॅमोअन मर्दानीपणाला पुरेसे ठरते!

रोमिओ आणि ज्युलिएटची गोष्ट ऐकून ( मा. मी. कडून ) सॅमोअन स्त्रिया पोट धरधरून हसल्या! किशोरी आहे तोवर भरपूर प्रियकर असणे, नंतर आपल्या खेड्यातच कुणाशीतरी विवाह करणे, खूप मुले होणे यातच सॅमोअन स्त्री आपली सार्थकता मानते. एकूण सामाजिक व व्यक्तिगत संघर्षांचे प्रमाण तुलनेने कमी आढळते याचे कारण समुदायाशी व्यक्तीचे–संस्थीकृत नाते घनिष्ट करण्यात आलेले नसते ( जसे आपल्या संस्कृतीत असते. ) सॅमोआतली घरे दिवसा उघडी टाकूनच सर्व व्यवहार चाललेले असतात. ( कड्याकुलुपे लावण्याचा प्रकार नाही ) जशी घरे तशी माणसे! सॅमोआतले जीवन सरळ व साधे आहे. कारण जीवनाचा डाव 'हायस्टेक्स्' लावून कुणीच खेळत नाही. एकूण वातावरण आहे ते 'जनरल कॅज्युअलनेसचे–' सहजपणे मुले वाढतात-तरुण होतात? पणाला सर्वस्व लावले नाही की 'पाडाव' होण्याची वेळ येत नाही. बाप मुलावर रागावला तर मुलगा रस्ता ओलांडून नातलगाचा आसरा घेतो. गाव व व्यक्ती यांच्यात संघर्ष उभा राहिला, तर व्यक्ती शेजारच्या गावात रहायला जाते. दारिद्र्य किंवा संकटे त्यांना खचवून टाकू शकत नाहीत. पापे फार नसल्यामुळे देवांचा बडेजावही फारसा नाही! राग, लोभ, प्रतिशोध, प्रेमभंग, दुःख पुरावा आठपंधरा दिवसात विसरण्याच्या गोष्टी आहेत. काळजी घर करून राहणे, हा प्रकारच नाही. म्हणून आपल्या समाजाच्या तुलनेत आपसमायोजित (Malad justed) व्यक्तीचे प्रमाण तिकडे जवळजवळ नाहीच. असा आहे मीड प्रस्तुत सॅमोआ!

एवंच आपण मार्गारेट मीडशी सहमत होत पुढे वाचत राहतो. 'सॅमोआच्या' समारोपात त्या सांगतात : किशोरावस्था ही 'ताण व दाब' 'स्ट्रेस अँण्ड स्ट्रेन' अटळ अंगे असणारी वयाची अवस्था

नाही, तर मानवनिर्मित पर्यावरणामुळे ती तशी होते. Environment make it so ! आमच्या किशोरांना जाचणाऱ्या दुखण्यांची प्रमुख मुळे परस्परविरोधी 'स्टॅण्डर्ड्स्' मध्ये आहेत – आमच्या श्रद्धांत आहेत – हा विश्वास आम्हाला असे बजावतो की, व्यक्तीने आपापली निवड करावी–बरं-वाईट ठरवावे. जणू काही ही 'निवड' फार मोठी गोष्ट आहे ! निवड करण्यासाठी (choices) इतके पर्याय आहेत की, प्रत्येकाचा चक्रव्यूहातला अभिमन्यू व्हावा. किशोरांना जाणवणारा, भेडसावणारा ताण आम्ही वयस्कांनी निर्माण केलेल्या सामाजिक–सांस्कृतिक गोष्टींचे 'गोमटे' फळ आहे. शारीरिक बदलांचा व ताणांचा तसा काही संबंध नाही. खरे दुर्भिक्ष आहे ते Common standard–सर्वसाधारण प्रमाणकाचे !

लैंगिक क्षेत्रात (Sex) आजच्या तरुण पिढीचे प्रयोग चालू आहेत. त्या प्रयोगाकडे पाहून म्हाताऱ्यांनी नाके उडवायची गरज नाही. लैंगिक प्रयोग म्हणजे तरुणांचे बंड नाही. ते बंड मानले तर, ते बंड करणाऱ्या तरुणांना संकोच वाटतो. सद्सद्विवेकबुद्धीची–काही तरी चुकीचे करत असल्याची क्षुण्ण जाणीव कुरतडत राहते. पुन्हा अशाने नवे 'ताण' वाढतात. ताण वाढलेली पिढी विनाशाच्या दिशेने वेगाने क्षेपावू शकते ! भीती–खोटेपणा या भावना जर तरुणांत सर्वदूर पसरल्या तर अंती, ते समाजालाच अपायकारक ठरेल. सरळ विवाह, –घरकुल–मुले या योजनेला फाटे फुटले तर, त्यातून स्वतंत्र कुमारी म्हणून जगणे, अपत्यहीन विवाह, बाल विवाह/लवकर विवाह, विवाह अधिक करीयर किंवा करियरसाठी विवाह. विवाहाशिवाय लैंगिक संबंध अशा अनेक पर्यायांच्या पारंब्या लोंबू लागतात व स्त्री-पुरुषांच्या मानवी संबंधांची 'दशा' होते.


प्रत्येक सुजाण नागरिकाने वाचलीच
पाहिजेत अशी दोन पुस्तके

**भाकरी आणि स्वातंत्र्य**

प्रा. ग. प्र. प्रधान । रु. ८·००

राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक विकास
यांमधील परस्पर संबंधांचे सर्वांगीण विवेचन.
प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रा. विल्यम मॅकार्ड
यांच्या 'Springtime of freedom'
या पुस्तकाच्या वाचनातून आणि चिंतनातून उद्भवलेले
भारतीय परिस्थितीला उपयुक्त ठरतील असे
अभ्यासपूर्ण निष्कर्ष

**'मे'तील सात दिवस**

नरुभाऊ लिमये । रु. ३·००

अमेरिकन लोकशाही संपुष्टात आणण्याचा
लष्करी नेत्याचा डाव उधळून लावणाऱ्या
लोकशाहीप्रेमी लोकांची चित्तवेधक कथा

**विश्वकर्मा साहित्यालय**

२०३५/२ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०


असे पर्याय किंवा निवडी (choice) आमच्या मुलांना हवेत की जे त्यांनाच confront (कन्फ्रंट) समक्ष सामोरे येतील त्यांना मिळणाऱ्या शिक्षणाने अधिक करून मुलांच्या 'मेंटल' व 'शारीरिक' आरोग्याकडे अधिक लक्ष पुरवावे. This child of future must have an open mind....The children must be taught 'how to think', not what to think ! आपण आपल्या 'हेटेरोजिनीयस' (व्यामिश्र), जेट वेगाने बदलणाऱ्या संस्कृतीची मोठी किंमत देत आहोत. आमच्या मुलांना बालगुन्हेगार बनवून, त्यांना गुन्हेगार बनवून, युवक अशांतीची समस्या ओढवून, (न्यूरॉसिस) मनोरुग्णांच्या संख्येत भरीव वाढ करून आमच्या समाजाची 'कोहेरंट ट्रॅडिशन' खंडित करून आम्ही आमच्या कलांचे दिवाळे काढले आहे...या सर्वांचे कारण आम्ही अनेक पर्यायांना/निवडींना (choices) समाजमान्यता दिलेली आहे. सॅमोआसारख्या 'अनपढ' समाजात 'निवड' नाही–एको देवो केशवः । सॅमोआला जीवनाची एकच शैली ज्ञात आहे, मळवाट–राजवाट एकच आहेत, आणि तिथल्या मुलामुलींनाही तेवढीच ठाऊकी आहे. Will we, who have the knowledge at many ways, leave our children free to choose among them ?

मीडबाईंच्या या 'समाजसुख' ग्रंथाला त्यांचे मानवशास्त्र गुरू कै. फ्रँझ बोझ यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्या प्रस्तावनेत त्यांनी मार्गारेटचे 'आभार' मानले आहेत. मार्गारेटने सॅमोआच्या आदिवासींशी नऊ महिन्यात साधलेले तादात्म्य वाखाणले आहे. अत्यंत 'Lucid', 'clear' चित्रण केल्याबद्दल आभार मानले आहेत. Much of what we a scribe to human nature is us more than a reaction to the restraints put upon as by our **civilization,** हे सत्य सप्रमाण सिद्ध केल्याबद्दलही गुरूंनी शिष्येची जाहीर पाठ थोपटली आहे.

ब्रिटानिका इयर बुक मध्ये स्वतःविषयी लिहिताना मीडबाईंनी आम्हाला जो इशारा दिला आहे तो तर संस्मरणीय असाच आहे : 'भावी जगाच्या माथी अनेक (व्हिएटनाम) युद्धे लादली जातील. तेव्हा मानसशास्त्रज्ञांची ही जबाबदारी आहे की, त्यांनी उभ्या मानवतेला सावध, सतर्क करावे. युद्ध काही माणसाच्या रक्तात नाही. युद्धे ही नेहमीच लादलेली असतात; सामाजिक शास्त्रज्ञांनी विसाव्या शतकाच्या 'विसाव्यासाठी', विसाव्या शतकाच्या समस्यांसाठी, विसाव्या शतकाच्या अशा 'खास' सामाजिक संस्था निर्माण कराव्यात.' काळ तर मोठा कठीण आहे – The times are out of joint, and I, for one, consider it a privilege, not a 'cursed spite', that ever I was born to help 'set them right.' उभ्या मानवजातीचा असा 'शास्त्रीय' कळवळा मुर्दाड दडे बसलेल्या मानवजातीच्या कानी पडला नाही तर त्याच्यासारखे दुसरे दुर्दैव नाही. मार्गारेट मीडच्या तोंडून प्रत्यक्ष परमेश्वर भाकित सांगून राहीला आहे. □

समम् बोनम् : ३

**Coming of Age in Somon**

Margaret Mead Pelican Book

**Pages – 240, Price Rs. 9.**

पुस्तके

## मनाचा ठाव घेणाऱ्या कविता

# दशपदी

अनिलांच्या कवितेला खास स्वतःचे असे स्थान मराठी वाङमयात लाभलेले आहे. आणि याला कारण त्या कवितेचे आणि त्या कवितेतून उमटलेले अनिलांचे व्यक्तिमत्त्व हेच आहे. सदा उत्कट, पण विवशतेत कधीच न विरघळणारी ही कविता. आणि खूप सोसलेला, खूप पचवलेला, पण उत्फुल्ल रसिकतेचे चिरंतन वरदान लाभलेला हा कवी. काव्यानुभवासाठी तळ्याची प्रतिमा अनिलांची फार आवडती आहे. त्यांच्या कवितेचे तळेही नितळ पारदर्शक जीवनाने काठोकाठ भरलेले आहे. हे जीवन अगदी नाजूक लयीत हिंदकळते आणि त्याच्या हेलकाव्यातून कितीतरी प्रतिबिंब आंदोळून जातात. आकाशातल्या मनविभोर रंगच्छटांची, ढगांच्या स्वप्नवेड्या आकारांची, गूढ भाषेत साद घालणाऱ्या नक्षत्रांची, आणि अलगद भुरभुरणाऱ्या वाऱ्याच्या झुळकीची देखील. काठावरच्या बाभळी नि पल्याडचे निळे डोंगर या तळ्यात वाकवाकून आपले प्रतिबिंब पाहतात नि तळ्याचा तळ शोधण्यात स्वतःला हरवून जातात. कुठलेकुठले पक्षी तळ्याच्या जीवनात चोंच बुडविण्यासाठी हळुवारपणे उतरतात. तसे या तळ्यावर कधी शेवाळीही जमते, पण तेही खूप सोशीकपणे काठाशी निमूट बिलगून बसते. अनिलांच्या काव्यानुभवाची ही सारी प्रतिमाचित्रे त्यांच्या 'दशपदी' या नव्या प्रकारच्या कवितांच्या नव्या संग्रहातून उत्कटपणे उमटलेली दिसतात.

खरे म्हणजे कवितांच्या पुस्तकांना प्रस्तावना वगैरे असू नये. कित्येक कवितांच्या आशयाला प्रस्तावनेतली भाष्ये बंदिस्त करून टाकतात, पूर्वग्रह निर्माण करून आखीव वाटांवरून निष्कारण चालायला लावतात आणि परिणामतः कविता जशी निरागसपणे फुलायला पाहिजे, तशी ती वाचकाच्या मनात फुलत नाही, असा अनुभव कितीकदा तरी येतो. अनिलांच्या 'दशपदी'ला तर एक सोडून दोन प्रास्ताविके लाभलेली आहेत. स्वतः कवीचे दशपदीदर्शन' आणि विजया राजाध्यक्षांची 'पदचर्या'. पण या दोन्ही प्रास्ताविकांतून कवितेविषयीची समुत्सुकता अधिक उत्कट व नेटकी करण्याचे कार्य घडल्याचा सुखद अनुभव येतो. कारण या नव्या कविताप्रकाराबद्दलची स्वतःची कवीची संकल्पना आणि कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा उत्कट प्रत्यय यांचे पाथेय त्यातून वाचकापाशी सिद्ध होते. सतत पन्नास वर्षे लोकांना आवडणाऱ्या या कवीची काव्यविषयक भूमिका आणि अनुभवांना सामोरे जाण्याची वृत्ती त्यात गवसते आणि पुढे कविता फुलायला अडथळा न होता, उलट प्राणमय चैतन्याची फुंकर लाभते.

'प्रयोग करणे असा प्रकार काव्यनिर्मितिव्यापाराशी विसंगत आहे,' असे ठाम विधान करून स्वतःच्या मनातील सर्जनव्यापाराचा मागोवा घेत अनिलांनी दशपदी या 'काव्यप्रकाराविषयीची आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. 'दशपदी म्हणजे सलग अशा दहा प्रवाही ओळींचा एक स्तंभ आहे.' अशी व्याख्या ते करतात. दशपदीत विशिष्ट यमकपद्धती नाहीत. अमुक एक वृत्त, जाती वा छंद अधिक योग्य, असे नाही. चरणात नियमित अक्षरसंख्या असली पाहिजे असेही नाही. दशपदीची अभिव्यक्ती कवीचा स्वतःशी उद्गार अशी आहे. अशी दशपदीची रूपरेखा प्रगट करून समीक्षेतील काही मूलगामी विचारसिद्धान्तांना अनिलांनी स्पर्श केला आहे. 'फॉर्म . आशयाचा (कंटेंटचा) असतो. फॉर्मला स्वतंत्र अस्तित्व असूच शकत नाही.' असे ते मानतात. 'फॉर्म' या इंग्रजी शब्दासाठी 'रूप' हा प्रतिशब्द त्यांनी सुचविला आहे. रूप अनिर्वचनीय आहे असे म्हणतम्हणत रूपाच्या प्रकटनक्रियेचा अतिशय नेटका आलेख अनिलांनी मांडून दाखविला आहे. कवी आणि समीक्षक या दोन भूमिकांचा सूर नेहमीच जुळतो असे नाही. (मर्ढेकरांच्या लेखनातही असा सूर न जुळल्याचे जाणवते.) पण अनिलांच्या या प्रास्ताविकात एका कवीने केलेल्या काव्यविवेचनात प्रत्यक्ष अनुभूतीच्या वाटेने काव्यचर्चेचा ठाव घेण्याचा प्रयत्न किती सजीव बनू शकतो, याचे प्रात्यक्षिक पहावयास मिळते. हा प्रयत्न निश्चितच मोलाचा आहे. पुण्याहून मुंबईपर्यंत डेक्कन क्वीनने प्रवास करताना अनिलांशी केलेल्या मुक्तचर्चेच्या निवेदनातून त्यांच्या कवितेचे व काव्यानुभवाचे अंतरंग उकलून पाहण्याचा प्रयत्न विजया राजाध्यक्षांनी केलेला आहे.

'अनिलांनीही काही निमित्तांनी स्वतःच्या कवितेवर लिहिले असेल. पण त्या लेखनात मोकळेपणा नाही. एक पवित्रा घेऊन काही काही गोष्टी सांगितलेल्या आहेत,' असे कारण देऊन विजयाबाईंनी अनिलांशी मनमोकळ्या गप्पा मारत 'पदचर्या' टिपून ठेवलेली असली; तरी त्या स्वतःच एक पवित्रा घेऊन हे सगळे लिहित आहेत, असे अनेक ठिकाणी जाणवत राहते, प्रारंभीची ती कातर व्याकुळता, 'अशा चांगल्या कवितेसाठी जगायचे' हा दिलासा, मधून मधून प्रगट होणारा भळभळीत हळवेपणा हा सगळाच एक पवित्रा वाटतो. कुसुमावती आणि अनिल यांच्या सहजीवनाची अनिलांच्या काव्यात विरघळलेली भावचित्रे मात्र विजयाबाईंनी फार सहृदयतेने रेखाटून व्यक्त केलेली आहेत. 'एकाकी' कविता वाचून रडणाऱ्या कुसुमावती, त्यांची समजूत काढण्याचा अनिलांचा दुबळा प्रयत्न अन् तरी त्या कवितेतून कुसुमावतींना जाणवलेली प्रॉफेटिक सूचना, ग्वाल्हेरच्या साहित्यसंमेलनातील शेवटच्या संध्याकाळी मित्रांच्या पार्टीत कविता म्हणणाऱ्या अनिलांना 'कपालाकाशात शांत घंटानाद' या ओळीनंतरची ओळ चटकन् न आठवणे, 'निर्याणगीताच्या शिंगाची साद' ही पुढची ओळ सांगणाऱ्या कुसुमावतींचे लौकरच निधन होणे, यासारखे प्रसंग अतिशय हळुवार उत्कटतेने विजयाबाईंच्या लेखनात उकललेले आहेत. विजयाबाईंशी संभाषण करताना अनिलांनी आपल्या काही ओळीतील अनुभूती फार सुरेख, स्पष्ट करून सांगितलेली आहे. कवितेच्या अंतरंगात शिरायला वाचकांना साहाय्यभूत होणारे हे विवेचन आहे. अनुभूतीच्या पाकळ्या अलगद उलगडणारे. काव्यरचनेच्या आपल्या भूमिकेसंबंधीचे अनिलांचे सगळे आग्रह ही या सहजसंवादातून सुस्पस्ट झाले आहेत, कवितेसंबंधीचे जवळिकीचे भाष्य, टिप्पणी व संवेद-

नांचा मागोवा घेत जाण्याचा एक वेगळाच फॉर्म विजयाबाईंच्या या सहजसंवादलेखनातून व्यक्त झाला आहे.

अनिलांनीच म्हटल्याप्रमाणे, 'अवघ्या एक उणे चाळीस' कविता या संग्रहात समाविष्ट झालेल्या आहेत. परंतु त्यातूनच घडणारे अनिलांच्या प्रतिमेचे दर्शन विलक्षण देखणे आणि भावपूर्ण आहे. अनिलांच्या अती उत्कट, तरीही संयत, आर्त तरीही अविवश, सौंदर्यग्राही आणि तरीही निरागस अशा कविवृत्तीचे नि काव्यानुभवाचे आविष्करण करण्यास दशपदी हा अगदी चपखल काव्यप्रकार अनिलांच्या प्रतिभेने शोधला आहे. निसर्गातून अनुभूतीची प्रतिमाचित्रे रेखाटत उत्कटतेची स्पंदने शब्दांतून निनादत ठेवणे, हृदयांतरीची अनेकपदरी भाववृत्ती अती मितभाषीपणाने शब्दातून झिरपत नेणे, स्पर्श–रूप–गतीच्या संवेदनाचित्रांची हळूवार गुंफण करून शब्दांना नवे प्रतीकार्य लाभवून देणे, शब्दांच्या आवर्तनातून भाववृत्ती गडद बनवीत नेणे, इ. खास अनिलांच्या आविष्काराच्या लकबी दशपदी या काव्यप्रकाराशी श्वासोच्छ्वासाइतक्या एकजीव होऊन गेलेल्या आहेत.

गहिवराची अवस्था विवशतेच्या आहारी न जाताही कशी उत्कटपणे अनुभवता येते, याच्या खुणा, 'दशपदी' मध्ये सर्वत्रच आढळतात. 'एकाकी' ही कविता तर त्याचे उत्कृष्ट उदाहरण ठरावी.

'भिजल्या आहेत पाऊलवाटा
आता साऱ्या तुझ्यामाझ्यामधल्या
मिटल्या आहेत जळावरल्या
पुसाट प्रकाशलाटा शेवटल्या
परतून गेले आहेत सगळे
आठवणीचे पक्षी थकलेले'

असे आपले एकाकीपण व प्रियेपासूनच्या दूरतेची अमतिक जाणीव कवी व्यक्त करू लागला की, अनुभवाच्या प्रतिमा–चित्रांना आर्ततेचे कातर रंग व्यापून टाकतात आणि शब्द हळवे न बनताही मनाच्या तळाशी जाऊन स्थिरावतात. भावसत्याचा कठोरपणा निमूट स्वीकारण्याचा सोशीकपणा दुःखाच्या विव्हल आक्रोशापेक्षाही परिणामकारक ठरतो. 'विवस्त्र क्लेशांना अंगे झाकण्यास मिळत नाहीत वैखरीचे वेष,' ... 'उदासीन फांद्यावर रुक्ष जिणे गुणगुणते,' ...' शीर्ण पाने ढाळता निःसंगतेने पळस कासावीस होतो,' ...' अश्रूंत विरलेले उसासे रूप घेऊन आलेले' ...अशा विविध प्रतिमांनी भावसत्याच्या कठोर स्वीकाराची ही वेदना अनिलांनी अतिशय परिणामकारकतेने वेचली आहे. कधीकधी तर या वेदनेच्या समजूतदार स्वीकाराला वेदनेच्या रतीचेच स्वरूप प्राप्त होते. मग गहन निद्रेचे कुरळ काळे केश कवीच्या जीवाला भुरळ पाडतात. आतुर तुर्येचे सावळे हात त्याला बळेच शेजेवर ओढून घेतात. जीवनाच्या स्तनकुंभांच्या स्पर्शासह मृत्यूचे श्याम अधर चुंबिताना आत्मविस्मृतीच्या रतीत रात्रीच्या कितीक गात्रांचे याम ढळत राहतात. अनुभवाची आत्मरती कवीला वेदनेसह व्यापून टाकते.

आपल्या वेदनेचे प्रदर्शन न करता आतल्या आत सोसायचे आणि त्या वेदनेचे कढ भोगतच जीवनाला सामोरे जायचे ही अनिलांची तऱ्हा आहे. त्यांचे अश्रू बाहेर गळत नाहीत; आत जळत राहतात. जिथे गळून पडत असताना पान मुळी सळसळ करीत नाही, अशा तळ्याकाठी बसून राहवेसे त्यांना वाटते! ओल्या पापण्यांच्या उघडझापीत दिसणारे दृश्य शून्य मनाने पाहत असताना एकीकडे रिते होत राहते अशी त्यांची अवस्था होऊन जाते.

'दशपदी'तल्या काही कविता म्हणजे बकुळीच्या टपटपत्या फुलांसारखी भावगीते आहेत. अनिलांच्या हृदयाच्या अंतर्हृदयाचे बोल या कवितांतून सुगंधले आहेत. प्रियेच्या चिरविरहानंतरही आयुष्याची वाटचाल व सृष्टिक्रमाचे चक्र चाललेलेच आहे याचा व्यथित विस्मय व्यक्त करणारी 'तुझ्याविना' ही कविता, हारल्याच्या हरवल्याच्या सलत राहिलेल्या जाणीवेची 'विराणी', निसर्गात चैतन्यरूप बनलेल्या भावदृश्यांची डोळ्यांवाटे मनात शिरून ठाव घेणारी नि पुन्हा देहाच्या रोमारोमात थरथरत परतलेली 'तादात्मता', साऱ्या जीवनभर व्यापून राहिलेल्या नि जीवनाचा चैतन्याधार ठरणाऱ्या प्रीतीची अनुभूती व्यक्त करणारी 'आणीबाणी'—ही अशा भावगीतात्मक दशपद्यांची उदाहरणे.

या सगळ्या दशपद्यांतून चिंब भिजून राहिलेला अनुभव हा प्रीतीचा अनुभव आहे. आणि ही प्रीती मोठी समृद्ध प्रीती आहे. अतिशय हळूवार पुसटपणापासून गाढ जीवनसाफल्यापर्यंत विविध घटांनी ती रंगलेली आहे. निसर्गातल्या रंगभरी भावदृश्यात या प्रीतीचा पहिला स्पर्श शहारलेला आहे. संसारातल्या काळवंडणाऱ्या राशींतून, भरून आलेल्या वादळातून, पेटलेल्या वणव्यांतून आणि उधळलेल्या खेळातून नुसत्या 'हाती हात'च्या आधारावर निभावून नेण्याचे सामर्थ्य या प्रीतीत आहे. या प्रीतीचा वर्षाव हृदय कधी जागच्या जागीच राहून करून घेते, तर कधी ती किती किती किती म्हणून कितीदा कितीतरी दिली घेतली तरी रिती न वाटता उलट भरतीवर भरतीच येत राहते. कधी ती उशिराच्या पावसाच्या लाडिक कोडकौतुकाआडून डोकावते, तर कधी काळ्या धरतीच्या सोशिक वहिवाटीत तिचे रूप भिजलेले असते. विविध तऱ्हांनी विविध अनुभवांचा वेध घेत प्रीतीची समृद्धी या या दशपद्यांमधून भरत आणि भारावत आलेली दिसते.

## विलोभनीय निसर्ग

'दशपदी'तील निसर्ग हा एक अतिशय विलोभनीय प्रकार आहे. हा निसर्ग सुंदर नि रमणीय तर आहेच; पण शिवाय त्याला सर्वत्र भावसंपन्न व्यक्तिमत्त्व लाभलेले आहे. बऱ्याच कवितांतून निसर्गाची आणि कवीची भाववृत्ती सहजसंवादाने एकरूप झाली आहे. त्यातून एक विलक्षण उत्कट वातावरणनिर्मिती झालेली आहे. उदा., 'पावसाळी सांज' या कवितेतले हे भावपूर्ण निसर्गचित्र पहा. 'इकडे पावसाळी सूर्य मावळतो आहे नि तिकडे पुनवेचा चंद्र उगवतो आहे. पण दोघेही निस्तेज झाकळलेले आहेत. दोघांचीही किरणांची वाचा मंद आहे. वाऱ्याचीही धुंदी उतरली आहे. कुंद हवा नि ढगाळलेले नभ यांतून प्रकाशाची कवाडे बंद झालेली आहेत. ताऱ्यांचे काकडे विझलेले आहेत. तोंडावर लांब घुंघट घेऊन संध्या नकळत निसटली आहे; तर रात्र येता येता मध्येच थांबून एकांतात भिजलेली वस्त्रे वाळवीत साशंकतेने थबकली आहे. 'जुई' या कवितेतील अंगणिथळत्या जुईभोवती जळाआत विरघळलेला हळवा कोमल सुवास, तलम ढगांच्या सात घड्यांतून पडणारे गाळीव सौम्य चांदणे नि त्या जाळीच्या पडद्यामधून दिसणारे जुईचे नितळ देखणे रूप, तिचे कोवळ्या फांद्याचा लवचिक बांधा पाचूच्या पानांत झाकून घेणे या

सगळ्या चित्रांतून जुईचे सलज्जसुंदर सचेतन व्यक्तिमत्त्व उभे राहते आणि 'सोज्वळाआड दडणारे सौंदर्य' व 'सोलीव सुखाचे स्वप्न' या संकल्पना कितीतरी गहिऱ्या अर्थच्छटांनी दरवळत राहतात. 'शरदागम', 'फाल्गुन,' 'फुलाचे आयुष्य', या दशपद्यांतून अशाच भावगंधित निसर्ग-चित्रांचे सचेतन व्यक्तिमत्त्व अनिलांनी भाव-संवादी वृत्तीने उभे केले आहे. 'माड' आणि 'कालव' या कवितांत निसर्गचित्रांचा उपयोग रूपकात्मक जीवनचित्रे रेखाटण्यासाठी करून घेतलेला आहे. आलेल्या घटकेला टाळणारा माड आणि व्यथेसह कोरड्या वाळूत पसरलेला हिरमुसला कालव ही कवीच्यो सहनशील व्यथेचीच प्रतीके बनली आहेत.

अनिलांच्या अनुभूतीचे एक अपरिहार्य अंग काव्यनिर्मितीची प्रक्रिया हे आहे. अनुभव घेण्याची काव्येतर क्षेत्रे नि त्या अनुभवाच्या आविष्काराची कवितांतर्गत क्षेत्रे. अशी विभागणी येथे नाही. कविता अनुभवणे आणि कविता लिहिणे हे एकरूपच झालेले आहे. 'साथ' सारख्या कवितेतून काव्य-निर्मितीची प्रक्रिया आणि जीवनाचा प्रवास यांतील अभिन्नता अनिल ज्या पद्धतीने जाणवून देतात, त्यात याची साक्ष सापडते. 'श्रावणझड' सारख्या कवितेतून काव्य-निर्मितीसाठी ओठंगलेली मनाची आत्मतृप्त व आत्मरत अवस्था साकार होते. 'समर्थ' सारखी कविता सृजनाच्या अपरिहार्य अनुभूतीचा सोहळा साजरा करते. अर्थात काही कविता शुद्ध काव्यनिर्मितीच्या भूमिकेचा प्रत्यय देण्यासाठीही आलेल्या आहेत. उदाहरणार्थ 'झाले' ही कविता. थोड्याच कविता लिहिण्यातली आणि रसिकांच्या प्रतिसादाबद्दलची समाधानी कृतार्थता अनिल येथे खुलेपणाने व्यक्त करतात.

अनिलांच्या कवितांचा बाह्याकार त्यांच्या अंतरंगाशी सुमेळ साधून आकृतीचे सौंदर्य घडविणारा असा असतो. अंतर्बाह्य सुघड रचनेची कितीतरी मनोरम वैशिष्टचे एकेका दशपदीतून खुललेली दिसतात. 'नाटक' या दशपदीचा प्राणच अनुभवाच्या, आशयाच्या व रचनेच्या चमत्कृतीत असतो, तर 'काळी' या कवितेत धरती आणि गरती यांची मनमुराद व्यक्तिमत्त्वाची अंतर्बाह्य चैतन्यचित्रे दुपेडीगुंफणीने गुंफलेली असतात. 'स्वर-मिलाप हुंकारून झंझनला,'... 'लय धरित ताल धिधिनला,' '... फुल फुलून टवटवले अशा सचेतन ध्वनिचित्रांची रसपूर्ण रचना 'लहरा' या दशपदीतील संगीतात अनुभव साकार करते, तर आपल्या कलंदर व्यक्तिमत्त्वाच्या खाणाखुणा कलंदरपणे सांगत. 'मी' ही दशपदी अनिल घडवितात. विविध उत्कट काव्यानुभव घेताना आपल्या विविध क्रिया-प्रतिक्रिया प्रतिमांच्या प्रत्ययकारी भाषेत कवी वर्णन करतो. त्यातून त्याच्या अनुभवांचे वेगळेपण नि प्रातिनिधिकता, त्यांचे सौंदर्य नि वेदना, त्यातील आर्तता नि संयम या साऱ्यांना छेद मिळत राहतो. कधी कवीने आभाळातला काळोख आताच कुरवाळलेला असतो. कधी तो इंद्रधनुष्याच्या अवघ्या छटांत न्हालेला असतो. गडद रंग घेऊन आलेल्या घनघोर घटांना आसवांत धुऊन आपला रंग त्याने चढविलेला असतो, तर कधी मनातलेच चांदणे हिंदोळत बसताना त्याचे डोळे उलटून पुन्हा आत रूप पाहतात. अशा विविध क्रियाप्रक्रियांतून साकार होणारे या कवीचे दशपदीय व्यक्तिमत्त्व मोठे मनस्वी आहे. जीवनाचा खेळ झाला तरी अजून त्याचे मन बाळखेळण्यांमधून निघता निघत नाही. चाहूल नसलेली वाट त्याचे पाऊल-पाऊल ओढून नेते. वाटेवर काटे वेचीत चालला असतो फुलाफुलांत चालल्यासारखे त्यास वाटते. मोठ्या निगुतीने खांद्यावर बाळगलेले सुखःदुखांचे ओझे फेकून देऊन तो आतो परत चाललेला आहे. स्वछंद, विमुक्त, धुंदपणे.

शिवाय कालदृष्टया हे व्यक्तिमत्त्व आणखी एका दिशेने अतिशय समृद्ध आहे. उर्दू शायरी आणि अभिजात संस्कृत वाङमय यांच्यातून रसिकतेने वेचलेल्या संपदेची लेणी त्यांनी आपल्या अनुभूतीवर सहजपणे चढविली आहेत. नव्हे, त्यांच्या अनुभूतीने ती लीलया ल्यायलेली आहेत.

'उम्रे दराज माँगकर लाये थे चार दिन
दो आरजू में गये दो इन्तजार में'

हा बहादुरशाहचा सुप्रसिद्ध शेर आणि

'वाटते आयुष्य अवघे चार दिवसांचेच झाले.
कसे गेले कळले नाही. हाती फार थोडे आले
दोन दिवस आराधनेत दोन प्रतीक्षेत गेले
अर्धे जीवन प्रयत्नांत अर्धे विवंचनेत गेले'

ही अनिलांची आर्त अनुभूती यांच्यातील नाते हे या प्रकारचे असते.

'इंद्रधनुष्याची कमान जेथून निघता दिसली
वारुळातून तेथपर्यंत तू दिलीस साथ सात
रंगाच्या वर्तुळातून'

यातील कल्पना 'वल्मीकाग्रात् प्रभवति धनुःखण्डमाखण्डलस्य' या कालिदासाच्या 'मेघदूता'तील ओळीत आहे अशी कबुली अनिल स्वतःच प्रास्ताविकात देतात. 'उथळ उथळ पल्लवात संगळून जळ बसते' यातील 'पल्वल' शब्द 'अजविलापा' तून आलेला असतो. वेगळ्या सौंदर्य-पर्युत्सुल जीवाला जन्मांतरीचे (जननांतरीचे) नाते सांगणारे आगळे लावण्यही कालिदासाच्या 'रम्याणि वीक्ष्य' या श्लोकाशी दुवा जुळविणारे. 'चित्र' या कवितेतील आशयाची आकृतीही 'मेघदूता'तील एका श्लोकाशी मिळती-जुळती प्रियेचे चित्र काढून विरंगुळा शोधणाऱ्या विरही प्रियकराचे चित्र तिथे त्याच्या अश्रूंनी पुसले जाते, तर इथे सुकल्या रंगांनी अश्रूंत मिसळून चित्र काढणारा प्रियकर 'पण शिरेल काय तिथे प्रीतीचा प्राण तुझा' म्हणून हळहळत राहतो. अशी 'श्रुतयोजना' (हा खास अनिलांचा शब्द. 'एखाद्या कवीने फार चांगले असे काहीतरी म्हटलेले असते. पण तरीही ते वाचत असताना आणखी काहीतरी म्हणण्याजोगे उरले आहे, अशी भावना निर्माण होते. म्हणून ती मूळ कल्पना घेऊन आणखी पुढे जाणे म्हणजे श्रुतयोजना.) साधत आपली विशेषानुभूती अनिल दशपदीत गुंफतात तेव्हा अनेकविध भावसंदर्भांच्या समृद्धीचे सौंदर्य तिला प्राप्त होते.

असे अनिलांचे हे छोटे नवे पुस्तक दहा दहा ओळींच्या अवघ्या एकूण चाळीस कविता, स्वतः कवीचे आत्मभूमिका कथन आणि एका रसिक सुहृद मनाशी कवीचा सहज संवाद यांनी त्याचा आकार रेखलेला. पण अनिलांच्याच इवल्याशा 'अंगनिथळत्या जुई' प्रमाणे त्याचे देखणे रूप आणि चिरंतन सुगंध मनाला एका कायमच्या आस्वादाचे वरदान देणारा आहे. 'जी मनाचा सर्वस्वी ठाव घेते, ती कविता.' अशी जर काव्याची व्याख्या करावयाची ठरवली, तर उदाहरण म्हणून अनिलांची 'दशपदी' चटकन पुढे करता यावी.

—निशिकांत मिरजकर

'दशपदी'
कवि अनिल
मौज प्रकाशन मुंबई
पृष्ठे : ९५, किमत : पंधरा रुपये

## फिनिक्स ग्रंथालय.....

**The Romeo Error,**

By Lyall Watson
Coronet Cooks, pages 254,
Rs. 12·80, (80 Pence).

पौंडाची किंमत घसरली तेव्हापासून ब्रिटिश पुस्तकांचे भाव थोडे कमी झाले म्हणून आनंद झाला. परंतु अमेरिकन व ब्रिटिश पुस्तकांची आकडेवारी काढली तेव्हा ब्रिटिश पुस्तकांची खरेदी माझ्या वाचनालयात ५% झाली! म्हणजे पौंडाच्या घसरण्यामुळे वाचनालयाचा फारसा फायदा झाला नाही. डॉलर कधी घसरेल याची मी चातकासारखी वाट पाहत आहे. अलिकडे ब्रिटिश लेखकही 'घसरले' आहेत की काय कोण जाणे! पुस्तकाच्या दुकानी जिकडे पाहावे तिकडे बहुतेक अमेरिकन लेखकच दिसतात. ब्रिटिश लेखकांची पुस्तके गुणवत्तेत चांगली असतात, तरी पण हे असे का व्हावे, हे गूढच आहे.

वॅटसननी या आधी 'Supernature' नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्याचे परीक्षण मी 'माणूस'च्या १६–१२–७६ च्या अंकात लिहिले होते. Romeo Error हे त्यांचे पुस्तकही गूढ विषयाचेच आहे. या पुस्तकात वॅटसनने जीवन आणि मृत्यू आणि मृत्यूनंतरचे जीवन या विषयांना गवसणीच घातली आहे.

जीवन संपते कधी व मृत्यू सुरू होतो कधी याबाबतीत डॉक्टरांमध्येसुद्धा अलिकडे Organ transplant मुळे वाद चालला होता. सप्टेंबर १९७३ मध्ये सॅम्युअल मूर हा कॅलिफोर्निआमधील रहिवासी मयत झाला आहे, असे सर्टिफिकेट देण्यात आले होते. 'बंदुकीची गोळी मेंदूमध्ये घुसून मृत्यू झाला' असे अहवालात म्हटले होते. त्याचे हृदयाचे ठोके चालू असतानाच ते कलम करण्यासाठी हेलिकॉप्टरने स्टॅनफोर्डला पाठविण्यात आले. एका महिन्यानंतर त्याचा खुनी अँन्ड्रयू लायन्स यांच्यावरती खुनाचा खटला भरण्यात आला. तेव्हा खुनी आरोपीच्या वकिलांनी असा बचाव केला की, आरोपीच्या हातून खून झालाच नाही, त्यामुळे हृदय कलम करण्यासाठी काढून घेणारा सर्जन हाच खरा खुनी आहे! जीवन आणि मृत्यू यामधील या नाजुक रेषेलाच त्याल वॅटसननी Romeo Error असे नाव दिले आहे आणि ते रोमिओ व ज्युलिएट या शोकान्तिकेवरून घेतले आहे.

१९६४ मध्ये एक सर्जन Post mortem करण्याच्या तयारीत होता, त्या वेळेला 'मयत' झालेला मनुष्य एकाएकी जागा झाला व त्याने रागाच्या भरात सर्जनचा गळा धरला आणि त्या सर्जनला इतका शॉक बसला की तोच मरण पावला!

दिल्लीमध्ये एकदा रेव्हरंड श्वार्झ हा मिशनरी 'मयत' झाला असता, त्याच्या मर्त्य कुडीभोवती चाहत्यांनी त्याचे आवडते गाणे म्हटले तेव्हा शवपेटीतला रेव्हरंड श्वार्झ या लोकांना गाण्याची साथ देत उभा राहिला!

USA मध्ये मयत झालेल्या माणसाच्या डोळ्यात अॅट्रोपीन टाकले जाते. जर जीवाचा थोडाही अंश राहिला तर, या औषधाने डोळ्याची बाहुली विस्तारते. ब्रिटनमध्ये काही ठिकाणी मनुष्य खरोखरच मेला आहे की नाही, ते समजण्यासाठी पोर्टेबल कार्डिओग्राफ वापरतात. २६ फेब्रुवारी १९७० मध्ये २३ वर्षांची एक मुलगी जास्त औषधे घेऊन मेली, असे अधिकृतपणे सांगण्यात आले. पण या कार्डीओग्राफमुळे तिच्या हृदयाच्या सूक्ष्म हालचाली कळून आल्या. ती जिवंत आहे, असे सांगण्यात आले.

ब्रिटनमध्ये १९ व्या शतकाच्या शेवटी बऱ्याच लोकांनी आपण थोडे जिवंत असताना कुणी तरी आपला दफनविधी उरकून टाकतील, असा धसका घेतला होता!

प्रख्यात इंग्रजी कादंबरीकार विल्की कॉलीन्स प्रत्येक रात्री आपल्या खाटेशेजारी एक चिठ्ठी लिहून ठेवत असे. या चिठ्ठीत तो मेला तर कोणत्या चाचण्या घ्यावयाच्या याचा तपशील असे! हॅन्स क्रीश्चन अँडरसन (परीकथावाला) हासुद्धा नेहमी याप्रकारची चिठ्ठी आपल्या खिशात बाळगत असे.

एकदा तिसरा अलेक्झांडर झार याचा चेंबरलेन काऊंट कारनाईस कारनिकी यांनी तर शवपेटीतला माणूस जर जिवंत झाला तर, त्याला श्वास घेण्यासाठी एक ट्यूब शवपेटीतून बाहेर हवेत सोडली व त्याची अशी व्यवस्था केली की, शवपेटीत थोडी जरी हालचाल झाली तरी, ती ट्यूब आपोआप उघडून त्या 'मयत' माणसाला हवा पुरवील. बाहेरून मात्र कुणीच ती हवा बंद करू शकणार नाही. त्या ट्यूबच्या उघडण्याबरोबर एक बेल वाजे व एक झेंडा असलेली काठी पुढे होई! ही असली यंत्रणा थडग्याजवळ चौदा दिवस ठेवायची, असा काऊंटचा बेत होता. १४ दिवसांनंतर मात्र ही यंत्रणा काढून घ्यायची व ती व्यक्ती आता मेली आहे असे समजण्यास हरकत नाही, असे हा काऊंट म्हणत होता!

हे सर्व किस्से या पुस्तकातलेच आहेत. बरेच लोक थडग्यातून परत जीवंत झाल्याचे वाचले आहे. आपल्या हिंदू धर्मात मात्र एकदा दहन झाले की, असली संधी गेलीच!

या किश्श्यावरून मला अमेरिकेमधील काही व्यक्तींनी ते मृत झाल्यावर त्यांना गोठवून ठेवावे असे मृत्यूपत्र केले होते ते आठवते. याला Coryogenics म्हणतात. या व्यक्तींना असे वाटते की, थोड्या वर्षात विज्ञान येवढे प्रगती करील की, त्यांच्या गोठलेल्या देहांना ते पुनर्जन्म देईल. परंतु मृतदेह सतत गोठलेल्या अवस्थेत ठेवणे हे फारच खर्चिक आहे.

रशिअन संशोधकांनी केलेल्या प्रयोगात असे आढळून आले की, कोणताही जीव मरणाच्या दारापाशी उभा असताना जर excite झाला तर मृत्यू लवकर येतो! मृत्यूच्या दारापाशी जे लोक किंचाळतात ते लवकर मरतात. पण तुम्ही जर शांत पडून राहीलात तर परत चांगले होण्याची शक्यता जास्त!

थोड्या दिवसांपूर्वी एका वर्तमानपत्रात असे वाचले होते की, आपण जे काही बोलतो ते आसमंतात नेहमीसाठी गोठून जाते. आणखीन काही लोकांचा समज असा आहे की, माणसे मेली की, त्यांच्यातले Spirits पृथ्वीभोवती मोठ्या प्रमाणात वावरत असतात व काही लोकांनी या Spirits चे आवाज टेप करून ठेवले आहेत. कॉन्स्टॅन्टिन व्होडील्हनी या विषयावर एक Breakthrough नांवाचा ग्रंथच लिहिला आहे.

या पुस्तकात फ्राईडरिक जर्गेन्सला व

कॉन्सटेन्टिन ऱ्होडिव्हला या अदृश्य आवाजाबाबत आलेले अनुभव लिहिले आहेत.

एकदा फ्राईडरिक जर्गेन्सन स्टॉकहोमजवळच्या जंगलात एका चिमणीसारख्या स्विडीश पक्षाचा ( finch ) आवाज टेपवर उतरवीत होता. तिथे जवळपास कुणीही नसताना त्याच्या टेपवर चार वर्षांपूर्वी मेलेल्या आईचा आवाज ऐकू येऊ लागला. आणि इथपासून जर्गेन्सन व ऱ्हॉडिव्ह यांनी या विषयावर आणखीन प्रयोग करायला सुरुवात केली. जर्गेन्सकडे हिटलर- गोरिंग व चेसमन यांचे मृत्यूनंतरचे आवाज टेप केलेले आहेत. मॅक्स प्लँक इन्स्टिटयूट येथील एका शास्त्रज्ञांनी जर्गेन्सच्या टेपवर येणारे हे आवाज मुद्दाम दूर ठेवण्याचे प्रयत्न केले. पण कितीही प्रयत्न केल्यानंतर मृतांचे हे आवाज टेपवर येण्याचे चालूच राहिले! कॉन्सटॅन्टिन हा एक मानसशास्त्रज्ञ होता. त्यांनी आधी जर्गेन्सनबरोबर या आवाजाच्या दुनियेत प्रयोग केले. नंतर ऱ्हॉडीव्ह स्वतः टेपवर स्वतंत्रपणे मृतांचे आवाज उतरवू लागला. तीन वर्षांच्या अवधीत कॉन्सटेन्टिन ऱ्हॉडीव्हने मृतांचे ७०,००० आवाज टेपवर उतरवून ठेवले आहेत व १९६९ मध्ये या विषयावर त्यांनी Breakthrough नांवाचे एक अत्यंत वादग्रस्त पुस्तक लिहिले आहे. ( Romeo Error मध्ये ऱ्हॉडिव्हचे नांव वाचण्याच्या आधी मी Breakthrough विषयी बरेच वाचले होते. परंतु गेल्या पाच वर्षांपासून मला कोणत्याच पुस्तक विक्रेत्याकडे हे पुस्तक मिळाले नाही. )

शेकडो लोकांनी असे आवाज टेपवर रेकॉर्ड करून ठेवले आहेत. सदर पुस्तकाचा लेखक Lyall Watson यांनी सुद्धा हे आवाज रेकॉर्ड करू ठेवले आहेत. एका रिकाम्या खोलीत मायक्रोफोनला टेप रेकॉर्डर जोडून आपण स्वतः " Good evening my friends in the beyond " असे काहीतरी बोलून सुरुवात करून थांबावे. इतर सर्व सूचना व सर्किट डायग्रॅम्स R. K. Sheargold यांच्या ' Hints on Receiving the voice Phenomenon ' या पुस्तिकेत दिलेले आहे. हे मृतांचे आवाज अंगवळणी पडले पाहिजेत. एकदा तुम्हाला यश आले नाही तर परत परत टेप चालू ठेवा व कर्णावर earphones ठेवा असे वॅटसन म्हणतात. कॉन्सटॅन्टिन ऱ्हॉडीस म्हणतात की, ह्या आवाजांना अशा रीतीने बोलणे फार कठीण जाते. या आवाजांचे व्याकरण शुद्ध नसते व यातली वाक्ये टेलिग्रॅमसारखी त्रोटक असतात. ( म्हणजे हेमिंग्वे लिहित होता तशी. माझ्या मनात सहज विचार आला की, तो जिवंत होता तेव्हा त्याची भाषा त्रोटक, Staccato अशी होती. तो मेल्यावर त्याचा आवाज कुणी टेपरेकॉर्ड केला असेल तर त्या Staccato वाक्यांचे Morse Code च झाले असतील. )

वॅटसन स्वतःच अशी शक्यता लिहितात की, हे आवाज जिवंत माणसाच्या ( जीटेपजवळ असतात. ) Psychokinesis मुळे निर्माण होत असतील. ज्या पेशंटसच्या घशांच्या शस्त्रक्रिया झाल्या असतील त्यांना काही डॉक्टर थोडे दिवस मनातसुद्धा वाचायला परवानगी देत नाहीत. कारण आपण नजरेसमोर शब्द पाहिले की, ते मनात उच्चारतो त्यामुळे घशामधे बरीच activity वाढते. अगदी रिकाम्या खोलीत टेप चालू असता मृतांचे आवाज येत नाहीत म्हणजे त्या खोलीत माणसे असावी लागतात व ती माणसे व मृतांचे आवाज यामध्ये भूतकाळाचा काहीतरी संबंध असतो. कॉन्सटॅन्टिन ऱ्हाडिव्ह हा Polyglot होता. म्हणजे त्याला बऱ्याच भाषा अवगत होत्या. त्यांनी गोळा केलेले ७०००० आवाज व ऱ्हॉडीव्हच्या बोलण्यात बऱ्याच भाषांचे मिश्रण होते. म्हणजे मृतांच्या आवाजात व ऱ्हॉडिव्हच्या बोलण्यात बरेच साम्य होते असे वॅटसन म्हणतात. हे जर खरे असेल तर, Planchet, मृतांचे बोलणे वगैरे बाबतीत बऱ्याच लोकांचा समज सपशेल चुकीचा आहे असे म्हणावे लागेल कारण हे आवाज जिवंत लोकांच्या Psychokinesis मुळेच जर निर्माण होत असतील तर, ' मृतात्मे बोलतात ' या विचाराचा पाया हादरून जाईल.

इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. Supernature जगात कोणतीही गोष्ट final अशी नाही. वरील दृष्टिकोन फक्त वॅटसन याचा आहे आणि तो चुकीचाही असू शकेल. या विश्वात अंतिम सत्य हे कधीच सापडणार नाही किंवा ' अंतिम सत्य ' अशी वस्तूच जगात नाही. एका वस्तूचा शोध लागला तर त्यामागे आणखीन शेकडो वस्तूंचा शोध घ्यायला माणसाने तत्पर असावे. बर्ट्रांड रसेल एकदा असेच काही तरी म्हणाले होते. ' Truth is something which will never be found. But man must go on trying to find it ! "

शेवटी असे सांगावेसे वाटते की, वॅटसनच्या पहिल्या पुस्तकाइतकेच ( Supernature ) Romeo Error वाचनीय आहे.

—जे. एन्. पोंडा


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

१. स्वगत—( तुरुंगातली डायरी )—जयप्रकाश नारायण — रु. ५/—
२. धर्मात्मा—( कादंबरी ) सौ. कुसुम अभ्यंकर — रु. २०/—
३. अघोरी हिरावट—( कथासंग्रह )—नारायण धारप — रु. १२/—
४. माया—( कादंबरी )—श्रीपाद काळे — रु. १५/—
५. नकोशी—( तीन दीर्घ कथा )—अरविंद गोखले — रु. १५/—

1. **Wavell The Viceroy's Journal**–Edited by Penderal Moon — Rs. 45/–
2. **My Autobiography**–Max Muller — Rs. 6/–
3. **The Effective Executive**–( Management )–Drucker — Rs. 16/–
4. **Limits To Medicine**–( Previous title " Medical Nemesis " )– ( A severe indictment of medical establishment )–Ivan Illich — Rs. 12/–

- आम्ही आपल्या पुस्तकांना प्लॅस्टिक कव्हर्स घालून देऊ.
- आपणास पाहिजे असलेली पुस्तके परगावीही पुरवू. ( VP नाही )
- नॉन मेंबर्सकरिता डेली बेसीसवर पुस्तके वाचावयास मिळतात.

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७ सदाशिव पेठ, पोस्टासमोर, पुणे ३०.

# निवडणूक : मला समजलेली

संजीव मंगरूळकर

खरं तर राजकारणात आपल्याला अजिबात इंटरेस्ट नाही. कारण एकतर करण्यासारखे इतर चांगले उद्योग आहेत आणि दुसरं म्हणजे मला त्यातलं काही कळत नाही. शांतपणे भाषण ऐकायला जावं तर, तेव्हा सगळ्याच वक्त्यांची भाषणं अगदी मतापासून पटतात, आवडतात आणि घरी येऊन त्यावर विचार करावा तर सगळाच मूर्खपणा वाटायला लागतो. तेव्हापासून खरं तर राजकारणावर विचार करणं मी सोडून दिलेलं आहे. पण परवा नुकत्याच निवडणुका झाल्या. वातावरण चांगलेच तापले. भले भले पहिलवान दंड थोपटून आखाड्यात एकत्रित उतरले. भल्यामोठ्या वल्गना करून बिचाऱ्या जनतेशी बौद्धिक कुस्ती करू लागले. बरंच काही वेगळं घडणार अशा वावड्याही उठू लागल्या. महिना दीड महिना अशा रीतीने चांगली घेमार देमार होऊन अखेर निवडणुकांचा निकाल लागला आणि खरोखरीच आक्रीत घडलं! आता ते आक्रीत काय घडलं याच्याशी मला आत्ता कर्तव्य नाही. ते आपण सगळेच चहूकडून ऐकतो, अनुभवतो आहोत. पण एक प्रचंड राजकीय क्रांती अगदी शांततापूर्ण रीतीने घडून भारतात राजकीय जागृती झाल्याचे प्रथमच आढळून आले असा एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष विद्वानांनी आणि राजकीय निरीक्षकांनी (म्हणजे तुम्ही आम्ही) काढलां! या राजकीय जागृतीसंबंधात मला आलेले काही व्यक्तिगत अनुभव मोठे सूचक वाटतात. अर्थात ते अपवादात्मक, व्यक्तिगत आणि म्हणूनच निरर्थक म्हणून टाकून द्यायला माझी कुठलीच हरकत नाही, पण ते सूचक वाटतात म्हणून सांगतो!

मी तसा शहराच्या मध्यवर्ती भागात राहतो, आणि या भागात अनपेक्षितपणे सर्वाधिक राजकीय जागृती झाल्याचे निवडणुकीतील मतदानानंतर अगदी पुराव्यासकट सिद्ध झालेले आहे! निवडणुकीच्या आधीचा एकमेकावर मनसोक्त राळ उठवण्याचा जो काळ असतो त्यातल्याच एका रात्रीची गोष्ट. एका रात्रीची अशासाठी की, यानंतरच्या प्रत्येक रात्री हीच गोष्ट दरवेळी थोड्याफार फरकाने घडत गेली असली, तरी त्या रात्री ती गोष्ट प्रथम घडली. आणि आमच्या चाळीतील शिवसैनिकांची राजकीय चर्चेसाठी रस्त्यावरच एक बैठक जमली. एरवी त्यांचा चर्चेवर फारसा विश्वास नसतो. त्यांचा सारा भर कृतीवर आहे. पण त्या रात्री मात्र एक चर्चा झाली. संध्याकाळच्या सेनापती बाळ ठाकऱ्यांच्या सभेला सर्वजण जाऊन आले असावेत. त्या संबंधाने शिवसेनेच्या राजकीय धोरणावर चर्चा चाललेली होती! ठाकऱ्यांनी पाजलेले बाळकडू सर्वच कार्यकर्त्यांना मोठे मानवलेले दिसले. चर्चा खूपच रंगली. ठाकरे किती मुत्सद्दी आहेत, कसे शूर आहेत यावर सर्वच मंडळींनी बरीच साधक आणि बाधक चर्चा केली. त्यातलेच काही महत्त्वाचे मुद्दे असे--

'इमान नावाची काही चीज असते की नाही? आम्ही ठाकऱ्यांना आमचे इमान एकदा दिले आहे. तेव्हा आता माघार घ्यायची आणि विरोधकांना पाठिंबा द्यायचा ही काय रीत झाली? आता ठाकरे म्हणतील तेच खरे.

''ठाकऱ्यांनी आजच्या सभेत काय राजकारणं केलं पाहा. पार इंटरनॅशनल राजकारणात घुसले. म्हणाले बाईंची (इंदिराजी) फॉरिनमध्ये चांगली ओळख आहे. त्यांनी रशियाशाही करार केलेला आहे. त्यामुळे आता त्या करारासाठी त्यांच्याशिवाय इतर कोणी पंतप्रधान होऊन चालणारचं नाही मुळी! काय डाव टाकला पाहा. म्हणाले, म्हणूनच आमचा पाठिंबा काँग्रेसला नाही, बाईंना आहे. त्या पंतप्रधान झाल्या पाहिजेत. हे ठाकऱ्यांनाच बरोबर समजले आहे?

वर सांगितलेल्या मुद्यातून बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी नव्यानेच सापडण्यासारख्या आहेत. इमान-हे एकदा विकल्यावर परत मिळत नाही. बाईंची फॉरिनमध्ये चांगली ओळख आहे, त्याचा भारताला फार फायदा होतो. दुर्दैवाने तशी ती तुमची-आमची नाही म्हणून...त्यातून त्यांनी रशियाशी करार केले आहेत आणि त्यानुसार भारतात बाईंनाच प्रधानमंत्री होणे आवश्यक आहे. आणि हे सारे इंटरनॅशनल राजकारण फक्त ठाकऱ्यांनाच समजले आहे! आणि हे देखील फक्त या तरुण कार्यकर्त्यांनाच समजले आहे. पुण्यासारख्या 'विद्येचे माहेरघर' समजल्या जाणाऱ्या शहराच्या मध्यवर्ती भागातील एका रस्त्यावर दररात्री चालणाऱ्या राजकारणाच्या चर्चेचा हा मथितार्थ, आजच्या तरुण वर्गात अशा रीतीने बरीच जागृती झाली आहे हे कुणीही मान्य करील; नाहीतर राजकारणाच्या अशा चर्चा दररात्री उत्साहाने झाल्याच नसत्या!

याच सुमारास, निवडणुकीच्या निकालानंतर घडलेला हा एक दुसरा प्रसंग. आमच्या अगदी जवळच एक सुशिक्षित (डबल ग्रॅज्युएट) बाई राहतात. त्यांचा एक मुलगा सध्या परीक्षेला बसत आहे. हे कुटुंब माझ्या लक्षात राहण्याचे कारण असे की, त्यांच्याकडे कुठलेच वर्तमानपत्र कधीही घेत नाहीत. त्यांना लहानपणापासून ती सवयच लागली नाही. 'विनवृत्तपत्रांचा देश' म्हणून जगातल्या कुठल्याशा भागासंबंधी मी वाचले होते, पण वृत्तपत्रांच्या देशात राहून ह्या भानगडीपासून अलिप्त राहणारे काही सुशिक्षित महाभाग असतील, हे मला बरेच नवीन वाटले. त्यामुळे या बाईंकडून राजकीय जागृतीची वगैरे अपेक्षा करणे म्हणजे जरा जास्तच! आणि अर्थात माझीही ती अपेक्षा नव्हतीच. त्यातून मुलांच्या परीक्षा जवळ आलेल्या. पण आश्चर्याची गोष्ट! त्या दिवशी सकाळीच मी त्यांच्या दारावरून चाललो होतो. रात्रभर निवडणुकीचे निकाल ऐकून आधीच डोकं ताळ्यावर नव्हतं. तेवढ्यात बाईंनी मला थांबविलं. कोपऱ्यात बोलावून घेतलं आणि हळूच सांगितलं--

'निवडणुका तर झाल्या...'

मी तीन ताड उडालोच! राजकीय क्रांती इथपर्यंतही पोचली तर! ही म्हणजे कमालच झाली!...

'हो ना! काय विलक्षण झाले पाहा, काँग्रेस पडली' इति मी

'हो का? नाही, मला ते काहीच माहीत नव्हतं. मी म्हणत होते की, आमच्या पोराला परीक्षेत निवडणुकीवर काही निबंध वगैरे नाही ना यायचा? नाही तर त्याला तेवढे चार मुद्दे सांग, तो घाबरून बसला आहे!'

निवडणुकीचा हाही एक धोका माझ्या ध्यानातच आला नव्हता. निवडणुकीवर निबंध येऊ शकतात!

'छे! छे! असा कधी निबंध टाकत नाहीत' मी माझी सुटका करून घेतली.

'हो ना, तरी मी म्हटलंच. कारण या पोरांना काही मतदानाचा अधिकार नाही. तेव्हा ती काय निवडणुकीवर लिहिणार? पण आमच्या कार्ट्याला पटतच नाही!'

या प्रसंगाचे निष्कर्ष वेगळे काढून दाखविण्याची गरज नाही. ते स्वयंसिद्ध आहेत! सुदैवाने सातवीच्या पेपरात निवडणुकीवर निबंध टाकला नाही आणि पोरगा बचावला! वर माझा आशीर्वाद (!) खरा ठरल्याने माझाही भाव वधारला, तो वेगळाच!

या आणि अशा काही प्रसंगामुळे जर भारतातल्या राजकीय जागृतीविषयी कुणाला शंका येत असेल तर हे अनुभव व्यक्तिगत म्हणावयास काहीच हरकत नसावी! ☐

# श्रीमंत राष्ट्रे-गरीब राष्ट्रे : पृष्ठ ९ वरून

इथपासून ते गंगा आणि कावेरी नद्या एकत्र जोडून देशभर कालव्याने पाणी खेळवावं इथपर्यंत असंख्य उत्तमोत्तम योजना आपल्याकडे सुचवल्या गेल्या आहेत. ह्यातल्या बहुसंख्य योजना कधीच अंमलात आणल्या जात नाहीत, आणि ज्या काही अंमलात आणल्या जातात त्याही अकार्यक्षम नोकरशाहीमुळे, दिरंगाईमुळे व भ्रष्टाचारामुळे तितक्याशा परिणामकारक ठरत नाहीत. अमेरिकेचे भारतातील माजी राजदूत व विख्यात अर्थशास्त्रज्ञ गॅलब्रेथ नेहमी गमतीने म्हणतात : India's crash programmes are crashed' even before they take-off ! [ भारताच्या गरुड-योजना आकाशात झेपावण्यापूर्वीच जमीनदोस्त होतात ! ]

याचा अर्थ विकासासाठी हुकुमशाही आवश्यक आहे, असा मुळीच नाही. कारण हुकुमशाही शासनही कमकुवत शासन असू शकतं. [ इतरांपुरती कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली तरी सत्ताधाऱ्यांना ते लागू पडत नाहीत, हा जगातील बहुतेक हुकुमशाहींचा गुणधर्म लक्षात घेतला की, ह्या विधानात विरोधाभास जाणवणार नाही. ]

कमकुवत शासन हे भ्रष्टाचाराप्रमाणेच समाजनिष्ठेच्या अभावाचं द्योतक आहे. समाजाचं एकात्म, एकसंध घटकात अजून रूपांतर झालेलं नाही, ह्याचं निदर्शक आहे. व्यक्तिगत पातळीवरील संकुचित निष्ठावर्तुळांचं राष्ट्रीय पातळीवरील व्यापक प्रतिबिंब आहे.

सरतेशेवटी पैशाकडेच पैसा जातो अशी जी आपल्यात म्हण आहे त्यातला तथ्यांश लक्षात घ्यायला हवा. कारण श्रीमंतीप्रमाणेच गरिबीचंही एक दुष्टचक्र असतं. तुम्ही गरीब असलात की, तुमच्या मुलांना पुरेसं सकस अन्न मिळत नाही. त्यांच्या मेंदूची व शरिराची वाढ खुंटते, स्पर्धात्मक जीवनपद्धतीत ती मागे पडतात, चांगल्या नोकरीअभावी गरीब राहतात व आपल्याहूनही गरीब लोकांची भावी पिढी तयार करतात. याचा अर्थ गरीब कुळात जन्मूनही श्रीमंत होणारी माणसं नाहीत, असं नाही. पण बहुतेकांच्या बाबतीत हेच दुष्टचक्र खरं ठरतं. गरीबीमुळे भांडवल नसतं. भांडवलाअभावी उद्योगधंद्याचा विकास होत नाही. उद्योगधंद्याविना संपत्ती निर्माण होत नाही. पर्यायाने समाज पुन्हा गरीबच राहतो. एका अर्थशास्त्रज्ञाने म्हटल्याप्रमाणे ' गरीब गरीब आहेत कारण ते गरीब आहेत !' [ The poor are poor, because they are poor ! ] ◻

## ' उत्तर ' विरुद्ध ' दक्षिण '

साम्यवादी ' पूर्व ' व भांडवलशाही ' पश्चिम ' ह्यांच्यातील पारंपारिक संघर्षाची जागा आता बहुतांशी श्रीमंत ' उत्तर ' व बहुतांशी गरीब ' दक्षिण ' ह्यांच्यातील संघर्षाने घेतली आहे. ( दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिआ, न्यू-झीलंड ह्या मूळच्या युरोपिअन वसाहती असल्याने त्यांचा समावेश ' उत्तरेत ' केला )

माणूस चंद्रावर पोचला तरी बहुसंख्य जग अजून बैलगाडीनेच प्रवास करतं. अमेरिकेत डुकरांना दुधाची पावडर खायला घालतात तरी बहुसंख्य जग अजून अर्धपोटीच झोपी जातं. अणुशक्तीचा इतका विकास झाला तरी, बहुसंख्य लोक अजून शेणाचे गोळेच वापरतात. गरीब आणि श्रीमंत राष्ट्रांतली भयानक आणि वाढती दरी व तिचे संभाव्य दुष्परिणाम हा आजच्या पिढीला भेडसावणारा सर्वांत स्फोटक प्रश्न आहे.

गरीब आणि श्रीमंत यांना विभागणारी रेषा ही पूर्वी दरमाणशी दरवर्षी ५०० डॉलर्स उत्पन्न ही मानली जाई. पण ही कल्पना सापेक्ष आहे. कारण डॉलरची क्रयशक्ती ( buying power ) भाववाढीनुसार व प्रत्येक देशागणिक बदलत असते.

ही दरी नेमकी किती रुंद आहे हे खालील कोष्टकावरून लक्षात येईल.

| | लोकसंख्या ( कोटी ) | वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न (अब्ज) डॉलर्स | दरमाणशी वार्षिक उत्पन्न (डॉलर्स) |
|---|---|---|---|
| विकसित राष्ट्रे | ६७.२ | २५०० | ३७२० |
| साम्यवादी राष्ट्रे | ११८.७ | ६८६ | ५८० |
| अविकसित राष्ट्रे (अरब) | २९.० | १३६ | ४७० |
| अविकसित राष्ट्रे (अरब) | १६८.० | ५३६ | ३२० |

( जागतिक बँकेच्या पत्रकावर आधारित )

भारतातील दरमाणसी वार्षिक उत्पन्न ५० डॉलर्सहून कमी आहे. ह्यावरून आपल्या देशातील भीषण गरिबीची तुलनात्मक कल्पना येईल.

दुसऱ्या महायुद्धानंतरची काही वर्षे पाश्चात्य बुद्धिमंतांच्या दृष्टीने केवळ २ जगे आस्तित्वात होती. (१) ' मुक्त ' जग (free world) व (२) साम्यवादी जग (communist world) त्यानंतर १९५० ते ६० च्या दरम्यान जगभर स्वातंत्र्याची लाट आली. ( revolution of independance ) एका पाठोपाठ एक भराभर वसाहती स्वतंत्र होऊ लागल्या. संयुक्त राष्ट्रांची मूळची ४५ ही सदस्यसंख्या तिप्पट बनली. हे नवस्वतंत्र देशांचं जग सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक व वांशिकदृष्ट्या अन्य २ जगांपेक्षा अत्यंत भिन्न होतं आणि त्याला तिसरं जग ( Third World ) संबोधण्यात आलं. ( माझ्या माहितीनुसार विन्स्टन चर्चिलने हे संबोधन सर्वप्रथम वापरलं. )

दुसऱ्या महायुद्धानंतर बेचिराख झालेल्या युरोपला मार्शल प्लॅन द्वारे अमेरिकेने अमोल साहाय्य केलं. त्यानंतर तिसऱ्या जगाकडे अमेरिकेचे व महायुद्धाच्या राखेतून फिनिक्स पक्षाप्रमाणे उभ्या राहणाऱ्या युरोपचे डोळे वळले. गरीब राष्ट्रांकडे मदतीचा ओघ

वाहू लागला. केनेडी व द गॉल ह्यांच्या पुढाकाराने संयुक्त राष्ट्रांनी (UNO) सहावं दशक हे 'विकासाचं दशक' (development decade) म्हणून जाहीर केलं. प्रत्येक विकसित राष्ट्राने आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा १ टक्का हिस्सा गरीब राष्ट्रांना मदत म्हणून द्यावा असं एकमताने ठरलं.

परंतु लौकरच हा उत्साह बारगळला. मदतीचा ओघ आटला. ह्याची गरीब राष्ट्रांतील भ्रष्टाचार व अनागोंदी कारभार, त्यांनी केलेला साम्यवादाचा अकारण आणि आत्मनाशक पाठपुरावा, 'जे आमच्या बाजूला नाहीत ते आमच्याविरुद्ध आहेत.' हा अमेरिकेचा अहंकारी दृष्टिकोन, शीतयुद्ध, पाश्चात्य राष्ट्रांनी अंतर्गत लोक-कल्याणासाठी (welfare) केलेला प्रचंड खर्च वगैरे अनेक कारणं आहेत. त्यांचा विस्ताराने उल्लेख करणं ह्या लेखाच्या आवाक्यात बसणार नाही.

ह्याबाबत माझा एक अनुभव सांगावासा वाटतो. श्रीमंत राष्ट्रांनी गरीब राष्ट्रांना जास्त आर्थिक मदत केली पाहिजे असं मी एकदा हिरीरीने एका जर्मन कलाकाराला पटवून देत होतो. संतापाने माझं बोलणं मधेच थांबवून तो म्हणाला, 'भारतातले किती श्रीमंत लोक गरिबांना मदत करतात? मग श्रीमंत राष्ट्रांनी तरी गरीब राष्ट्रांना का मदत करावी? तुमच्यापैकी किती लोक जेवताना अन्न नासता? आणि पुन्हा जगाकडे अन्नासाठी भीक मागता? घानाच्या नक्रुमाकडे सोन्याचा पलंग होता. आणि पुन्हा इतर देशांकडे तो नेहमी मदतीची मागणी (याचना नव्हे मागणी) करायचा. इथिओपिआत लाखो लोक उपाशी राहतात. आमची मुलं खाऊचे पैसे वाचवून इथिओपिआत मदत म्हणून पाठवतात आणि तरीही तिथला सम्राट हेले सिलासी आपल्या कुत्र्यांना रोज कोंबडीचं मांस खिलवायचा...मी स्वतः त्या दृश्याचे फोटो पाहिले आहेत...' त्याच्या बोलण्यात खूप तथ्य होतं. काय बोलावं मला सुचेना. शरमेने माझी मान खाली गेली.

एका फ्रेंच मुत्सद्याने नुकतंच कबूल केल्याप्रमाणं: 'परकीय मदतीची केनेडी व द गॉल यांनी मांडलेली कल्पना हे गुणात्मक (qualitative) व संख्यात्मक (quantitative) अपयश होतं. गुणात्मक अशासाठी की, ह्या मदतीमुळे गरीब राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेला अपेक्षित उठाव मिळाला नाही. संख्यात्मक अशासाठी की, प्रत्यक्षात दिल्या गेलेल्या मदतीने निर्देशित लक्ष्यांक (indicated target) कधीच गाठला नाही.'

गरीब राष्ट्रांच्या कटुतेचं व निराशेचं कारण उघड आहे. त्यांचे बहुसंख्य नेते शिक्षणाच्या व अन्य निमित्ताने पाश्चात्त्य देशात राहिलेले आहेत. तेथली श्रीमंती त्यांनी पाहिली, उपभोगली होती. स्वतंत्र झाल्यावर आपणही ह्यांच्याप्रमाणेच श्रीमंत होऊ अशी स्वप्नं त्यांनी रंगवली होती. गेल्या २५ वर्षांत ही स्वप्नं धुळीला मिळाली आहेत. प्रत्यक्षात कमी होण्याऐवजी गरीब आणि श्रीमंतातली दरी (मग ती वेगवेगळ्या राष्ट्रांतील असो, की एकाच राष्ट्रांतर्गत) कमी होण्याऐवजी विलक्षण वेगाने वाढत आहे.

गरीब राष्ट्रांची व्यापारातली बाजू (terms of trade) दिवसें-दिवस खालावत आहे. उदा. २० वर्षांपूर्वी दक्षिण अमेरिकन राष्ट्राला एका जीपच्या बदल्यात कॉफीची १२४ पोती विकावी लागत. आज त्याला ३४४ पोती विकावी लागतात.

सध्या बहुतेक व्यापार, भांडवली गुंतवणूक, औद्योगिक विकास, वैज्ञानिक संशोधन हे श्रीमंत राष्ट्रांत होत आहे. श्रीमंत निर्माण करणाऱ्या ह्या सर्व प्रक्रिया बहुतांशी तियेच कार्यरत असल्यामुळे कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस ही दरी रुंदावत आहे.

श्रीमंत राष्ट्रांची संपत्ती गरीब राष्ट्रांच्या शोषणातून निर्माण झालेली आहे. ('आमच्या घामातून ह्यांच्या संपत्तीचा धूर निघतो...' वगैरे वगैरे...) असा दावा पुष्कळदा केला जातो. त्यात कितपत तथ्य आहे?

वसाहतींमुळे युरोपिअन राष्ट्रांना कच्च्या मालाचा मुबलक पुरवठा व पक्क्या मालाची हुकमी बाजारपेठ लाभली हे खरं आहे. पण त्यांच्या संपत्तीचं हे एकमेव कारण नसावं. अन्यथा स्वीडन वा स्वित्झर्लंडसारखी कधीच वसाहत नसलेली राष्ट्रं ब्रिटन वा फ्रान्स-सारख्या वसाहतवादी राष्ट्रांहून इतकी श्रीमंत कधीच झाली नसती. किंबहुना ज्या राष्ट्राने वसाहतींवर सर्वांत जास्त वर्षं राज्य केलं ते पोर्तुगाल आज श्रीमंत राष्ट्रांच्या कुटुंबातलं सर्वांत गरीब भावंडं आहे! शिवाय गेल्या २५ वर्षांत बहुसंख्य वसाहतींना स्वातंत्र्य मिळालं तरीही युरोपच्या संपत्तीत कितीतरी पटीने अभूतपूर्व अशी वाढ झाली. वसाहती असताना इतक्या थोड्या अवधीत इतकी प्रचंड वाढ कधीच झाली नव्हती. ह्यावरून निव्वळ वसाहतींवर युरोपची संपत्ती आधारित नव्हती असा निष्कर्ष निघतो.

(किंबहुना अनेक आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते राजकीय महत्त्वाकांक्षेतून वसाहती राखल्या गेल्या व गेल्या १०० वर्षांपुरतं पाहिलं तर ह्या वसाहती हे आर्थिकदृष्ट्या वरदान नसून बोजड ओझं होतं.)

बहुसंख्य लोकांची अशी कल्पना असते की, गरीब राष्ट्रांत खनिज संपत्तीचे सर्व साठे असून श्रीमंत राष्ट्रे अत्यल्प किमतीत ही खनिजे खरीदतात व त्याचा पक्का माल करून तो गरीब राष्ट्रांना दाम-दुप्पट नफा उकळून विकतात. प्रत्यक्षात ही चुकीची कल्पना आहे. रशिया, अमेरिका, कॅनडा, आस्ट्रेलिआ, स्वीडन वगैरे श्रीमंत देशच खनिज संपत्तीच्या बाबतीत सर्वांत आघाडीवर आहेत. अगदी तेलाच्या बाबतीतसुद्धा रशिया व अमेरिका इतर सर्व अरब देशांपेक्षा तेलाचं जास्त उत्पादन काढतात.

'न्यूजवीक' साप्ताहिकात (८-९-७५) प्रसिद्ध झालेल्या युरोपि-अन हडसन इन्स्टिट्यूटच्या एका पाहणीनुसार जगातील औद्योगिक-दृष्ट्या उपयुक्त खनिजांचे ८० टक्के साठे विकसित देशात आहेत.

संयुक्त राष्ट्रांतील आपल्या प्रचंड बहुमताचा उपयोग करून घेऊन अलीकडे गरीब राष्ट्रे खूपदा अवाच्यासवा आर्थिक मदत मागणारे ठराव संमत करून घेतात. (हा आधुनिक जगातील एक मोठा अजब विनोद आहे. तुम्ही मला किती मदत द्यायची तेही मीच ठरवणार!) डॉ. किसींजर ह्याला 'बहुमताची जुलूमशाही' (Tyranny of majority) म्हणतात!

जगातील संपत्ती ही मूठभर राष्ट्रांनी निर्माण केलेली आहे व इतरांनी त्याचा वाटा हक्काने लुटून न्यावा हे अन्याय्य आहे असं श्रीमंत राष्ट्रांना वाटतं. ह्याउलट श्रीमंत राष्ट्रांनी आपलं प्रचंड शोषण केलं आहे, त्याचा सूड घेतला पाहिजे असं गरीब राष्ट्रांना वाटतं.

दुर्दैवाने अन्य मानवी व्यवहारांप्रमाणे ह्या संघर्षाच्या बाबतीतही 'वस्तुस्थिती' (Facts) काय आहे ह्यापेक्षा लोकांना काय 'वाटतं' (Feelings) ह्याला जास्त महत्त्व आहे.

गरीब–श्रीमंत राष्ट्रांतील संघर्षाला खूपदा वांशिक स्वरूपही दिलं जातं. कारण सर्व गोरी राष्ट्रे श्रीमंत आहेत. त्यानंतर जपान, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान वगैरे पिवळी राष्ट्रे विकसत आहेत. त्यानंतर भारतीय (ब्राऊन) वर्णाच्या व सर्वांत शेवटी काळ्या वर्णाच्या लोकांचा क्रमांक लागतो. (अरब राष्ट्रांची अचानक निर्माण झालेली संपत्ती – इराणचा अपवाद वगळता – हे आर्थिक विकासाचे द्योतक मानले जात नाही.)

गरीब राष्ट्रातली सद्यःस्थिती पाश्चात्य राष्ट्रांनी विकासाला सुरुवात केली तेव्हाच्या तेथील परिस्थितीपेक्षा अत्यंत निराळी आहे. साहजिकच त्यांना विकासाचे नवे मार्ग अवलंबावे लागतील. दरवर्षी ८ कोटींनी (भौमितिक श्रेणीत) वाढणाऱ्या लोकवस्तीमुळे त्यांना पाश्चात्यांप्रमाणे विकासाची प्रक्रिया तीन – चारशे वर्षं लांबवितांही येणार नाही. दिवसेंदिवस त्यांचं कार्य जास्त बिकट, जटील, अशक्यप्राय बनत आहे. ज्या लक्ष्याचा ते पाठलाग करीत आहेत ते त्यांच्यापेक्षा जास्त वेगाने त्यांच्यापासून दूर धावत आहे.

अर्थात काही आशादायक खुणाही दिसत आहेत. पाश्चात्यांनी विकासाला सुरुवात केली तेव्हा उपलब्ध नसलेली अणुशक्ती वा हरितक्रांतीसारखी वरदानं आज विज्ञानाने दिली आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाने औद्योगीकरणाचा वेग खूप वाढू शकेल. शिवाय श्रीमंत राष्ट्रेही – विशेषतः त्यांची तरुण पिढी – जास्त मदतशीलता दाखवीत आहेत. मानवी इतिहासातील ही अशी पहिलीच पिढी आहे जी, दुसऱ्या गरीब राष्ट्राला आर्थिक मदत करणे आपली नैतिक जबाबदारी मानते.

परकीय मदतीमुळे सगळे प्रश्न सुटणार नाहीत हे उघड आहे. पण त्यामुळे औद्योगीकरणासाठी आवश्यक ते परकीय चलन, भांडवल व तंत्रज्ञान (Know–how) उपलब्ध होऊ शकेल. अर्थात सरतेशेवटी आपल्या विकासाचं ओझं गरीब राष्ट्रांना स्वतःच वाहावं लागणार आहे. सुदैवाने त्यांच्या नेत्यांत ह्याची जाणीव आढळू लागली आहे.

जे जग दरवर्षी २०० अब्ज डॉलर्स शस्त्रास्त्रांवर खर्च करतं त्या जगात करोडो लोक अर्धपोटी झोपी जातात ही गोष्ट सगळ्या मानवतेला कलंक लावणारी आहे. पाश्चात्य देशांत डुकरांना खायला घातली जाणारी दुधाची पावडर दुष्काळासाठी टाहो फोडणाऱ्या आफ्रो–आशियायी अर्भकांच्या तोंडात का पडू नये? जे विज्ञान टेक्सासमधल्या प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञांकरवी चंद्रावर पडणारी नील आर्मस्ट्राँगची पावलं नियंत्रित करू शकतं ते विज्ञान गरीब राष्ट्रांना त्यांच्या विकासाप्रत चाललेल्या वाटचालीत खचितच हात देऊ शकेल. गरिबी हटविण्यासाठी आवश्यक ती ऐहिक साधनं उत्क्रांतीच्या प्रक्रियेत आज मानवाच्या हाती लाभलेली आहेत. आवश्यकता आहे ती एका सामूहिक प्रयत्नांची, दृढनिश्चयाची, आपण सारी एकाच ईश्वराची लेकरं आहोत ह्या जाणीवेची.

आज कवींनी वा प्रेषितांनी नाही तरी विज्ञानाने जागतिक एकात्मता काही अंशी साधली आहे! बोटल्सच्या तालावर मुंबईच्या ताज – इंटरकाँटिनेंटलमध्ये उंच टाचा हलतात आणि लंडनच्या अल्बर्ट हॉलमध्ये रविशंकरची सतार झंकारते. एलिझाबेथ टेलर आणि रिचर्ड बर्टनच्या पाचव्या घटस्फोटाची चर्चा टोकिओतल्या सिटींगरूममध्ये रंगते आणि मध्यपूर्वेत तेलाला फुटणाऱ्या उकळीवर एअरफ्रान्स मॉरिशसला आठवड्याला किती फ्लाईट्स् घेणार ते ठरतं. अमेरिकेने व्हिएटनाममधून माघार घ्यावी म्हणून स्वीडनमध्ये निदर्शनं होऊ शकतात आणि अमेरिकेत पाऊस चांगला पडला की भारतीय शेतकी खातं सुटकेचा सुस्कारा सोडू शकतं! सगळे देश दळणवळण, शिक्षण- फॅशन्स, व्यापार, संशोधन ह्यांच्या एकाच आंतरराष्ट्रीय जाळ्यात गुंफलेले आहेत, त्यामुळे श्रीमंत उत्तर व गरीब दक्षिण ह्यांच्यातील कुठल्याही स्वरूपाच्या युद्धाचे भीषण परिणाम अखिल मानवजातीवर झाल्यावाचून राहणार नाहीत.

मानवी उत्क्रांतीच्या ज्या वैश्विक पातळीवर आपण येऊन पोचलो आहोत त्या पातळीवर असताना वैश्विक मनोवृत्ती तयार करणं, 'वसुधैव कुटुम्बकम्' ही धारणा मनोव्यापारांचा स्थायीभाव बनवणं आवश्यक आहे. हे घडेल अशी अपेक्षा करणं सर्वस्वी शेख महंमदी मनोराज्य म्हणता येणार नाही. निष्ठा – वर्तुळातली (Sphere of loyalty) ही वृद्धी मानवाने पूर्वी अनुभवली आहे. व्यक्तीपासून कुटुंबापर्यंत, कुटुंबापासून जातीपर्यंत, जातीपासून राज्यापर्यंत, राज्यापासून राष्ट्रापर्यंत ...... आपली निष्ठा वृद्धिंगत होत आहे. मानव उत्क्रांत होत आहे. अशी वैश्विक मनोवृत्ती तयार होईल ह्या अपेक्षेची पूर्तीच केवळ गरीब – श्रीमंत राष्ट्रांतील भावी संघर्ष टळू शकेल. □

---

जनता पक्ष : पृष्ठ ५ वरून

आणीबाणीत काँग्रेसच्या पंचवीस कलमी कार्यक्रमाची जाहिरातच अधिक झाली. प्रत्यक्ष कार्यापेक्षा देखावाच जास्त झाला. या पंचवीस कलमात नवे काही नव्हते. विरोधी पक्षांनी ती पूर्वीच सुचविलेली होती. भूमिहीन शेतमजूर, हरिजन असा वेगवेगळा विचार न करता सर्वच मागासवर्गीयांना विकासाच्या एका किमानपातळीवर आणण्याचा कार्यक्रम आखून तो निर्धारपूर्वक अमलात आणला जावा. देशातील पन्नास टक्के समाज दारिद्र्य रेषेखाली आहे. त्याच्या दारिद्र्य निवारणाचा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने निश्चित उद्दिष्टे ठरवून पार पाडला पाहिजे.

इंदिरा राजवटीत झालेल्या लोकशाहीच्या गळचेपीचा निषेध करून लोकशाहीच्या रक्षणाचे आश्वासन जनता पक्षाने दिल्याने जनतेने त्यास मोठ्या बहुसंख्येने निवडून दिले. लोकशाही कार्यपद्धती त्याच्या प्रत्येक कृतीत दिसली पाहिजे. पक्षानेत्याची निवड सरळ गुप्तमतदानाने झाली असती तर नंतर झालेले रुसव्या – फुगण्याचे प्रकार झाले नसते. या पक्षांची एकजूट टिकणार का? अशी शंका मात्र या प्रकारांनी निर्माण झाली. असे घडायला नको होते व पुनः घडणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी.

सर्वच विधानसभांच्या निवडणुका राष्ट्रपती निवडणुकीपूर्वीच घेण्यात याव्यात. घटनेत त्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती करण्यास पुरेसे दोनतृतीयांश बहुमत सत्तारूढ आघाडीपाशी आहे.

नव्या सत्तारूढ सरकारने हाती घ्यावयाच्या तातडीच्या कार्यक्रमाची फक्त रूपरेखा येथे दिग्दर्शित केली आहे. यात आणखीही भर घालता येईल. पण वर म्हटल्याप्रमाणे सर्वच प्रश्नांना एकदम हात घालण्यापेक्षा एकेक प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावले पाहिजेत.

विजय मोठा, तशीच आव्हानेही मोठी आहेत. जनता पक्ष ही आव्हाने कितपत यशस्वीपणे पेलतो याची कल्पना त्याच्या पहिल्या सहा महिन्यांच्या कारभारावरून लोक करतील. मतदार जागरूकच आहे. जनता पक्षाने वचनपूर्ती केली नाही तर, त्यालाही काँग्रेससारखीच वाट मतदार दाखविल्याशिवाय राहणार नाही. ती वेळ जनता पक्ष आणणार नाही अशी मतदारांची अपेक्षा आहे. ही आव्हाने पेलण्यास पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे घटक पक्षांची एकजूट टिकली पाहिजे. □

इंग्रजी चित्रपट

# मेलडी

## 'त्यांना 'च कळलेला शांतरस !

शिरीष सहस्रबुद्धे

मेलडीमधला आपला कथानायक सुमारे डझनभर पावसाळे पाहिलेला आहे. डॅनियल लॅटिमर ऊर्फ डॅनी. 'ऑलिव्हर' चित्रपटात चटका लावून गेलेला मार्क लेस्टर. त्याची नायिका (तिला 'नायिका' म्हणणं अंमळ जडच जातंय्. विशेषत: आपल्या ठसठशीत पडदाभर नायिका आठवल्यानंतर.) मेलडी पर्किन्स, वय वर्षे अर्थातच दहा.

एकाच शाळेत शिकताना या दोघांत जुळलेले काही अनामिक भावनिक धागे, आणि त्यांतून उडालेली गडबड यांची ही खेळकर कहाणी. आता दहा आणि बारा ही वयं काय 'असे' धागे जुळवत बसायची आहेत का ?' असा प्रश्न कुणी बुजुर्गांनी विचारला तर माझ्याकडे उत्तर नाही. बहुधा मूळ लेखक ॲलन पार्कर आणि दिग्दर्शक कुणीतरी (चक्क) हुसेन यांच्याकडेही नसावं. कारण 'त्या' राज्यात अशा प्रश्नांनाच स्थान नसतं असं ऐकिवात आहे.

अर्थात डॅनी आणि मेलडीच्या एकमेकांतल्या गुंतणुकीला 'प्रेम' म्हणायला मी तयार नाही. कारण पुन्हा आपल्याकडच्या इष्कप्यारमुहब्बतीची घसकेबाज आठवण.

तर तुम्ही नावं काहीही ठेवा. खरं एवढंच की, त्या दोघांचा जीव एकमेकांत गुंतलेला. मग त्यांतून घर, शाळा आणि ते स्वत: अशा तीनही आघाड्यांवर देधमाल. ती अशी की एक दिवस दोघेही शाळेला दांडी मारून पसार होतात आणि समुद्रकिनाऱ्यावरच्या जत्रेत मनमुराद भटकतात. परतल्यावर हेडमास्तरांच्या प्रश्नफैरींना दोघं मिळून (एक) तोंड देतात आणि अखेर उभयतांची खात्री पटते की दुसरं काही नाही, आपल्याला एक लग्न करून टाकलं पाहिजे.

एव्हाना शाळेत कुजबूज सुरू झालेली. दोघांनाही दोस्तमंडळी पिळतात. त्यांच्या वर्गातल्या फळ्यावर एक दिवस कुणीतरी 'When is the wedding, Danny lover boy ?' अशी एक तिरकस वात्रट शंका लिहून ठेवलेली असते. मग त्यावरून चिडाचीड आणि त्यांच्याच वयाची मुलं करतील अशी गुद्दागुद्दीसुद्धा. डॅनीच्या जिवलग दोस्ताशी-ज्यो-(जॅक वाइल्ड) सुद्धा त्याचं बिनसतं.

मेलडीच्या घरी तिची समजूत घालायची आईवडिलांची धडपड. लग्नाशी वयाबियाचा काय संबंध, आणि असलाच तरी लग्नपात्र वयापेक्षा आपण फक्त निम्म्यानं लहान असतानाही आपल्याला परवानगी का मिळू नये या तिच्या मूलभूत शंकांना रामबाण उत्तरं त्यांच्याकडे असतातच असं नाही.

हिंदी सिनेमाच्या नायकनायिकांनी अशा नामी संधीचा फायदा घेऊन एक ओलंचिंब विरहगीत किंवा 'भाडमें जाये जमाना, प्यार हम करते रहेंगे,' अशा आशयाचं एखादं समरयुद्धगीत ठोकून जनतेचं काश्मिरी किंवा गेलाबाजार महाबळेश्वरी मनोरंजन केलं नसतं का ? पण डॅनी-मेलडी [आणि त्यांच्या दोस्तकंपनीला एवढा पोच नसल्यानं ते चक्क गुप्त लग्नाचा बेत आखतात. शाळेला सामुदायिक टा टा करून जवळच्याच रेल्वेलाइनमागे एका आडोशाच्या जुन्या घरात हा बाहुलाबाहुलीच्या लग्नासारखा खेळ चालू असतानाच दक्ष शिक्षक मंडळींची धाड पडते. मग त्यांच्या हातावर तुरी देऊन पळण्याची, शक्य तर त्यांना छळण्याची यातायात.

आपला बूट काढूनच त्यांना मारायला धावलेल्या एका गुरुजींच्या हातून सुटून शेवटी डॅनी आणि मेलडी रेल्वेलाइनवरच्या एका छोट्या लगेजट्रॉलीमध्ये चढतात. पूर्वी भांडलेला डॅनीचा दोस्तच ती कॅरेज ढकलायला मदत करतो आणि मग ती दोघं-ते अतूट जिवाभावाचे स्नेही, डॅनियल आणि मेलडी, स्वत:च ती ट्रॉली वल्हवीत निघून जातात. दोन्ही बाजूला माजलेल्या पिवळ्याहिरव्या गवतातून आणि लाल-निळ्या गवतफुलांतून, वळत जाणाऱ्या रुळांवरून कॅरेज लांब जाते तसतसं दोघांचं एक गाणं आणि Love Melody एवढी अक्षरं. एवढं आपल्याला उरतं आणि सिनेमा संपतो.

'मेलडी' हा निर्दोष चित्रपट आहे असं मला अर्थातच सुचवायचं नाही, किंवा त्यातल्या दोषांसहितही भारावून टाकण्याइतकी ती श्रेष्ठ कलाकृती आहे असाही माझा दावा नाही. 'फ्रेन्ड्स्' नावाचा एक अफलातून गोड सिनेमा पुण्यात अलिकडेच लागून गेला. तीही टीनएजर लव्हस्टोरी होती. 'मेलडी' त्याच्या आसपासही येणार नाही याची जाणीव मला आहे. दोष काढायचे झाले तर, खूप आहेत. चित्राच्या पहिल्या अर्ध्या भागात लेखक दिग्दर्शकांनी मूळ कथासूत्रावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी वातावरण व पार्श्वभूमीनिर्मितीत जरूरीपेक्षा जास्त वेळ दवडला आहे. त्यामुळे काही भाग कंटाळवणा होतो. दुसरा दोष म्हणजे चित्रपटात पटकथाकाराने प्रचंड संख्येनं प्रसंग घुसवलेले आहेत आणि त्यातल्या कित्येक प्रसंगांचं अस्तित्व निरर्थक ठरत असल्यानं (उदाहरणार्थ शाळेच्या वर्गातला गोंधळ त्याची पुनरावृत्ती.) या प्रसंगांची एक प्रचंड गोंधळी जत्रा भरते. निरनिराळ्या प्रसंगांमध्ये काही तार्किक दुवा, काही logical sequence न आढळल्यानं किंवा आहे तो दुबळा वाटल्यानं कथा शेवटपर्यंत ठळकपणे उभी राहतच नाही. चित्रपटाच्या अखेरीस पोरं शिक्षकमंडळींचे जे हाल करतात तो सगळाच प्रकार जरा जादाच 'ताणला गेलाय, वगैरे. या दोषांमुळे द्यायचा तेवढा उणेपणा मेलडीला जरूर द्यावा. पण आणखी एक मुद्दाही महत्त्वाचा आहे. एवढे किंवा असे दोष सामान्यत: बऱ्यापैकी हिंदी सिनेमातही असतात. मग मेलडीचा उदो करून हिंदी चित्रपटांना हिणकस ठरवायचं कारण काय ?– ते असं की, तुमच्याआमच्या आयुष्याशी त्या त्या चित्रपटाचा, कलाकृतीचा एखादा तरी धागा जुळतोय की नाही, माणसातल्या मूलभूत निसर्गाशी त्याचं काही तरी रक्ताचं नातं जमतंय् की नाही, हा एक निकषही लावला गेला पाहिजे. अशी अकृत्रिमता बऱ्याच विदेशी चित्रपटकारांना साधत आलेली आहे. फ्रेन्ड्स् आणि मेलडीच्या निर्मात्यांना साधलेली आहे. या दोन अकृत्रिम आणि नाजूक प्रीतिकथांचा हिंदी धंदेवाईक चित्रपटकारांनी कसा बाजार मांडला असता याच्या कल्पनेनंही धसका बसतो. कारण धंदा आणि बेगडीपणा याचं काही तरी अपरिहार्य गणित आपल्या निर्मात्यांच्या आणि दुर्दैवानं प्रेक्षकांच्याही डोक्यात घट्ट बसून गेलंय्. अलि-

कडेच हिंदी पडद्यावर आलेल्या काही साध्या-सुध्या हलक्याफुलक्या प्रेमकहाण्या लोकप्रिय झाल्या ही अशा नाटकी प्रेमकथाविरुद्धच्या प्रतिक्रियांची निशाणी आहे. एरवी टीन-एजर्सलव्हस्टोरीज् हिंदीत आल्याच नाहीत असं नाही, पण त्यात टीनएजर्सचं खास असं काही नव्हतंच. इतर कोणत्याही 'पूर्ण वयाच्या' चित्रपटाप्रमाणे त्यातूनही 'प्रेम ही भावना आहे की वासना,' यांचा बोध होण्यासारखा नव्हता. 'फ्रेन्ड्स्' किंवा 'मेलडी'त निदान ही घोडचूक घडलेली नाही. टीनएजर्सलव्हस्टोरी हा तिथे शरीर-प्रदर्शनाचा उत्तुंग मोका मानला गेलेला नाही. नासमझ वयात नैसर्गिक वाटणारा निरागसपणा या दोन्हीत भरपूर आहे. भावनांची सहजता तर इतकी की, मेलडी आणि डॅनीच्या परस्परातल्या गुंतणुकीला प्रेम म्हणायला मी म्हणूनच तयार नाही. स्त्रीपुरुषसंबंधातला असा शरीरनिरपेक्ष निसर्गदत्त सहजभाव हा 'फ्रेन्ड्स्' आणि 'मेलडी' या दोन्ही चित्रपटांचा हृदयस्पर्शी ठेवा आहे.

या नैसर्गिकतेवरून आणखी एक छोटासा मुद्दा आठवतो. 'मेलडी'मध्ये लंडनमधल्या मध्यमवर्गीय वस्तीतल्या एका काहीशा जुन्या वळणाच्या शाळेचं आणि विशेषतः त्यातल्या पोरांचं बेहतरीन वास्तवचित्रण केलंय. विशेष म्हणजे तिथली ही पोरं अगदी त्यांच्याच वयाला शोभेल इतक्या अवखळपणे, खेळकरपणे आणि निरागसपणे चित्रपटभर शब्दशः हुंदडली आहेत. हिंदी चित्रपटातली बालमंडळी थोरांना लाजवणाऱ्या ज्या अगाऊपणाच्या लीला करीत असतात त्या आठवल्या की, मेलडीमधल्या नैसर्गिक आणि वास्तवचित्रणाची गोडी वाढतेच. पोरांच्या आणि त्यांच्या मास्तरांच्या या अद्भूत पार्श्वभूमीवर मार्क लेस्टर (डॅनी) आणि नवोदित ट्रेसी हाइड (मेलडी पर्किन्स) या दोघांनीही आपापल्या भूमिका मनःपूर्वक आणि साधेपणानं पण समजदारीनं वठविल्या आहेत. एवढं म्हणणं पुरेसं होईल. पडद्यावरच्या या मेलडीइतकीच पडद्यामागची बीगाइजची मेलडी सुरेख आणि सुरेल आहे. दोन–तीन गीतं पार्श्वभूमीवर फार गोड घेतली आहेत.

या आणि अशा दोन तीन गुणांसाठी, विनाकष्ट दिसणाऱ्या अनेक दोषांसह मी 'मेलडी' स्वीकारला आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीनं किमान एवढी पावलं उचलली तरी, त्यांचाही एखादा दोष स्वीकारायची आम्हा प्रेक्षकांची तयारी आहे.

कारण अशा चित्रपटांतून कलाकृतीच्या निर्मितीच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक साकार होत असतं: ती कलाकृती भोगणाऱ्याचं मन निववणं.

पश्चिमेनं दिलेल्या अनेक चांगल्या प्रीतिकथांनी हे साध्य केलेलं आहे. 'बॉबी' किंवा 'ज्यूली' सारखे चित्रपट पाहून बाहेर पडताना प्रेक्षकाच्या मनाला थोडीफार तरी शांती मिळाली असेल असा दावा आपण करू शकू का? 'मेलडी'च्या बाबतीत, आणि 'फ्रेन्ड्'च्या बाबतीत तर नक्कीच हा दावा मी करू शकेन. प्रक्षोभक सेक्सचा मागमूसही 'मेलडी'त नाही. जे आहे ते विलक्षण सुखद (pleasant) आणि शांत आहे. आणि पश्चिमेच्या चित्रपटकारांनी हे अनेकवार सिद्ध करून दिलंय.

'शांतरसा'चं कौतुक आपल्याकडे दहावा (की अकरा–बारावा?) रस वगैरे म्हणून बरंच होत असलं, तरी निदान चित्रपटात तरी तो आपल्यापेक्षा 'त्यांना'च जास्त कळलाय, असं म्हणूनच मला वाटतं!

[ जाता जाता :

हे सगळं वाचून माझ्या एका मित्राची कॉमेंट 'तुझं तत्त्वज्ञान सोड, पण हे इंग्रजी पिक्चरवाले टीनएजची लिमिट किती खाली नेणारेत? फ्रेन्ड्समधली जोडी चौदा–तेराची होती. आता मेलडीमध्ये दहा–अकरा? बहुतेक यांची वाटचाल आपल्या जुन्या बालविवाहापर्यंत येणार!' ] □

## वेस्ट वर्ल्ड

### शास्त्रीय निराशा !

'वेस्ट वर्ल्ड' हा पुण्यात नव्यानं दाखल झालेला आणखी एक इंग्रजी चित्रपट. science fiction (शास्त्रीय नवलकथा ?)च्या जातीचा. इतिहासातल्या जमा झालेल्या पण अत्यंत प्रगत विज्ञानाच्या साहाय्यानं शास्त्रज्ञांनी पुनर्निर्मित केलेल्या जगाची सफर करायला गेलेले दोघेजण–पीटर मार्टिन (रिचर्ड बेंजामिन) आणि जॉन (जॉन ब्रॉलिन)–आणि त्यात वावरणाऱ्या यंत्रमानवांशी संघर्ष आल्यामुळे त्यांच्या वाटचाला आलेले नाना अनुभव आणि भोग यांची ही कहाणी. सतरा–अठराव्या शतकातलं युरोपिअन जग, त्यापूर्वीचं रोमन जग आणि मध्ययुगीन जग याची अशी पुनउंभारणी शास्त्रज्ञांनी केली आहे आणि कॉम्प्युटर्सच्या माध्यमातून त्यांचं नियंत्रण करायचा प्रयत्न. मुख्य म्हणजे या जगातले सगळं मानवप्राणी वरून खऱ्या जित्याजागत्या हाडामासाच्या मानवप्राण्यांसारखेच दिसत असले तरी प्रत्यक्षात ते सगळे यांत्रिक आहेत. त्यांच्या सगळ्या इंद्रियांची कामं त्याजागी बसवलेली यंत्र करतात. मधूनमधून त्यांच्यात बिघाड होणं साहजिकच, त्यामुळे मग त्यांच्यासाठी वेगळा दवाखाना,! (की वर्कशॉप?) असं पुष्कळच काही त्या यंत्रमानवांपैकी एक गनस्लिंगरशी जॉन–पीटरची चांगलीच जुंपते. गनस्लिंगरसाहेब (यूल ब्रायनर) 'मरायचा' प्रश्नच नसतो. अखेर तो जॉनला गोळी घालून मारतो आणि पीटरचा भयाण पाठलाग वगैरे. अखेर त्याला मशालीनं जाळून 'मारण्यात' पीटरला यश येतं. पण एव्हाना नियंत्रणकेंद्र बंद पडलेलं असतं वगैरे.

मूळ कल्पनेव्यतिरिक्त अन्य काहीही चित्रपटात उल्लेखनीय नाही. science fiction याच दृष्टिकोनातून पाह्यचं तर यापेक्षा खूप सरस कथा–चित्रं पाश्चात्यांनी दिली आहेत. □

## मणी कौलबरोबर एक संध्याकाळ

## पुन्हा एकदा 'घाशीराम'

तब्बल नऊ मिनिटांचं सलग दृश्य चित्रित करायचं होतं. आणि तेही चित्रपटाचं अगदी अखेरचं दृश्य. त्यामुळे महत्त्वाचं. शिवाय त्याचं स्वरूप प्रतीकात्मक, सूचक; आणि मांडणीची पद्धत रचनाचित्रासारखी त्यामुळे साहजिकच दिग्दर्शक मणी कौल, ऑपरेटिव्ह कॅमेरामन राजेश जोशी आणि

इतर तंत्रज्ञांची धावपळ. रिहर्सल्स, सुधारणा, सूचना वगैरे.

स्थळ सिंहगड. अगदी नक्की सांगायचं तर. मुख्य दरवाजाजवळ आणि दूरदर्शनच्या मनोऱ्याच्या पायथ्याशी पण त्याला समोर ठेवून असलेल्या एका छोटचा चढउताराच्या पठारावर ही गडबड उडालेली. निमित्त 'घाशीराम कोतवाल' या मराठी चित्रपटाच्या चित्रीकरणाचं. आधुनिक मराठी नाटचसृष्टीतला मैलाचा दगड म्हणता येईल अशी ही कलाकृती नाटचस्वरूपात भरपूर गाजली आणि गर्जलीसुद्धा. तिच्यावर आधारलेलं घाशीरामचं चित्ररूप पुरं झालं आहे आणि मे किंवा जूनमध्ये ते पडदाही पाहील. त्याचंच शेवटचं चित्रिकरण पाहृचा योग नुकताच जुळून आला आणि दिग्दर्शक मणी कौल यांच्याशी जवळून बातचीतही करता आली.

या शेवटच्या दृश्याचा काळ साधारणत: १८१८ चा. त्यामुळे मराठी सत्तेचा अपकर्ष आणि इंग्रजी अंमलाचा उदय दाखविणारे छोटे दृश्यांचे तुकडे म्हणजे एकीकडे मराठी सरदारांतील बेबनाव दर्शविणारं द्वंद्व, दुसरीकडे दुसऱ्या बाजीरावाचा गलथान कारभार, नाना फडणिसांना अटक आणि एका बाजूला, सिनेमात त्यापूर्वी मयत झालेल्या व्यक्तिरेखा panicky अवस्थेत. तर या सगळचा पार्श्वभूमीवर दोन इंग्रज अधिकारी आपलं भूमापनाचं–सर्व्हेचं काम झपाटयानं करतायत. आतापर्यंतच्या घटनांचं प्रभावी समालोचन करणारा सूत्रधार जमीन मोजायच्या साखळीला अडखळून पडतो. जणू शिस्तबद्ध इंग्रजी कारभारापुढे मराठी राज्यानं नांगी टाकलीय. आणि दृश्य, त्याबरोबरच चित्र, संपलं.

गुंतागुंतीची कांपोझिशन्स आणि प्रचंड लांबी या दोन मोठचा अडचणी. पण त्यावर मात करता येऊन पहिल्याच 'टेक' मध्ये दृश्य जमून जावं यासाठी कसोशीनं तालमी. मधूनच सहदिग्दर्शक हरिहरन 'फर्स्ट पोझिशन'चा पुकारा करतो. मणीकडून नामनिर्देशासह आदेश. अखेर पहिल्याच टेकमध्ये मनासारखा शॉट जमतो आणि घडचाळाकडे नजर जाते तेव्हा ते दृश्य चक्क दहा मिनिटं वीस सेकंदांइतकं ताणलं गेल्याचं लक्षात येतं. एवढचा लांबीचं दृश्य आपण आयुष्यात प्रथमच चित्रित केल्याचं कौल नंतर सांगतातही. सर्व शूटिंग पूर्ण झाल्याचा आनंद हिप हिप हुर्रे च्या तालावर नाचून प्रकट केला जातो. मग आवराआवर. आणि आम्हाला मणी कौल मोकळे सापडतात.

'घाशीराम कोतवाल'चे निर्माते आहेत तब्बल सोळा. आम्ही "अरे बापरे" मधून सावरत असतानाच मणी कौल स्पष्टीकरण पुरवतात. पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटच्याच सोळा माजी विद्यार्थ्यांनी (मणी त्यांतलेच एकजण !) ही 'युक्त फिल्म्स् को-ऑपरेटिव्ह सोसायटी' स्थापन केलीय्. या सोळा जणांत मणीसह चार दिग्दर्शक आहेत. तिघे संकलक आहेत. आणि चौघेजण छायाचित्रकार आहेत. इतरेजन तंत्रज्ञ आहेत. ध्वनिमुद्रक वगैरे. पदवीधर होऊन बाहेर पडल्यानंतर संधीची आणि 'ब्रेक थ्रु'ची वाट पाहत बसण्याऐवजी हे संयुक्त साहस. मग देना बॅंकेकडून दीड लाखाचं कर्ज घेऊन सुरुवात. यंत्रसामग्री इन्स्टिटयूटची आणि थिएटर ॲकॅडमीचा हार्दिक पाठिंबा. विशेष म्हणजे या सोळा सहकाऱ्यांपैकी एकही मराठी नाही. स्वत: मणी कौल सहवासामुळे मराठी बरंच समजू शकतात. बोलण्याचे प्रयत्न चालू. पण एकतर प्रादेशिक भाषांचा सुप्त सामर्थ्यावर दांडगा विश्वास आणि दुसरं कारण घाशीराम या नाटचकृतीचा प्रभाव. त्यांच्याच शब्दात सांगायचं तर एक Fascinating experience होता. थिएटर ॲकॅडमीत मणीचा पायरव बख्खळ. तेव्हा युक्तचं पहिलं प्रॉजेक्ट 'घाशीराम', तेही मराठीत, हे निश्चित झालं.

मणी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या चित्राची केलेली पूर्वतयारी थक्क करणारी आहे. तेंडुलकरांनी या नाटकाचा बचाव करताना, ती एक 'अनैतिहासिक दंतकथा' आहे असा मुद्दा मांडला होता. कौल यांनी त्याचं रूपांतर ऐतिहासिक सत्यकथेत करायचं योजलेलं. साहजिक नाटकातला fiction चा भाग काढून टाकून तिथं ऐतिहासिक सत्यं ठेवली. ललितागौरीचं प्रक्षिप्त उपकथानक संपूर्णत: वगळलं. मुंबई विद्यापीठाच्या सहकार्यानं त्यासाठी या मंडळींनी चक्क तीन महिने इतिहाससंशोधनात घालवले. नाना फडणविसांच्या आत्मचरित्राची एकमेव उपलब्ध प्रत उलथीपालथी केली आणि १७४० ते १८१८ अशा प्रदीर्घ कालावधीला लपेटून घेणारं एक बांधीव ऐतिहासिक कथानक आकारलं.

पण मणी कौलचं वेगळेपण इथंही आहेच. त्याला काही निव्वळशंख ऐतिहासिक चित्रपट बनवायचा नाहीये. त्यांच्याच म्हणण्यानुसार 'Our object is to interprete history and not to recreate it.' 'इतिहासाचंच काय, पण मी आयुष्याचं चित्रण करतो,'

## नवी कालनिर्मिती

या वेठबिगारीच्या दृश्यावरून आठवण झाली. पुण्याजवळच्या एका दगडाच्या खाणीत अभंगाच्या साथीनं ते चित्रित करण्यात आलं. पण प्रेक्षक या दृश्यात आणि विशेषत: अभंगात वाजवीपेक्षा जास्त गुंततील, नको इतके तन्मय होतील अशी भीती मणी कौलना वाटली. त्यामुळे (अर्थात इतरही काही कारणं असू शकतीलच.) या गुंगवणाऱ्या भूतकाळात त्यांनी एकदम वर्तमानकाळ घुसवला आणि ती अनावश्यक गुंतवणूक तोडली. त्या दगडाच्या पेशवेकालीन खाणीत त्यांनी एकदम एक ट्रक आलेला दाखवला. मग सगळे वेठबिगार मजूर तिकडे पळत जातात वगैरे. अर्थात सूत्रधार त्यांना परत बोलावतो आणि तुटलेला अभंग पुन्हा सुरू होतो. असं दाखवून पुन्हा भूतकाळ व वर्तमानकाळ यांचं हे विलयन (fusion) दोनतीनदा तरी वापरलंय. एकदा कॅमेरा वर जात असताना विजेच्या तारा दाखवतो. 'मला इतिहासाची पुनर्निर्मिती करायची नाही' या मणीच्या दाव्याशी हे तंत्र सुसंगतच आहेसं मला वाटतं. प्रायोगिक रंगभूमीवर सध्या ब्रेख्टच्या Alienation technique चं नाव बरंच ऐकलंय्. मणीचा भूतवर्तमानाचा सांधा जुळवायची ही कल्पना त्या तंत्राला समांतर जाणारी आहे का? 'कारण आपण नाटक किंवा चित्रपट पाहतोय्' याची जाणीव प्रेक्षकाला देण्याचं उद्दिष्ट दोन्हींतून साध्य होतंय्. सामान्य प्रेक्षकाला मात्र हे धक्कादायक विसंगत वाटणं शक्य आहे. *

मणीचं म्हणणं, 'तेव्हासुद्धा मी आयुष्याचा अर्थ उलगडण्याच्याच प्रयत्नात असतो. क्वचित त्यातच त्यावरचं भाष्य येऊन जातं.'

[ थोडक्यात आयुष्य–मग ते इतिहासातलं असो, की वर्तमानातलं–जसंच्या तसं represent करण्यावर थांबणारा हा कलाकार नव्हे, पण आजच्या प्रायोगिक कलांचा कलसुद्धा प्रामुख्यानं वास्तवचित्रणाकडेच झुकलेला दिसतो. हे निरीक्षण खरं असलं तर, मणी कौल आणि त्यांच्यासारखे काही थोडे एका दशकापुढचे कलाकार आहेत असं मानायचं का? ]

इतिहासाचा अन्वयार्थ लावताना मणी कौलचा भर अर्थातच त्याच्या socio–economical आणि socio–political पार्श्वभूमीवर राहणार आहे. म्हणजे नक्की काय? मणीनं या प्रश्नाचं उदाहरणांसकट उत्तर दिलं. चित्रपटाचा शेवट असाय् की ते इंग्रज सर्व्हेअर्स जमीन मोजतायत् वगैरे. यात ब्रिटिश अंमल सुरू झाल्याची, म्हणजे राजकीय, सूचना तर आहेच. पण एक आर्थिक बाबही आहे. खरं तर ती socio–economical आहे. [ जाता जाता मणी कौलना मराठी येत नाही. मला येतं. पण अनेक इंग्रजी शब्दांना चांगलेसे प्रतिशब्द सापडत नाहीत, म्हणून दिलगिरी. इंग्रजीच्या उथळपट्टीचं हे मुख्य कारण. शिवाय मग 'मणीच्याच शब्दात त्याचं म्हणणं मांडायचय्', ही सोयिस्कर सबब आहेच. असो. ] ती अशी की इंग्रजांनी प्रत्येकाची जमीन वेगवेगळी मोजली आणि गावकीच्या सामुदायिक महसुलाऐवजी प्रत्येकाला वेगवेगळा शेतसारा ठरवून दिला. म्हणजे एका दृष्टीनं खाजगी मालमत्ता आणि तदनुषंगिक व्यक्तिगत कर-आकारणी यांची सुरुवात तिथं झाली. इतिहासाचं हे socio–economical अर्थसूत्र. आणखीही प्रसंग आहेत. एका जपानी विद्वानाच्या प्रबंधात पेशवेकालीन महाराष्ट्रातील वेठबिगारीचा उल्लेख मिळाला. वेठबिगारी सक्तीची असूनही त्यातून निसटण्याचं अंशमात्र स्वातंत्र्य तिथं होतं. या बारकाव्याकडे आकर्षित झालेल्या मणीनं त्याचाही समावेश चित्रपटात केलाय्.

एकंदरीतच हा सिनेमा उण्यापुऱ्या साठ वर्षांच्या कालखंडाचा एक झूमशॉट दिसतोय्. रूढार्थानं नायकनायिकादी वस्तू यात नाहीत. तो कालफलक किंवा त्यातल्या नाना situations याच नायकनायिका; अशा स्वरूपाचं काही तरी अनेक शक्ती (forces) अस्तित्वात येताना दिग्दर्शक पहातोय् आणि लय पावतानाही साहजिकच abstraction ला बऱ्यापैकी वाव मिळणारसं वाटतं. मणीलाही तें मान्य.

'घाशीराम कोतवाल' नाटकाचं आणि या सिनेमाचं नक्की नातं काय?

तर मणी कौल म्हणतात की, नातं आहेच. संपूर्ण चित्रपटात आम्ही नाटक समांतर ठेवलंय्. म्हणजे असं की, हा सिनेमा नाटकातून सुरू होतो. जुन्नरच्या जत्रेत चाललेल्या घाशीरामच्या नाट्यप्रयोगातून सूत्रधार बाहेर पडतो आणि सिनेप्रेक्षकांशी गप्पा छेडतो. या दोन माध्यमांविषयी बोलतो. त्यातून सिनेमाची सुरुवात होते. शिवाय नाटकातले पाचएक प्रसंग आणि बहुतेक सगळी गाणी आम्ही जशीच्या तशी उचललीत. पण फरकही खूपच. दोन तर आधीच सांगितले. आणखी एक असा की, घाशीराम नाटकात पात्रचित्रण फारसं नाही. character development, psychologically convincing characters, नाहीत. सिनेमात हे असेल. त्यामुळे ती एका अर्धशतकाची कथा असली तरी, character oriented (पात्राभिमुख राहील. मात्र घाशीरामचं महत्त्व यात नाटकापेक्षा खूप कमी होईल. नाना आणि घाशीराम या दोन्ही व्यक्तिरेखा अगदी वेगळ्या perspective मधून पाहिल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ, 'ब्राह्मणातला भ्रष्टाचार आणि घाशीरामनं तो सुधारणं यातल्या संघर्षात किंवा नानाच्या गुणावगुण-चित्रणात मला फारसा रस नाही,' असं मणीचं म्हणणं आहे.

नाटकातली 'टीम' मात्र, त्या अजोड टीमवर्कसह चित्रपटात दिसणार आहे. सूत्रधार आणि नाना या महत्त्वाच्या भूमिका अनुक्रमे श्री. रानडे व डॉ मोहन आगाशे हेच पुन्हा करणार. इतरही संपूर्ण संच टी. ए. चाच. संगीतही पं. भास्कर चंदावरकर यांचं. थिएटर ॲकॅडमीच्या अमोल आणि निरपेक्ष सहकार्याचं आणि मैत्रीपूर्ण उमदेपणाच्या वागण्याचं कौतुक करताना मणी कौल यांना शब्द कमीच पडत होते. मग वरनं कोसळणाऱ्या पावसासोबतीनं superlatives चो बरसात आणि हे दोन्ही वर्षाव चालू असतानाच, त्याच दिवशी असणाऱ्या टी. ए. च्या चौथ्या वर्धापनदिनाच्या समारंभाला जायची घाई.

तेव्हा हे एक खूप काही नवीन आणि शंभर टक्के प्रायोगिक असं काहीसं मराठी चित्रसृष्टीत घडू पाहत आहे. सोळा प्रशिक्षित तरुणांची एक सहकारी सोसायटी. दिग्दर्शना-

## स्क्रिप्ट असं लिहिलं गेलं

घाशीरामची पटकथा कशी लिहिली गेली याचा इतिहास इतिहासाइतकाच मनोरंजक आहे. त्याचं असं झालं की, त्या काळाचा आपला अभ्यास पुरेसा झालाय् असं वाटल्यानंतर मणि कौल आणि त्यांच्या दोघा सहकाऱ्यांनी सगळी माहिती तपशिलासह एकत्र केली आणि त्याआधारे कागदाच्या एका मोठ्या गुंडाळीवर संपूर्ण चित्रपटकथा रेखाचित्रांच्या माध्यमातून 'लिहून' काढली. घटनांच्या योग्य कालानुक्रमानंच ही स्केचेस् काढलेली होती.

हा भला मोठा कागद मग विजय तेंडुलकरांच्या हाती सुपूर्द करण्यात आला; आणि त्या रेखाचित्रांच्या अनुरोधानं, दिग्दर्शकाला काय हवंय् याचा विचार करून आठपंधरा दिवसांतच तेंडुलकरांनी पटकथा–संवाद लिहून पूर्ण केले. अशा पटकथेच्या अनुषंगानंच या चित्रपटाचं आणखी एक वैशिष्ट्य दिसलं. सर्वसाधारणतः पूर्ण लांबीच्या हिंदी / मराठी कथाचित्रात साठ ते सत्तर 'सीन्स' आणि छ्यात–आठशे शॉट्स् असतात. 'घाशीराम कोतवाल' मध्ये शॉट्सूचीच संख्या आहे जेमतेम शंभर साहजिक प्रदीर्घ लांबीची दृश्ये पुष्कळ.

स्क्रिप्ट लिहिण्याचा हा प्रयोग नक्कीच नावीन्यपूर्ण ठरावा. एका दृश्य कलेची अधिक समृद्ध अशा दृकश्राव्यकथेला झालेली ही मदत किती मोलाची ठरते. ते पाहूच पुढे.

*

सह सर्वत्र टीमवर्क. चर्चा, विचारविनिमयातून कृती. ऑर्वोकलर चित्रपट असूनही चार लाखांच्या आतबाहेर बजेट. (अर्थात तेही मेटाकुटीनं जमत आहेत, ही बाब अलाहिदा.) हे धाडस किती दर्जेदार निघेल ते आपण नंतर ठरवूच. पण सईद मिर्झा किंवा हरिहरन-सारखे तरुण दिग्दर्शक यातनंच आपल्या स्वतंत्र फिल्म्स् कन्नडमध्ये सुरू करताहेत. सगळेचजण खूप फ्रेश, ताजे आहेत. मराठीलाही मणी कौलचा लाभ ताजाच आहे. 'उसकी रोटी', 'आषाढ का एक दिन', 'दुविधा' सारखे त्यांचे कलात्मक प्रयोगशील चित्रपट कलावर्तुळात नावाजले गेलेत. अगदी personal प्रकारच्या चित्रपटांकडून ते प्रथमच खऱ्या अर्थानं 'सहकारी' चित्रनिर्मितीकडे वळले आहेत. त्यांच्याकडे सामर्थ्य आहे आणि आमच्याकडे अपेक्षा! घोडा-मैदान दूर नाही! □

---

## स्थित्यंतरातली दिल्ली : पृष्ठ ४ वरून

व्यक्तवली. सर्व बोलणे ऐकू आले नाही, पण जे आले ते असे होते– 'आज तुमच्यावर दोन वर्षे असलेल्या आणीबाणीची झळ तुम्हाला लागल्याने इतके अस्वस्थ झालात आणि त्याचे तुम्हाला फळ हवे आहे. मग हजारो वर्षे तुम्ही ज्यांच्यावर आणीबाणी लादलीत त्यांचे काय? त्यांचा तुम्ही काय विचार करता?' एकूण हे नेते बरेच डिस्टर्ब्ड असल्याचे दिसले. आणि लगेच कळून चुकले, मोरारजींच्या गळयात नेतृत्वाची माळ पडणार. नेतृत्वाच्या रिंगणात तीनजण होते. जगजीवनराम, मोरारजी व चरणसिंग. त्यांपैकी चरणसिंग आजारी असल्याने हॉस्पिटलमध्ये आहेत. तेथून त्यांनी निरोप पाठविला आहे की, माझा मोरारजींना पाठिंबा आहे. त्यामुळे त्यांचे पारडे जड झाले आहे. जगजीवन का मागे पडले? कॉंग्रेस फॉर डेमॉक्रसी या पक्षास जनता पक्षात विलीन करण्यास त्यांनी तूर्त नकार दिला. त्यांचा तर्क असा होता की, निवडून आलेल्या कॉंग्रेस खासदारांपैकी, विशेषत: राज्यसभेत बहुमतात असलेल्या कॉंग्रेसचे काही खासदार पक्ष सोडण्यास उत्सुक आहेत. त्यांची सोय करण्यासाठी म्हणून सी. एफ. डी. आणखी काही दिवस तरी वेगळी राहिली पाहिजे. राज्यसभेतले कॉंग्रेसचे बहुमत संपुष्टात आणण्याची ही शक्कल बहुगुणांची. त्यासाठी तूर्त मर्जर नको असे ठरले. मर्जर नाही म्हणून बाबूजींना पंतप्रधानपद नाही.

तर अशी झाली ही पडद्यामागची नेतृत्वाची स्पर्धा. या स्पर्धेत कुणाची नेमकी भूमिका काय होती, हे अजून तरी नक्की समजत नाही. पण आतल्या आत काही तरी खदखदते आहे, हे मात्र जाणवते आहे. या स्पर्धेत अखेर मोरारजी यशस्वी झाले आहेत. दोन वर्षे अज्ञातवासात असलेले मोरारजी आता प्रखर प्रकाशझोतात आले आहेत. उनकी जिंदगीकी सबसे बडी तमन्ना आखिर पूरी हुई है!

२४ तारीख. दुपारी एकची वेळ. संसदेचा सेंट्रल हॉल. जनता पक्षाचा संसदीय नेता निवडण्यासाठी बैठक होणार आहे. हा नेताच देशाचा भावी पंतप्रधान होणार आहे. त्यामुळे साहजिकच जमलेल्या खासदारांमध्ये आणि बाहेर जमलेल्या लोकांमध्येही कमालीची उत्सुकता. सेंट्रल हॉलमध्येही तीच अव्यवस्था, गडबड, गोंधळ. बिचाऱ्या खासदारांना आपल्या नेत्यांची तोंडेही बघता येत नाहीत इतकी त्यांच्यासमोर फोटोग्राफर्स, पत्रकार, व इतरांनी गर्दी केली आहे. संसदीय संस्थांचा आदर करण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या पाश्चात्य देशाच्या एका कॅमेरामनने तर सर्वांवर कडी केली. खासदार आपल्या स्थानांवर बसलेले असताना त्यांच्यासमोरच्या टेबलावर तो चढला आणि फोटो/फिल्म घेऊ लागला. त्याच्या बुटाची सगळी धूळ बिचाऱ्या खासदाराच्या कपड्यांवर. शेवटी त्याला खासदारानेच झापून खाली उतरायला लावले. जयप्रकाशजी, मोरारजी, आचार्य कृपलानी, जॉर्ज फर्नांडीस ही मंडळी व्यासपीठावर आहेत. अडवानी सभेचे संचालन करीत आहेत. आचार्य कृपलानी त्यांची निवड जाहीर करतात. मोरारजींचे नाव ते जाहीर करतात. औपचारिक सूचना, अनुमोदन वगैरे सोपस्कर होतात. जॉर्ज फर्नांडिस आपल्या पाठिंब्याच्या भाषणात बैठकीस जगजीवनराम उपस्थित नसल्याबद्दल खेद व्यक्त करतात. टाळयांच्या कडकडाटात नंतर मोरारजी बोलायला उभे राहतात. आपण सर्वांनी टाकलेली जबाबदारी आपणा सर्वांच्याच सहकार्याने पूर्ण करीन म्हणतात. सर्वांचे आभार मानतात. आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या जयप्रकाशजींचे आशीर्वाद मागतात. सारे हेलावतात. नंतर जयप्रकाशजी बोलतात. आपण आजारी असल्याचे भान त्यांना सतत असते. त्याचा ते भाषणात उल्लेखही करतात. बिहार आंदोलनाची जनतेच्या या विजयाचा असलेला संबंध सांगतात. बोलता–बोलता ते म्हणतात, मी मोरारजींना, मी आपणापेक्षा लहान आहे, आजारीही आहे. तुमच्या आधी मरणार आहे.' हे वाक्य उच्चारताच समोरच्या खासदारांच्या चेहऱ्यावर विषाद, गांभीर्य या भावना दाटतात. तीनचार जणांना तर चक्क रडू फुटते. बापू काळदाते हे त्यांपैकीच एक. जयप्रकाशजीचे हे वाक्य ऐकताच 'नाही, नाही' या अर्थाने मान हलवीत ते हुंदके देत रडतात. डोळयांतून अश्रूंच्या धारा वाहतात. मात्र हुंदका बाहेर फुटू न देण्याची खबरदारी ते घेतात. कढ आवरायला त्यांना बराच वेळ लागतो. जयप्रकाशजींचे भाषण संपल्यावर अखेर डोळे पुसून पुन्हा पूर्ववत होतात. सभा संपते. मोरारजींभोवती अभिनंदनासाठी सर्वांची गर्दी. नंतर दुपारी ३ वाजता मोरारजींचा राष्ट्रपती भवनात पंतप्रधान म्हणून शपथविधी. जाताना आपल्या खाजगी गाडीतून गेलेले मोरारजी राष्ट्रपती भवनातून परतताना लांबलचक तिरंगा झेंडा लावलेल्या सरकारी गाडीतून येतात. पुढे पायलट मोटर सायकल स्वार, बरोबर अंगरक्षक. □

---

# पुढील अंकी एक छोटासा लेख

# स्थळ रायबरेली! वेळ निकालाची!

## जनार्दन ठाकूर

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २।४।७७ ते ८।४।७७

**मेष : आर्थिक बाजू सुधारेल**

सहावा चंद्र असताना आज आठवड्याची सुरुवात होत आहे. ग्रहमान बरेच अनुकूल आहे. बारावा शुक्र आहे. चैनीकडे मन झुकणार आहे. कर्ज काढून मजा करावी असे वाटू लागणार आहे. ते टाळावयाला हवे. आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक केले तर नुकसान नाही. कापड, रेडिमेड कपडे, सोने-चांदी यांचे व्यवहार धाडसाने करू नका. एरवी हा आठवडा प्रतिष्ठा वाढवणारा आहे. राजकारणात प्रतिष्ठा व मान वाढेल. धंद्याची एकूण स्थिती अडचणींवर मात करून सुधारेल. नोकरीची शाश्वती राहील प्रमोशन मिळेल. वरिष्ठांच्या सल्ल्याने वागा. बेकारांना काम मिळेल. चालू धंदा व्यवस्थित चालेल. लॉटरीत फायदा होईल. शुभ दिनांक २-५

**महिलांना** : वाङमय व साहित्य यांत रस राहील.

**विद्यार्थ्यांना** : बौद्धिक प्राप्ती होईल. परिश्रमाचे चीज होईल.

**वृषभ : सारेच अनुकूल**

पाचवा चंद्र आज सुरू आहे. चंद्रबळ उत्तम आहे. बुध बारावा आहे. खर्चाची प्रवृत्ती वाढणार आहे. हा खर्च अनावश्यक असू शकेल. तो टाळा. अकरावा रवी, पहिला गुरू, तिसरा शनी व दहावा मंगळ अशी एकूण ग्रहरचना आहे. अंतरिक्षातील सामर्थ्यशाली ग्रहांची कृपा असताना कोणत्याही क्षेत्रात यश व सफलता हाती आल्याखेरीज राहणार नाही. अनेक लाभ दृष्टिपथात येतील सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करू शकाल. अनेक दिवस डोकेदुखीचे ठरलेले प्रश्न आता सुटू लागतील. प्रकाशन व लेखन प्रगतीचा टप्पा गाठील. नोकरीत वेतन व प्रतिष्ठा वाढेल. स्थित्यंतर घडेल. लेखकांना पुरस्कार लाभेल. शुभ दिनांक ३-६.

**महिलांना** : विवाहाचा प्रश्न मार्गी लागेल. नोकरीत अनुकूलता.

**विद्यार्थ्यांना** : परीक्षेत मोठे यश पदरात पडणार आहे.

**मिथुन : नोकरीत बढती**

चंद्र अनुकूल आहे. बारावा गुरू असला तरी, तो यावेळी तुमचे काही वाईट करणार नाही. कारण मंगळ भाग्यस्थानी आहे. रवी नोकरीधंद्यांच्या दृष्टीने बराच उपकारक ठरणार आहे. यावेळी तुमच्या बुद्धीची कसोटी लागणार आहे. कौशल्य पणाला लागणार आहे. वकिलीचा व्यवसाय प्रगतीचा टप्पा गाठील. व्यापारात असलेल्या अडचणी निवारण होऊन गुंतवलेला पैसा भरभराटीला उपकारक ठरेल. नोकरीत खूपच अनुकूलता आहे. खूप दिवसांचे स्वप्न साकार होईल. वरिष्ठांची मर्जी बसेल. केलेल्या कामाचे कौतुक होईल. नवी जबाबदारी पार पाडावी लागेल. धंदा सुरू करू शकाल. भांडवल मिळेल. कर्जातून मुक्त होण्यासारखे काही तरी घडेल. प्रवासाचा बेत तडीस जाईल. शुभ दिनांक ३-७.

**महिलांना** : नोकरीत प्रमोशन मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : प्रयत्नाची आवश्यकता आहे.

**कर्क : अनुकूल बदल**

अकरावा गुरू आहे. चंद्र आठवडा सुरू असताना पराक्रमात आहे. चंद्राला सध्या साडेसाती आहे. पहिला शनी जरी वाईट नसला, तरी तो अजून वक्री आहे. शिवाय शनि-मंगळाचा षडाष्टक योग आहे. काही काही चांगले, तर काही वाईट ग्रहमान आहे. निर्धारपूर्वक कोणतेही काम केले तर यातून-देखील फायदा होईल. धंदा सुरू करायला कोणत्याच गोष्टीची आडकाठी नाही. अकरावा गुरू अनेकमार्गांनी अनुकूल प्रत्यय आणून देईल मनात ठरवलेले बेत अनपेक्षितपणे पार पडतील. तुमच्यापैकी 'दैवी' माणसाचे भाग्य तुम्हाला परदेश प्रवासाचे जमवून देईल. त्याशिवाय मजा करण्यासाठी फिरणे सफल होईल. जुने येणे वसूल होईल. लॉटरी व रेसमध्ये लाभ होईल नोकरीत स्थलांतर होईल ते उपकारक ठरेल. शुभ दिनांक- ४-६

**महिलांना** : अनुकूल वातावरण आहे. संसारात स्वप्नपूर्ती होईल.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासाचे फळ पदरात पडेल.

**सिंह : भाग्योदयाची चाहूल.**

तुम्हाला शनी बारावा आहे पण तो वक्री आहे. त्यामुळे तुम्हाला त्याचा वाईट अनुभव येणार नाही. गेल्या काही दिवसांत याचा अनुभव आला आहेच. उलट गुरू दहावा आहे. त्याची तुमच्यावर भरपूर कृपा आहे. अशा-प्रकारे गुरूसारखा सात्विक व आध्यामिक ग्रह जेव्हा अनुकूल असतो तेव्हापासून अद्वितीय असे कर्तृत्व घडत असते. तुमचा प्रतिकूल काळ संपला आहे. राजकारणात तुमच्या कौशल्याचा प्रत्यय येईल. प्रत्येक प्रकारात तुमचे भाग्य उजळून निघेल. नोकरीत वरचढपण राहील. आजवर झालेला अन्याय दूर होईल. प्रमोशन मिळून जाईल. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. अनिश्चितता संपुष्टात येईल. प्रतिष्ठेची पदे भूषविण्याची संधी येईल. शुभ दिनांक- ४-६.

**महिलांना** : विवाहेच्छू कुमारिकांचे विवाह ठरतील,

**विद्यार्थ्यांना** : बुद्धीचे व हुशारीचे कौतुक होईल.

**कन्या : मनोरथ पूर्ण होतील.**

भाग्यस्थानी गुरू प्रविष्ट झाल्यापासूनच खरे तर तुमच्या कर्तृत्वाला गती आली आहे. अडचणी असोत की विरोध असो हा गुरू सर्वांवर मात करून तुम्हाला प्रगतीच्या मार्गावर नेण्यास समर्थ आहे. गुरू आत्मविश्वास वाढवतो. मनोधैर्य देतो व हातून असामान्य कृती घडवतो. या वेळी तुम्ही जे ठरवाल ते कदाचित स्वप्नपूर्तीचे ध्येय अनेक अनपेक्षित अनुकूल घटना घडून पूर्ण होईल. जे जे मनात होते ते ते आता होईल. घरगुती वातावरण मोकळे होईल. नातेवाईकांच्या मनात तुमच्याबद्दल आपुलकी निर्माण होईल. जे तुमच्याविषयी वाईट बोलत होते त्यांना आता पश्चाताप होईल या वेळी नोकरीत जम बसेल. वरिष्ठांना तुमच्या कर्तबगारीबद्दल खात्री पटेल. ज्यांच्या नोकरीत त्रास निर्माण झाला होता त्यांच्या नोकरीत स्थैर्य होईल. बेकारांना नोकरी मिळेल. शुभ-दिनांक-, ३-६.

**महिलांना** : तब्येतीची काळजी आता करू नका.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासाचे योग्य फळ पदरात पडेल.

**तूळ : लॉटरीत भाग घ्या.**

यावेळी अंतरिक्षातील काही ग्रह तुमच्यावर खूष आहेत. गुरू आठवा खरे तर बौद्धिक व वैचारिक बाजूने तेवढासा अनुकूल नाही. पण तो तुमची पैशाची बाजू उचलून धरणार आहे. तुम्ही यावेळी लॉटरीत अवश्य भाग घ्या. कदाचित नशिबाने जमून जाईल. तुमच्यापैकी जे लेखक असतील त्यांचे ग्रंथ

प्रकाशित होतील. ग्रंथांना बक्षिस व लोकप्रियतादेखील लाभण्याचो शक्यता आहे. तुम्ही नोकरीत असाल तर वरिष्ठांबरोबर मतभेद होऊ देऊ नका. जुन्या चुका उगाळल्या जाण्याची शक्यता आहे. बदलीचा प्रयत्न करू नका. बेकारांना आता चांगले दिवस येऊ शकतील. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊ लागेल. तुमची कलावृत्ती उलट होईल. लेखक म्हणून तुम्हास मोठी मान्यता मिळेल. तब्येत मात्र नाजूकच राहील. तुम्हाला पुन: त्रास होईल. शुभ दिनांक–४-८.

**महिलांना :** स्वतंत्र धंद्याचे तंत्र जमेल. नोकरीत यश.

**विद्यार्थ्यांना :** सर्व अडचणींचे निवारण होईल.

**वृश्चिक :** कौटुंबिक स्वास्थ्य

राहू व हर्शल तुमच्या राशीला अजून बारावे असले तरी, तुम्ही त्यांची अजिबात भीती बाळगू नका. आता तुमच्या यशाची व प्रसन्नतेची सारी सूत्रे गुरूच्या हाती आहेत. गुरूमुळे तुमचे व्यक्तिमत्त्व उंचावेल. प्रतिष्ठा वाढेल. यशाची गुरूकिल्ली तुमच्या हाती येईल अडचणीवर मात करण्याचे सामर्थ्य तुम्हाला प्राप्त होईल. यश व सामर्थ्य घेऊन तुम्ही वाटचाल करणार आहात. नोकरीधंदा राजकारण वगैरे क्षेत्रांत तुमच्या चातुर्याचे युग सुरू होणार आहे. तुमच्यावर अन्याय झाला असेल तर तो दूर होणार आहे. ज्या वरिष्ठांनी तुमच्यावर अन्याय केला असेल ते अधिकारी दूर होणार आहेत. नोकरीत तुम्ही बदल करू शकाल. यशस्वी होईल. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह व्हायचे असतील त्यांचे विवाह पार पडतील. ज्यांना कौटुंबिक सुख मिळत नव्हते त्यांना ते मिळणार आहे. शुभ दिनांक ३–५

**महिलांना :** सर्व प्रकारच्या कौटुंबिक अडचणी दूर होतील.

**विद्यार्थ्यांना :** मन प्रसन्न राहून कामनापूर्ती होईल.

**धनु :** सुखाची चाहूल

राशिस्वामी गुरू सहावा झाला आहे. हा एक तेवढा अनुकूल नाही. प्रामुख्याने लेखक, प्रकाशक, पत्रकार यांच्या दृष्टीने गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. नीतिमत्तेला कमी लेखणारे लेखन होण्याचा संभव आहे. उगाच शत्रू निर्माण करून ठेवू नका. बोलण्यात संयम आणि लिखाणात समंजसपणा ठेवा. एरवी हा आठवडा उपकारक आहे. नोकरीची स्थिती समाधानकारक राहील. अडचणी व प्रतिकुलता यावर मात करण्यात मोठे यश पदरी पडेल. कामात बदल हवा असला तर प्रयत्न करा. धनु राशीच्या बेकारांना यापुढे फारकाळ लोंबकळत राहवे लागणार नाही. धंदा अथवा नोकरीचे जमून जाईल. व्यापारात असलेल्या अडचणी दूर होतील. काहीतरी अकल्पित घडून येईल. घरचे वातावरण बदलून प्रसन्नता येईल. पत्रव्यवहारात यश येईल. आळस, अप्रसन्नता, निराशा मनांतून काढून टाका. शुभ दिनांक ४-५

**महिलांना :** सार्वजनिक कामात मोठेपणा व प्रतिष्ठा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** मन प्रसन्न राहील व उत्साह राहील.

**मकर :** गुरुकृपा आहे

तुमच्या कल्याणाची सारी सूत्रे तरी हाती आहेत पाचवा गुरू हेच तुमचे बळ आहे तिसरा रवी व दुसरा मंगळ हेही तुम्हाला मदत करणार आहेत. पण मंगळ हा शनीच्या घरात आहे. त्यामुळे मतभेद, गैरसमज निराशा सांगून तुम्हाला मार्ग काढावा लागणार आहे. हातून ज्या चुका झाल्या आहेत त्याची प्रतिकूल फळे पदरांत पडतील, ती स्वीकारण्याची मनाची तयारी ठेवा. आर्थिक बाजू मात्र समाधानकारक राहील. कर्ज फेडण्याच्या योजना आखून त्या यशस्वी करू शकाल. रेस व लॉटरीत यश मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत डावपेच लढवू नका. वरिष्ठांच्या विरुद्ध गटबाजी किंवा टीका करू नका. तब्येतीची काळजी घ्या. धंद्याच्या दृष्टीने काही अकरीत घडेल. नवा धंदा उभारण्याच्या प्रयत्नाला यश येईल. प्रवासात वस्तू जपा. उपासना केल्यास अनेक मार्गाने समाधान लाभेल शुभ दिनांक ४–७

**महिलांना :** घरात लक्ष घाला. मुलांच्या संगोपनावर लक्ष ठेवा.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेच्या वेळी मनःस्थिती शांत ठेवा.

**कुंभ :** यशाची चाहूल

दुसरा रवी व पहिला मंगळ हे दोन्ही ग्रह तुमचे बळ वाढवणार आहेत. गेल्या काही दिवसात तुमचे मन थोडे विचलीत झाले आहे. केलेले काम सफल होत नाही. जे मनात आले त्याच्याविरुद्ध घडते असे सारखे चालू आहे. पण बाराव्या मंगळाने तुमच्यावर ही स्थिती आणली होती. ग्रहांचे बरे वाईट परिणाम धैर्याने भोगावेच लागतील. पण आता मंगळ राशीत आहे. बुध अनुकूल झाला आहे. त्यामुळे अपयशाची काळरात्र संपून यशाचा उषःकाल सुरू झाला आहे याची खात्री पटते. तुम्ही उद्योगी आहात तसेच राजकारणीही आहात. राजकारणात तुमच्या वाटयाला जी उपेक्षावृत्ती आली होती ती आता संपणार आहे. प्रतिष्ठा व यश हाती येऊ लागेल. नोकरीत जम बसेल. अडचणींच्या जागी यावेळी बदली तहकूब होईल. बेकारीची परिस्थिती संपून उद्योगाचा पर्वकाळ सुरू होणार आहे. शुभ दिनांक. ३-४

**महिलांना :** सभासंमेलनात मोठेपणा मिळेल. नोकरीत यश.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेला पेपर्स सोपे जातील. बुद्धी तीव्र होईल.

**मीन :** अपेक्षित खर्च

राशिस्वामी गुरू तिसरा व अनुकूल आहे. तो अनेक क्षेत्रात तुमचे यश द्विगुणीत करील. कर्तृत्वाला तो क्षेत्र उपलब्ध करून देईल. नोकरीधंद्याची परिस्थिती खूपच समाधानकारक रीतीने सुधारेल. गेल्या काही दिवसांत तुमच्यासमोर अडचणी निर्माण झाल्या होत्या. राजकारणात, लेखनात, वाचनात पराभती येणार असे वाटत होते. पण ती परिस्थिती आता बदलली आहे. तुमची प्रतिभा जागृत होईल तुमच्याकडून अत्यंत प्रभावी असे लेखन होऊन ते लोकप्रियही होईल. नोकरीत गेलेले स्थान परत मिळेल. अंगभूत गुणांची कसोटी लागेल. तुमच्या कामावर वरिष्ठ खूष होतील. नोकरीत जबाबदारी अंगावर पडेल. प्रमोशनचा विचार होईल. धंद्यात पुढे पाऊल पडेल. व्यापार सुधारेल. व्यवहारातील मंदी दूर होऊन पडून राहिलेल्या मालाला गिऱ्हाईक मिळेल. प्रवासाचा बेत तडीस जाईल. काही मनासारखे घडेल. शेअर्सचा व्यवहार फायद्याचा होईल, हाती घेतलेले काम पूर्ण होऊन समाधान मिळेल. खर्चावर आता नियंत्रण ठेवा. अपेक्षित खर्च वाढेल. शुभ दिनांक ५–७

**महिलांना :** घरगुती व कौटुंबिक सुख मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** मनाचा चंचलपणा नाहीसा होईल.